Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851

महासागर | NAGPUR POST
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English) घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २७५ * | * नागपूर * | गुरुवार, दिनांक २ जानेवारी २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किंमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.

## स्वित्झर्लंडमध्ये आजपासून बुरखा बंदी

■ वृत्तसंस्था, बर्न, दि. १:
आजपासून स्वित्झर्लंडमध्ये महिलांनी सार्वजनिक ठिकाणी हिजाब, बुरखा किंवा इतर कोणत्याही साधनाने चेहरा झाकण्यावर बंदी लागू केली आहे. रॉयटर्सच्या म्हणण्यानुसार, या कायद्याचे उल्लंघन केल्यास 1000 स्विस फ्रँक्स म्हणजेच अंदाजे 96 हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाईल.2021 मध्ये स्वित्झर्लंडमध्ये झालेल्या सार्वमतामध्ये 51.21% नागरिकांनी बुरख्यावर बंदी घालण्याच्या बाजूने मतदान केले. यानंतर बुरख्यावरील बंदीबाबत कायदा करण्यात आला.स्वित्झर्लंडपूर्वी बेल्जियम, फ्रान्स, डेन्मार्क, ऑस्ट्रिया, नेदरलँड आणि बल्गेरियामध्येही याबाबत कायदे करण्यात आले आहेत.

# ११ नक्षली मुख्यमंत्र्यांपुढे शरण

## ८ महिला, ३ पुरुष नक्षल्यांनी टाकली शस्त्रे; सर्वांना मुख्य प्रवाहात येण्यासाठी भरघोस आर्थिक मदत

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. १:
गडचिरोली जिल्ह्यातील 11 कुख्यात नक्षलवाद्यांनी बुधवारी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे आत्मसमर्पण केले. या नक्षलवाद्यांच्या शिरावर लाखोंचे बक्षीस होते. पण आता त्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्याचा मार्ग निवडला आहे. त्यामुळे सरकारने त्यांच्या पुनर्वसनासाठी काही आर्थिक मदतही घोषित केली आहे.

गडचिरोली येथे झालेल्या एका विशेष कार्यक्रमात मागील 38 वर्षांपासून नक्षली चळवळीत सक्रीय असणाऱ्या ताराक्कासह 11 नक्षलवाद्यांनी मुख्यमंत्र्यांपुढे शस्त्रे टाकली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे भारतीय संविधान देऊन स्वागत केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, मी आज दिवसभर गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. त्यात अनेक महत्त्वाचे कार्यक्रम झाले. सी 60 च्या अधिकाऱ्यांनी सातत्याने विविध चकमकींत शौर्य दाखवत आपले शौर्य दाखवले. त्यांनी अनेक माओवाद्यांना निशस्त्र करून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले.

पोलिसांनी गडचिरोली जिल्ह्यातील माओवाद संपवण्याचे काम जवळपास पूर्ण केले आहे. उत्तर गडचिरोली आता माओवाद्यांपासून मुक्त झाली आहे. दक्षिण गडचिरोलीही लवकरच माओवाद्यांपासून मुक्त होईल याविषयी कोणतीही शंका



नाही. पोलिसांनी येथे राबवलेल्या विविध उपक्रमांमुळे मागील 4-5 वर्षांत येथील एकही तरुण माओवादी संघटनेत भरती झाला नाही. किंबहुना महाराष्ट्रात माओवाद्यांची भरती पूर्णतः संपुष्टात आली आहे. हे सर्वकाही पोलिस व जिल्हा प्रशासनाच्या समन्वयातून घडले असून, हे एक अत्यंत मोलाचे कार्य आहे.

जनतेचा विश्वास माओवाद्यांवर नाही तर प्रशासनावर, राज्यावर, देशावर व आपल्या संविधानावर वाढत आहे याचे द्योतक आहे. त्यामुळे आता कुणीही संविधान विरोधी चळवळीत जायला तयार नाही हे यातून स्पष्ट होते.

**कुख्यात ताराक्काही शरण**

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, पोलिसांनी अनेक जहाल माओवाद्यांना कंठस्नान घातले. अनेक नक्षलवादी शरण येत आहेत. त्यामुळे नक्षलवादाचे कंबरडे मोडले आहे. आजही जे आत्मसमर्पण झालेत, त्यात 38 वर्षांपासून नक्षली चळवळीत सक्रीय असणाऱ्या ताराक्काचाही समावेश आहे. ताराक्का या भूपतीच्या पत्नी आहेत. गडचिरोलीत नक्षलवाद रुजवण्यात अग्रणी असणाऱ्या लोक आता पोलिस प्रशासनाला शरण येऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्याचा प्रयत्न करत आहेत. आज त्यांच्यासह 11 जणांनी आत्मसमर्पण केले.

आज माओवाद हा कोणताही विचार नाही, कोणताही आचार नाही. तो केवळ भारतीय व्यवस्थेवर आमच्या संविधानावर विश्वास नाही अशा प्रकारच्या मंडळींनी अराजकता निर्माण करण्यासाठी हे अभियान उभारले.

सुरुवातीच्या काळात काही लोक भरकटले. पण आज जे लोक या चळवळीत सहभागी आहेत, त्यांच्या लक्षात येत आहे की, न्याय हा भारतीय संविधान व त्यातून अस्तित्वात आलेल्या संविधानातूनच मिळेल. आज विकास होत आहे, तसतसा माओवादाची पिछेहाट होत आहे. त्यामुळे आगामी काळात महाराष्ट्रातून माओवाद पूर्णपणे हद्दपार झाल्याचे दिसून येईल.

2025 च्या पहिल्या दिवशी एक नवीन पहाट उगवली आहे. एक नवीन सूर्य उगवला आहे. हा सूर्य असाच पुढे गेला पाहिजे. आत्मसमर्पण केलेले नक्षलवादी आता सन्मार्गावर आलेत.

सरकार त्यांचे पूर्ण पुनर्वसन केल्याशिवाय थांबणार नाही. त्यांनी आपल्या इतर सहकाऱ्यांना खरा मार्ग हा भारतीय संविधानाचा असल्याचे पटवून द्यावे. त्यांना संविधान स्वीकारण्यास प्रवृत्त करावे, असेही मुख्यमंत्री यावेळी बोलताना म्हणाले.

## अग्राग्रलेख
## खरीखरी...

## देवेंद्रजी आणि गडचिरोली

काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला होता आले तर गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री व्हायचे आहे, असे म्हटले होते. पालकमंत्री झाल्यावर काय काय करता येईल. त्याची गणती सध्या आपण करणार नाही. अजून महाराष्ट्रातील जिल्ह्याचे पालकमंत्री नियुक्त करण्यात आलेले नाहीत. सुरुवातीला मंत्रिमंडळाच्या स्थापनेला अवरोध, खाते वाटपाला विलंब, खातेवाटप होऊन सुद्धा बऱ्याच मंत्र्यांनी अजूनही पदभार स्वीकारलेला नाही आणि त्यातच पालकमंत्री पदाच्या गोष्टी लांबलेल्या आहेत. या सर्व राजकीय धामधुमीत आज संपूर्ण महाराष्ट्राचे पालक असलेल्या मुख्यमंत्र्यांनी म्हणजेच देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या सर्वाधिक दुर्लक्षित गडचिरोली जिल्ह्यात जी विकासाची ज्योत प्रज्वलित करून जे काही केले आहे. त्याबद्दल महाराष्ट्राच्या जनतेला अभिमान वाटायला पाहिजे. गडचिरोली हा जिल्हा प्राकृतिक संसाधनांनी समृद्ध आहे, श्रीमंत आहे. घनदाट जंगल आता फक्त दाट जंगल राहिलेले आहे. मोठ्या प्रमाणातील जंगलतोड काही प्रमाणात वाढलेली असली. तरी गडचिरोली जिल्ह्यात वनराईचा इतका मोठा साठा आहे की, गडचिरोली अजूनही महाराष्ट्राला दिशादर्शक जिल्हा ठरू शकतो. अशा या जिल्ह्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आज काय काय केले. याच्या वार्ता कानी आल्यावर केवळ आमच्या कानालाच नाही. तर महाराष्ट्राच्या जागृत जनतेला मुख्यमंत्र्यांच्या कार्यशैलीचे, संघटन कौशल्याचे, सेवाभावी वृत्तीचे आणि त्यांच्या सकारात्मक व्हिजनचे घडलेले दर्शन मनाला सुखावणारे आहे. आज मुख्यमंत्र्यांनी सर्वप्रथम जिल्ह्यात पसरलेल्या जहाल माओवाद्यांच्या मत परिवर्तनाला विधायक मार्ग दाखवला. गडचिरोली जिल्ह्यासह छत्तीसगड, तेलंगणा ते पार प. बंगालपर्यंत संपर्क असलेल्या एकूण 11 जहाल माओवाद्यांना गडचिरोलीत आत्मसमर्पण करायला लावले. त्यामध्ये तीन महिलांचा समावेश आहे, ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. विशेष म्हणजे जहाल माओवादी महिला नेता तारक्का हिने गडचिरोलीत आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केले. अलीकडच्या काळातील ही फार मोठी उपलब्धी आहे. गडचिरोली जिल्ह्याला छत्तीसगडशी जोडण्याचं काम सुरू झालेलं आहे. त्यासाठी पेनगोंडा येथे एक नवीन आउट पोस्ट तयार करण्यात आलेली आहे. ज्या ठिकाणी माओवादी आणि नक्षलवाद्यांचा मोठा प्रभाव होता. तिथे आता महाराष्ट्र शासनाचा प्रभाव तयार झालेला आहे. गेल्या चार वर्षापासून गडचिरोली जिल्ह्यातील एकही तरुण किंवा तरुण कोणत्याही नक्षलवादी संघटनेत किंवा माओवादी संघटनेत सहभागी झालेले नाहीत. त्या उलट त्यांचे वरिष्ठ नेते मोठ्या प्रमाणावर शरण येत आहेत. त्यामुळेच नक्षलवादाचे कंबरडे मोडण्यासाठी ही गोष्ट सकारात्मक आहे. असेही आज फडणवीस यांनी सांगितले. आता गडचिरोलीची वाटचाल आता 'स्टील सिटी ऑफ इंडिया' च्या दिशेने सुरू झालेली आहे. कारण आतापर्यंत दहा हजार लोकांना रोजगार दिला आहे आणि अजून पाच हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. यामध्ये विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे या भागात आहेरी ते गरदेवाडा या बसमागार्चे उद्घाटन झाले आणि स्वातंत्र्यानंतर म्हणजेच जवळपास 77 वर्षात पहिल्यांदाच महामंडळाची बस या भागावर धावली. विशेष म्हणजे त्या बसमधून स्वतः महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रवास करून जो आदर्श ठेवला आहे, तो अद्वितीय आहे. सकारात्मक दूरदृष्टीसह स्वतः पुढे येऊन काम करणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किती सूत्रांमध्ये काम करतात. हे यानिमित्ताने समोर आलेले आहे. मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी त्रिसूत्रीचे आयोजन करून एकाच वेळी दहशतवादाला लगाम, विकासाला नवी दिशा आणि बिकट रहदारीसाठी सुलभ मार्ग असा तिहेरी कार्यक्रम दिला. यामुळेच गडचिरोलीच्या भावी प्रगतीची आधारशीला ठेवली गेली आहे. आज नवीन वर्षाच्या आरंभालाच मुख्यमंत्र्यांनी दाखवलेली ही एक झलक आहे. देवेंद्रजी आणखी-आणखी, पुढे-पुढे चला. जनता तुमच्याकडे लोह चुंबकाप्रमाणे आकर्षित होईल.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## नववर्ष साजरे करणाऱ्या लोकांना ट्रकने चिरडले
## १० ठार, ३० हून अधिक जखमी



■ वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. १:
1 जानेवारी रोजी अमेरिकेतील लुईझियाना राज्यातील न्यू ऑर्लिन्स शहरात एका व्यक्तीने उत्सव साजरा करणाऱ्या लोकांवर पिकअप ट्रक चालवला. यामध्ये किमान 10 जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्याचबरोबर 30 हून अधिक जण जखमी झाले आहेत. ही घटना बोर्बन स्ट्रीटवर घडली.

सीएनएननुसार, तेथे उपस्थित लोकांनी सांगितले की, एक वेगवान वाहन आले आणि गर्दीत घुसले. यानंतर एक व्यक्ती त्यातून खाली उतरली. त्याने लोकांवर गोळीबार सुरू केला, त्याला प्रत्युत्तर म्हणून पोलिस दलालाही गोळीबार करावा लागला. हल्लेखोर पकडला गेला आहे की नाही याची माहिती अद्याप उप रण्यासाठी या वाहनाचा वापर करण्यात आला. बोर्बन स्ट्रीटवर झालेल्या हल्ल्यानंतर रस्त्यावरील जखमींना वाचवण्यासाठी लोकांची गर्दी झाली. हल्ल्यानंतर अनेक लोक रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेले दिसले. हल्ल्यानंतर पोलिसांच्या वाहनांनी बोर्बन स्ट्रीटला चारही बाजूंनी घेरले. एनबीसी न्यूजनुसार, संशयिताचा मृत्यू झाला आहे. हल्ल्याचे कारण अद्याप समजू शकले नाही.

## ७५ वर्षांनंतर गावात एसटी : फडणवीस यांचाही प्रवास

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. १:
गडचिरोलीमध्ये पोलिस अतिशय चांगले काम करत आहेत, या भागातला माओवाद्यांचा प्रभाव आपण संपवला आहे. माओवाद्यांचा प्रभाव संपवून आम्ही गडचिरोली हा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा बनविण्यास सुरुवात केली आहे.

आता 75 वर्षांनंतर इथल्या लोकांना एसटी बस पाहायला मिळणार आहे, त्यामुळे आजचा दिवस खूप खास असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. गट्टा-गदेर्वाडा-वांगेतुरी मार्ग व ताडगुडा पुलाचे लोकार्पण तसेच वांगेतुरी-गर्देवाडा-गट्टा-अहेरी बससेवेचा शुभारंभ त्यांच्या हस्ते झाला. त्या वेळी ते बोलत होते.

गडचिरोली जिल्ह्यातील या मार्गावर जवळपास 15 गावांना पहिल्यांदाच बस सेवा मिळाली आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या बस सेवेचे उद्घाटन झाल्यानंतर त्यांनी स्वतः एसटीमध्ये बसून गावकऱ्यांसोबत प्रवास केला. माओवाद्यांच्या बालेकिल्ल्यातच मुख्यमंत्र्यांनी एसटीचा प्रवास केल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. गावकऱ्यांनी देखील मुख्यमंत्र्यांचे आभार मानून आनंद व्यक्त केला.

भारतीय स्वातंत्र्याच्या साडेसात दशकांनंतर पहिल्यांदाच या भागामध्ये बस सेवा सुरू झाली आहे. या माध्यमातून नक्षलवाद संपवण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे यावेळी फडणवीस यांनी सांगितले. गडचिरोली हा महाराष्ट्राचा शेवटचा जिल्हा नाही तर महाराष्ट्राचा पहिला जिल्हा करण्याचा आमचा मानस असल्याचे त्यांनी यावेळी म्हटले आहे. या भागात चांगले रस्ते आणि पुल विकसित केले गेले, असल्याचा दावा त्यांनी केला.

## भाविकांवर काळाचा घाला
## चारजण ठार

■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १:
नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी अक्कलकोट दर्शन घेऊन गाणगापूर कडे निघालेल्या भाविकांच्या गाडीला भीषण अपघात झाला. या अपघातात चार भाविकांचा मृत्यू झाला असून सात ते आठ जण जखमी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. स्कॉर्पिओ गाडीने ट्रकला धडक दिल्याने हा अपघात झाला असल्याचे सांगण्यात येत आहे.

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी अनेक जण देवदर्शनासाठी बाहेर पडत आहेत. त्यातच सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथून श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेऊन गाणगापूर कडे निघालेल्या भाविकांचा अपघात झाला आहे. मृतांमध्ये दोन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

गंभीर जखमी असलेल्या इतर सात ते आठ रुग्णांना अक्कलकोट येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून अधिक तपास सुरू आहे.

अक्कलकोट तालुक्यातील मैदर्गी येथे हा अपघात झाला आहे. या अपघातातील सर्व भाविक हे नांदेड जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सकाळी सात वाजता हा अपघात झाला. या अपघातामध्ये पती-पत्नीसह आणखी एक महिला आणि एक पुरुष जागीच ठार झाले आहेत. तर इतर जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णलयात उपचार सुरु आहेत.

दरम्यान, या अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक अनेक तास ठप्प झाली होती . मृतदेह बाहेर काढताना पोलिसांना बरीच कसरत करावी लागली.

## कोरेगाव भीमात भीमसागर

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १:
पुण्यातील कोरेगाव भीमामध्ये २०७ व्या शौर्य दिनाचा उत्साह मंगळवारपासूनच सुरू झाला होता. दरवर्षी एक जानेवारी रोजी शौर्य दिनानिमित्त जयस्तंभास अभिवादन करण्यासाठी परराज्यातून तसेच राज्यभरातून लाखो आंबेडकर अनुयायी येत असतात. यंदाही ३१ डिसेंबरपासूनच अभिवादनासाठी अनुयायांची गर्दी सुरू झाली. आज लाखोंच्या संख्येने येथे अनुयायी दाखल झाले आहेत.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी स्थंभाला अभिवादन केले. या नंतर त्यांनी माध्यमांशी बोलताना एक कविता देखील सादर केली. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी जयस्तंभास अभिवादन केले. भीमा-कोरेगाव शौर्य दिवस हा आपल्या पूर्वजांच्या जातीय अत्याचाराविरुद्धच्या लढ्यात एक पाऊल पुढे टाकण्याची आठवण आहे.

500 (499 महार आणि 1 मातंग) सैनिक आणि अलुतेदार सैन्याने त्यांच्या ब्राह्मणवादी पेशव्यांच्या शासकांवर केलेल्या विजयापासून प्रेरणा घ्या. त्यांच्या पराक्रमाची सकारात्मक आठवण ठेवा आणि बाबासाहेबांना जे हवे होते तेच स्वतंत्र आंबेडकरी राजकीय आकांक्षेचे प्रतीक म्हणून त्याचा वापर करा. आज आणि नजीकच्या काळात तुम्ही विजयस्तंभाला भेट द्याल तेव्हा सैनिकांचा सन्मान करा आणि बाबासाहेबांच्या आकांक्षा आणि महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपले मत द्या - एक स्वतंत्र आंबेडकरवादी राजकीय शक्ती त्यातूनच उभी राहू शकते, असे मत प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले आहे.

कोरेगाव भीमा परिसरातील गर्दीवर सीसीटीव्ही आणि ड्रोन कॅमे?यांची नजर ठेवण्यात आली आहे. कोरेगाव भीमा येथे जयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या



पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने प्रशासनाकडूनही योग्य ती तयारी करण्यात आली आहे.

कोरेगाव भीमा येथे 1 जानेवारी 1818 ला इंग्रज आणि पेशव्यांमध्ये झालेले युद्ध प्रसिद्ध आहे. या युद्धात महार रेजिमेंटमधील सैनिकांनी पेशव्यांविरोधात लढाईत दाखवलेल्या अतुलनीय शौयार्मुळं इंग्रजांना विजय मिळवता आला. त्या विजयाचे प्रतीक म्हणून इंग्रजांनी कोरेगाव भीमामध्ये जयस्तंभ उभारला. तेव्हापासून या जयस्तंभाजवळ शौर्य दिन साजरा केला जातो आहे.

## संतोष देशमुख हत्या प्रकरणी
## अखेर एसआयटी स्थापन

■ वृत्तसंस्था, बीड, दि. १:
बीड सरपंच हत्या प्रकरणाचा तपास आता सीआयडीकडे देण्यात आला आहे. तसेच खंडणी प्रकरणात आरोपी वाल्मीक कराडला अटक देखील करण्यात आली आहे. वाल्मीक कराडला आता 14 दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

याचसोबत आता संतोष देशमुख हत्या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध घेणे सुरू आहे. शासनाकडून आता आयपीएस बसवराज तेली यांच्या नेतृत्वात एसआयटी स्थापन करण्यात आली आहे.

आयपीएस अधिकारी बसवराज तेली यांच्या नेतृत्वात ही समिती स्थापन करण्यात आली असून तेली यांच्यासह 10 जणांची टीम या घटनेचा सखोल तपास करणार आहे. त्यामुळे आता संतोष देशमुख हत्या प्रकरणात आता लवकारात लवकर तपास लागणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, वाल्मीक कराडला काल रात्री केज कोर्टात हजर करण्यात आले होते. यावेळी त्याला 14 दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी केज पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता या प्रकरणात शासनाकडून एसआयटी नेमण्यात आली आहे. यात आयपीएस अधिकारी डॉ. बसवराज तेली (भा.पो.से.), पोलीस उपमहानिरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, सीआयडी, पुणे अध्यक्षतेखालील विशेष तपास पथकाकडून या घटनेचा संपूर्ण तपास करण्यात येणार आहे.

तपासासाठी 10 जणांची एसआयटी टीम नेमण्यात आली आहे. यात आयपीएस बसवराज तेली, पोलिस उप अधीक्षक अनिल गुजर, सहाय्यक पोलिस निरीक्षक विजयसिंग जोनवाल, पोलिस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलिस उपनिरीक्षक आनंद शिंदे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक तुळशीराम जगताप, पोलिस हवालदार मनोज वाघ, पोलिस नाईक चंद्रकांत काळकुटे, पोलिस नाईक बाळासाहेब अहंकारे, पोलिस शिपाई संतोष गित्ते, असे या अधिकाऱ्यांचे नाव आहे.

## महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या घोटाळ्यातील आरोपीला अटक

■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. १:



छत्रपती संभाजीनगर क्रीडा संकुल घोटाळ्यातील मुख्य आरोपी हर्षकुमार क्षीरसागर याला अटक करण्यात आली आहे. हर्षकुमार याने क्रीडा विभागात 21 कोटींचा घोटाळा केला होता. हे उघडकीस आल्यानंतर तो 11 दिवसांपासून फरार होता. अखेर त्याला दिल्ली येथील निजामुद्दीन रेल्वे स्टेशन येथून पळून जाण्याच्या तयारीत असताना आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले.

या घोटाळ्यातील हर्षकुमारची मैत्रीण अर्पिता वाडकरला देखील पोलिसांनी अटक केली असून तिची चौकशी करण्यात आली आहे. या प्रकरणी आतापर्यंत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच आता हर्षकुमारच्या अटकेनंतर अनेक मोठे खुलासे होण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे. हर्षकुमारच्या आई-वडिलांना कर्नाटकच्या मुरुडेश्वर येथून ताब्यात घेण्यात आले आहे.

हर्षकुमार क्षीरसागर छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय क्रीडा संकुलात कंत्राटी लिपिक पदावर कार्यरत होता. याचा पगार महिन्याला 13 हजार रुपये मिळायचा. मात्र त्याने तब्बल 21 कोटी 59 लाख 38 हजार रुपये कमावले. त्याने विभागीय क्रीडा संकुलच्या बँक खात्यातून कोट्यवधी रुपये त्याच्या दोन बँक खात्यांवर ट्रान्सफर केले होते. त्यानंतर त्याने ही रक्कम पंधरा पेक्षा अधिक खात्यांवर ट्रान्सफर केली व खर्च देखील केले.

संक्षिप्त

## चोरीच्या सात दुचाकींसह तीन आरोपींना अटक

उल्हासनगर, दि. १ : प्रतिनिधी

उल्हासनगर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे एक मोठी कारवाई करत चोरीच्या दुचाकी प्रकरणात मोठे यश मिळवले आहे. पोलिसांनी सात चोरीच्या दुचाकींसह तीन आरोपींना अटक केली असून, या कामगिरीमुळे शहरात पुन्हा एकदा पोलिसांवरील विश्वास दृढ झाला आहे. उल्हासनगर गुन्हे शाखेतील पोलीस शिपाई राजेंद्र थोरवे यांना अमरडाय कंपनी जवळील रस्त्यावर तीन इसम चोरीच्या दुचाकी घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी, सहाय्यक पोलीस निरीक्षक बांडे यांच्या नेतृत्वाखालील पोलीस हवालदार गणेश गावडे, योगेश वाघ, मंगेश जाधव, प्रकाश पाटील, रितेश वंजारी, संजय शेरमाले आणि प्रसाद तोंडलीकर या पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी सापळा रचून रवी अर्जुन जैस्वार (वय २३), आशिष राजकुमार गुप्ता (वय २३), साबेद उर्फ बाबू मुन्ना रिझवी (वय २२) (सर्व रा. आशेळेगाव, उल्हासनगर, जि. ठाणे) या तीनही आरोपीना अटक केली. आरोपीकडून सात दुचाकी हस्तगत करण्यात आल्या असून या सात दुचाकींची एकूण किंमत सुमारे २,९८,०००/- रुपये आहे. उल्हासनगर पोलीस प्रशासनाने नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. वाहनांची चोरी टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्यास सांगितले असून, संशयास्पद हालचाली आढळल्यास तत्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी यांनी केले आहे.

## दरमहा नियमित वेतनासाठी उपाययोजना करण्याची शिक्षण क्रांती संघटनेची मागणी

भिवंडी, दि. १ : प्रतिनिधी

२६ डिसेंबर रोजीच्या अनुदान वितरणाच्या शासन निर्णयात अंशतः (टप्पा) अनुदानावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी निधीची तरतूद नसल्यामुळे या महिन्यातही त्यांना वेतन मिळू शकणार नाही.त्यामुळे वित्त विभागाकडून प्राप्त अनुदानातून योजनेतील शाळा व तुकड्यांनाही नियमित वेतन देण्याची तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिव ए. कुंदन यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.१५ ते २० वर्षांपासून विनाअनुदानावर काम करणारे कर्मचारी वेतनापासून वंचित होते.जानेवारी २०२३ पासून त्यांना २० टक्के, ४० टक्के अशा टप्प्यांवर वेतन अनुदान मिळू लागले आहे.परंतु या वेतनाचे लेखाशीर्ष ३३६१,५११ यांना नियमित वेतन अनुदान वितरीत होत नाही.त्यामुळे तीन किंवा चार महिन्यांतून एकदाच त्यांना फरकासह वेतन मिळते.यामुळे गृहकर्ज व इतर कर्ज काढलेल्या कर्मचाऱ्यांना कर्ज हप्ते परतफेड करताना तसेच घरखर्च भागवताना अडचण निर्माण होत आहे.महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २०२४ सन २०२४-२०२५ चे अनुदान वितरणात टप्पा अनुदानासाठी निधी वितरण नसल्यामुळे टप्पा अनुदानावरील कर्मचाऱ्यांचा अपेक्षाभंग होऊन नैराश्य आले आहे. अंशतः अनुदानावरील शिक्षक शिक्षकेतरांसाठीही दरमहा नियमित वेतन मिळावे असे आदेश तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना व्हावेत अशी विनंती सुधीर घागस यांनी प्रधान सचिवांकडे पत्राद्वारे केली आहे.

## जुगार खेळता येत नसल्याच्या वादातून दोघा भावांना भोसकले

भिवंडी, दि. १ : प्रतिनिधी

मित्राने जुगार खेळता येत नसल्याचे सांगताच दुसऱ्या मित्राने अन्य दोन मित्रांच्या संगनमताने मित्रासह त्याच्या भावाला शिवीगाळ व धक्काबुक्की करीत लोखंडी रॉड आणि धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना शहरातील धामणकर नाका परिसरातून समोर आली आहे.याप्रकरणी तीन मित्रांच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इकबाल व त्याचे अन्य दोन मित्र असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.तर मुस्तकिम मुसा शेख (४४) व त्याचा भाऊ जाहिद अशी हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या भावांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुस्तकीम हा रिक्षा चालक असून तो भाऊ जाहिद सोबत निजामपूरा परिसरातील मौलाना आझादनगर मध्ये राहत आहे.तर आरोपी इकबाल आणि मुस्तकिम हे एकमेकांचे मित्र आहेत.दरम्यान ३० डिसेंबर रोजी रात्री साडे बारा वाजेच्या सुमारास मुस्तकीम त्याचा भाऊ जाहिद याच्यासोबत धामणकर नाका परिसरातील तिरुपती हॉस्पिटल समोरील पानटपरीवरून पानमसाला घेत होते. त्यावेळी इकबाल त्याच्या दोन मित्रांसह त्या ठिकाणी आला असता त्याने मुस्तकीमच्या हाताला धरून खेचत त्यास जबरीने जुगार खेळायला जाऊ असे सांगितले असता मुस्तकीमने इकबाल यास मला जुगार खेळता येत नाही असे सांगताच इकबाल आणि त्याच्या मित्रांना या गोष्टीचा राग आल्याने तिघांनी आपसात संगनमताने मुस्तकीम व त्याचा भाऊ जाहिदला शिवीगाळ करून धक्काबुक्की करीत लोखंडी रॉड व धारदार शस्त्राने डोक्यावर व छातीवर हल्ला करून गंभीर जखमी केले आहे.याप्रकरणी ३१ डिसेंबर रोजी मुस्तकीमच्या फिर्यादीवरून तिघांवर शहर पोलिस ठाण्यात भान्यासं तेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून घटनेनंतर आरोपी फरार झाले आहेत.पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

# पनवेल तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेची कामे अद्यापी अपूर्ण

पनवेल, दि. १ : प्रतिनिधी

पनवेल तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेची कामे अद्यापही अपूर्ण स्थितीत आहेत. तालुक्यात 18 ठिकाणी जागेची अडचण आहे. जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजना सुरू झाल्यापासून काही ठिकाणी शुक्लकाष्ट मागे लागले असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे योजना पूर्ण होऊ शकली नाही. अजिवली येथे वरची टाकी बांधण्यासाठी ग्रामपंचायत इकडून जागा उपलब्ध करून देण्यात आली नाही. बारापाडा येथे देखील जागा ग्रामपंचायतीकडून उपलब्ध करून देण्यात आली नाही. चेरवली येथे ग्रामपंचायतकडून जागा देण्यात आलेली नाही. सांगटोली येथील जागा वनविभागाची असून वन विभागाला प्रपोजल देण्यात आलेला आहे. शिवकर आणि वडघर येथील टाकी बांधण्यासाठी ग्रामपंचायतीकडून जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. आपटे येथे खालील टाकी बांधण्यासाठी ग्रामपंचायतकडून जागा उपलब्ध नाही. तर डोलघर येथे मुख्य पाईप लाईन टाकण्यासाठी ग्रामपंचायतीकडून जागा देण्यात आलेली नाही. गुळसुंदे आणि न्हावे या ठिकाणी वरची टाकी बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही. लोणीवली येथे वरची टाकी बांधण्यासाठी जागा खाजगी आहे की वनविभागाची आहे हे ग्रामपंचायतीने कळवलेले नाही. मोहो येथे ग्रामपंचायत इकडून जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. मालडुंगे येथे महावितरणचा ठराव ग्रामपंचायतकडून प्राप्त झालेला नाही. धोदाणी येथे वरची टाकी साठीची जागा ग्रामपंचायत इकडून उपलब्ध नाही. नानोशी येथे टाकीसाठीची जागा ग्रामपंचायतकडून देण्यात आलेली नाही. तरघर, मोहा येथे ग्रामपंचायतीकडून जागा प्राप्त झालेली आहे मात्र ही जागा कमी प्रमाणात आहे. विचुंबे येथे जागेसाठी सिडकोकडे मागणी करण्यात आली आहे तर वहाळ येथे टाकीच्या जागेसाठी सिडकोकडे मागणी करण्यात आलेली असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली. तुरमाळे, गिरवले आणि देहरंग येथील अंतिम ठराव ग्रामपंचायतकडून प्राप्त झालेला नाही. जागेअभावी काही ठिकाणच्या जलजीवन मिशन योजना अर्धवट स्थितीत आहेत.

# गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडा व वीजबिलात एकरकमी 120 रुपये सूट मिळवा

मुंबई, दि. १ : प्रतिनिधी

नूतन वर्षांची भेट म्हणून गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तत्काळ वीज बिलात एकरकमी 120 रुपये सूट देण्याची घोषणा महावितरणने केली आहे.

महावितरणकडून 'कागद वाचवा, पर्यावरण वाचवा' या संकल्पनेनुसार गो-ग्रीन सेवा राबविण्यात येत आहे. त्यानुसार यापूर्वी या योजनेअंतर्गत ग्राहकांना मासिक वीज बिलात 10 रुपये सूट देण्यात येते. मात्र आता यापुढे पहिल्याच बिलात पुढील बारा महिन्यासाठी तत्काळ 120 रूपये एकरकमी सवलत मिळणार आहे.

गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडणारे या ग्राहकांना महावितरणकडून दरमहा छापील कागदी बिला ऐवजी ई - मेल द्वारे वीज बिल पाठविण्यात येते. शिवाय गो ग्रीन ग्राहकांना मासिक वीज बिलात 10 रुपये सूट देण्यात येते.

महावितरणने गो ग्रीन ग्राहकांसाठी हा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता यापुढे गो ग्रीन सेवा निवडणाऱ्या ग्राहकांना दरमहा ऐवजी पहिल्याच महिन्यातील वीज बिलात एकरकमी 120 रुपये सूट देण्यात येणार आहे. महावितरणच्या 3 कोटी लघुदाब ग्राहकांपैकी अद्यापपर्यंत 4 लाख 62 हजार म्हणजेच 1.15 टक्के ग्राहकांनी गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडला आहे. भविष्यात हे प्रमाण वाढावे, या हेतूने महावितरणने गो ग्रीन पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना वीजबिलात तत्काळपणे 120 रुपये एकरकमी सुट देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व नोंदणीकृत वीज ग्राहकांना महावितरणकडून गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडण्यासाठी एसएमएस पाठविण्यात येणार आहे. गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तत्काळ वीज बिलात एकरकमी 120 रुपये सूट देण्यात येणार आहे. त्यानंतर पुढील वर्षभर व सेवेसाठी नोंदणी रद्द करेपर्यंत नोंदणीकृत ई-मेलवर वीज बिल पाठविण्यात येणार असून त्यापुढे दरमहा वीज बिलात 10 रुपये सूट देण्यात येणार आहे. ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे महावितरणने आवाहन केले आहे. गो ग्रीन सुविधेचा लाभ घेण्यासाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळाला भेट द्या व गो ग्रीन चा पर्याय निवडा.

# महामार्गावरील खराब रस्त्यांवर सुरक्षा व्यवस्था नसल्याने अपघात वाढले

## ▶▶ मुंबई - नाशिक महामार्ग बनला अपघातांचा महामार्ग

## ▶▶ 11 महिन्यात 37 अपघातात 30 जणांचा बळी,27 जण जखमी

भिवंडी, दि. १ : प्रतिनिधी



भिवंडी तालुक्यांतर्गत येणारा मुंबई - नाशिक महामार्ग हा सध्या अपघातांचा महामार्ग बनला आहे. गेल्या ११ महिन्यात या महामार्गावर झालेल्या ३७ रस्ते अपघातात ३० जणांना जीव गमवावा लागला असून या अपघातात २७ जण गंभीर जखमी झाले आहेत. याच महामार्गावर २०२३ मध्ये या मार्गावर ३१ अपघात झाले होते. त्यावेळी अपघातात २९ जणांचा मृत्यू झाला होता. तर १९ जण जखमी झाले होते. मुंबई-नाशिक महामार्गाच्या खराब रस्त्यामुळे हे अपघात होत असल्याचा आरोप वाहन चालकांकडून होत आहे. सुरक्षितते अभावी अपघात वाढत असल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. सध्या मुंबई-नाशिक महामार्गाला सहा पदरी करण्याचे काम एमएमआरडीएच्या माध्यमातून करण्यात येत आहे. तसेच यासोबतच रस्त्याच्या कडेला बांधलेल्या नाल्यांचेही रुंदीकरण करण्यात येत आहे. अशावेळी वाहनाच्या आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही व्यवस्था केलेली नाही. सदैव वर्दळीच्या मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर कामांच्या ठिकाणी ना सुरक्षा बॅरिकेड्स बसविले आहेत.ना सिग्नल व्यवस्था आहे. तर हे मार्ग कोण बनवीत आहेत त्याचा या रस्ते दुरुस्तीच्या आणि नवीन रस्ते बनविण्याच्या मार्गावर लावलेले आहेत.या मार्गावर पथदिव्यांचीही व्यवस्था नसल्याने महामार्ग पोलिसांच्या म्हणण्यानुसार जानेवारी २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील सोनाळे फाटा ते कसारा (लतीफवाडी) या ७१ किलोमीटर लांबीच्या मार्गावर ३७ रस्ते बांधण्यात येणार आहेत. बेदरकारपणे वाहन चालवणे आणि वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे ही या घटनांची कारणे असुन त्यामुळे अपघात घडले आहेत. रस्ते बनविताना आणि रस्ते बनल्यानंतर ठेकेदार आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे भविष्यात या महामार्गावर अपघातात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा आरोप नागरिक करत आहेत.महामार्गावरील सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्याचा मुद्दा विधानसभेत गाजला, मात्र त्यात कोणतीही सुधारणा झालेली नाही. भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी पावसाळी अधिवेशनात मुंबई-नाशिक महामार्गावर होणाऱ्या अपघातांचा मुद्दा उपस्थित केला होता, असे असतानाही या महामार्गाची दुरवस्था अजून सुधारलेली नाही. दिवसभरात होणाऱ्या अपघातांबाबत आमदार शेख यांनी दुःख व्यक्त करीत महामार्गावर अपघात होत असल्याचे सांगितले. या नंतरही इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयात दोन्ही बाजूंनी ट्रॉमा सेंटर नसल्याने दोन्ही यंत्रणा सुरळीत करण्याची मागणी आमदार शेख यांनी त्यावेळी केली आहे.

# कामोठेत भाजी विक्रेत्याला मारहाण करून लुटले

पनवेल, दि. १ : प्रतिनिधी

नवी मुंबईत लिफ्ट देण्याचा बहाणा करून 40 वर्षीय भाजी विक्रेत्याला गाडीत बसवले आणि मारहाण करून लुटल्याची घटना कामोठे ब्रिज जवळील सिग्नल जवळ घडली. या प्रकरणी चार अनोळखी ईसमा विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

अमरीशचंद्र जयस्वाल हे सेक्टर 10, कामोठे येथे राहत असून रात्री तीनच्या सुमारास ते मोटरसायकलने मानसरोवर हॉटेल, सेक्टर सहा या ठिकाणी येतात. आणि मोटरसायकल तेथे पार्क करतात. त्यानंतर कामोठे ब्रिज जवळील सिग्नल जवळून कोणत्यातरी वाहनाने एपीएमसी मार्केट, वाशी या ठिकाणी जात असतात. 28 डिसेंबर रोजी ऑर्डर नसल्याने व माल कमी आणायचा असल्याने सकाळी साडेचारच्या सुमारास मोटरसायकलने घरातून निघाले. त्यांनी मोटरसायकल मानसरोवर हॉटेल जवळ पार्क केली. त्यानंतर कामोठे ब्रिजजवळ सिग्नलजवळ वाहनाची वाट पाहत असताना एक कार त्यांच्याजवळ आली. त्यात चार जण बसले होते. त्यांना एपीएमसी मार्केट वाशी येथे जाण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी होकार दर्शवला आणि ते पाठीमागील सीटवर बसले. वाशीच्या दिशेने जात असताना खारघर टोल नाक्याजवळ पुढे बसलेला एक इसम मागे आला आणि त्यांनी तिघांनी मिळून जयस्वाल याना मारहाण केली आणि चाकू आणि बंदूकसारखी वस्तू व हंटरचा धाक दाखवून त्यांच्याकडील पैसा आणि मोबाईल काढून घेतला. त्यानंतर त्यांना पुरुषार्थ पेट्रोल पंपाजवळ, कळंबोली या ठिकाणी गाडीतून बाहेर ढकलून दिले. आणि ते कारने पळून गेले. यावेळी दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल आणि 35 हजार रुपये रक्कम चोरून नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

# कोरेगाव भीमा अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

पुणे, दि. १ : प्रतिनिधी

'कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी आषाढी वारी सोहळ्याच्या धर्तीवर सुविधा पुरविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणांचे चोख नियोजन करण्यात आले असून, यंत्रणा सज्ज झाली आहे,' अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी सोमवारी दिली.

कोरेगाव भीमा विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी दरवर्षी लाखो अनुयायी येत असून, गेल्या काही वर्षांपासून अनुयायांच्या संख्येत वाढ होत आहे. मंगळवार (३१ डिसेंबर) आणि बुधवार (एक जानेवारी) असे दोन दिवस होणाऱ्या सोहळ्यासाठी जवळपास आठ ते दहा लाख अनुयायी येणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाकडून सुविधांचे नियोजन करण्यात आल्याचे डॉ. दिवसे यांनी सांगितले. या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील उपस्थित होत्या.

डॉ. दिवसे म्हणाले, 'दर वर्षी आषाढी वारी सोहळ्यासाठी वारकरी आणि भाविकांच्या दृष्टीने ज्या सुविधा पुरविल्या जातात, त्याच धर्तीवर यंदाच्या विजयस्तंभ अभिवादन सोहळयात अनुयायांसाठी सुविधा पुरविण्यात येणार आहेत. त्यासाठी महसूल विभाग, पोलीस विभाग, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपी), राज्य परिवहन महामंडळ (एसटी), अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), समाजकल्याण विभाग, महावितरण, आरोग्य विभाग, माहिती व जनसंपर्क कार्यालय यांच्यासह विविध विभागांच्या साहाय्याने सोहळ्याचे नियोजन करण्यात आले आहे.'

'अनुयायांना विजयस्तंभाच्या परिसरापर्यंत प्रवास करण्यासाठी आणि पुन्हा नियोजितस्थळी जाण्यासाठीची वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षा यंत्रणा या दोन गोष्टींचे नियोजन करण्यात आले आहे. बुधवारी ५७५, तर गुरुवारी एक हजार ७० मोफत बस ठेवण्यात आल्या आहेत. वाहनांसाठी ४५ ठिकाणी वाहनतळ निश्चित करण्यात आले आहेत. तसेच बसचे मार्ग निश्चित करण्यात आले असून, नियंत्रण कक्ष तयार करण्यात येणार आहे. महिला सुरक्षितता आणि इतर घटनांच्या अनुषंगाने प्रत्येक बसमध्ये सीसीटीव्ही कार्यरत करण्यात आले आहेत,' असे डॉ. दिवसे यांनी स्पष्ट केले.

'नियोजनासाठी प्रत्येक विभागातील व्यक्तीची नेमणूक करून नियंत्रण समिती, राजशिष्टाचार समिती, नियोजन समिती, रंगमंच समिती, पास समिती, बुक स्टॉल समिती आदी समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत, तर प्रमुख १७ अधिकाऱ्यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे या प्रशासकीय समितीच्या सदस्य सचिव असणार आहेत,' असे त्यांनी सांगितले.

**'आरोग्यदूत'द्वारे तत्काळ आरोग्य सेवा**

यंदाच्या सोहळयात अनुयायांच्या आरोग्याच्या दृष्टीने 'आरोग्यदूत' ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी दुचाकीवरील आरोग्यदूत तत्काळ आरोग्य सेवा देतील, तर आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य तपासणी कक्ष (ओपीडी), २३ आरोग्य केंद्रे, ४३ रुग्णवाहिका विविध ठिकाणी असतील. तसेच महिला व स्तनदा मातांच्या अनुषंगाने ९ हिरकणी कक्ष आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ७ ठिकाणी निवारा केंद्र उभारणी करण्यात आली आहे.

**सुरक्षिततेसाठी यंत्रणा**

सोहळ्यातील अनुयायांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने भीमा नदीच्या वाहतूक पुलावरील कठड्यांवर जाळ्या उभारण्यात आल्या आहेत. तसेच, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची एक तुकडी तैनात करण्यात येणार असून, चार बोटी सुसज्ज ठेवण्यात येणार आहेत. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्याकडून ४४ अग्निशमन वाहने तैनात करण्यात आली आहेत.

## महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभागाच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी दिलीप जगदाळे रुजू

कल्याण, दि. १ : प्रतिनिधी

महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभागाच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी श्री. दिलीप जगदाळे नुकतेच रुजू झाले. ते भारतीय प्रशासन सेवेतील (आयएएस) अधिकारी असून राज्याच्या विविध भागातील



प्रशासकीय कामाचा तब्बल ३३ वर्षांचा अनुभव त्यांच्या गाठीशी आहे.

यापूर्वी श्री. जगदाळे हे राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या सहसंचालक पदावर कार्यरत होते. श्री. जगदाळे यांच्यासह राज्य शासकीय नागरी सेवेतील २३ अधिकाऱ्यांना नुकतीच भारतीय प्रशासन सेवा संवर्गात पदोन्नती मिळाली होती. त्यांनी सातारा येथे निवासी उपजिल्हाधिकारी व इतर विभागांची जबाबदारी पार पाडली आहे. उरमोडी व वांग मराठवाडी प्रकल्पांचे पुनर्वसन आणि लोणंद, फलटण या नवीन रेल्वे मार्गाचे भूसंपादन या कामांमध्ये त्यांनी विशेष योगदान दिले आहे. अपर जिल्हाधिकारी असताना त्यांनी नंदुरबार तसेच धुळे येथे अपर जिल्हाधिकारी व बीड येथे जात पडताळणी समितीचे अध्यक्ष आदी पदांवर काम केले आहे. नंदुरबार येथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व धुळे येथील कोविड काळात श्री. जगदाळे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

यावेळी भांडुप परिमंडळाचे मुख्य अभियंता सुनील काकडे, कल्याण परिमंडळाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, महाव्यस्थपाक अनिल बऱ्हाटे, अधीक्षक अभियंते नीलकमल चौधरी, दिलीप भोळे, दीपक पाटील, मोहन काळोखे, उप महाव्यस्थपाक योगेश खैरनार, सहाय्यक महाव्यस्थपाक हविषा जगताप व सुशिल पावसकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## राहुल कर्डिले, भाप्रसे यांनी स्वीकारला सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार




नवी मुंबई, दि. १ : प्रतिनिधी

राहुल कर्डिले, भाप्रसे यांनी सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार पूर्वीचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप ढोले यांच्याकडून 31 डिसेंबर 2024 रोजी सिडको भवन येथे स्वीकारला.

श्री. राहुल कर्डिले हे सन 2015 च्या तुकडीतील महाराष्ट्र कॅडरचे भारतीय प्रशाकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत. श्री. राहुल कर्डिले हे अभियांत्रिकी (इन्स्ट्रूमेन्टेशन) पदवीधर आहेत. यापूर्वी त्यांनी अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, अमरावती, सहाय्यक जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, सेलू, जि. परभणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद आणि सहआयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), मुंबई ही पदे भूषवली आहेत. सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी श्री. राहुल कर्डिले हे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, वर्धा म्हणून कार्यरत होते.

वर्धा येथे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना श्री. राहुल कर्डिले यांनी तालुका स्तरापर्यंत ई-कार्यालय या उपक्रमाची अंमलबजावणी केली होती. ई-कार्यालय उपक्रमाची तालुका स्तरापर्यंत अंमलबजावणी करणारा वर्धा हा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा ठरला होता. सेवादूत उपक्रमांतर्गत ग्रामस्तरीय उद्योजका (व्हीएलई) मार्फत ऑनलाइन प्रक्रिया राबवून नागरिकांना घरपोच सेवा देण्याचा पथदर्शी प्रकल्पही त्यांनी राबविला होता. नागरिकांकरिता 90 अधिकच्या सेवा अधिसूचित करणे, 90 सेवांपैकी 27 सेवा या ऑनलाइन आरटीएस पोर्टलच्या माध्यमातून त्यांनी उपलब्ध करून दिल्या होत्या. तसेच वर्धा जिल्ह्यातील 96 दुष्काळी गावांतील 90 कि.मी. च्या नाल्याचे खोलीकरण व नाल्याच्या काठाने बांबूची लागवड, वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेला पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न इ. उपक्रम त्यांनी वर्धा येथे राबविले होते.

# महामार्गावर ये-जा करण्यासाठी खारेगाववासीयांना तात्पुरता रस्ता



ठाणे, दि. १ : प्रतिनिधी

ठाणे-भिवंडी महामार्गाच्या रुंदीकरणाच्या कामामुळे खारेगाववासीयांना महामार्गावर ये-जा करण्यासाठीचा रस्ता बंद झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत होती. या पार्श्वभूमीवर माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत पाहणी दौरा केल्यानंतर, खारेगाववासीयांसाठी तात्पुरत्या स्वरुपात रस्ता तयार करण्याच्या कामाला मंजुरी दिली आहे.

ठाणे-भिवंडी दरम्यान नागरिकांचा प्रवास हा वेगाने व्हावा, यासाठी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे माजीवडा-वडपे दरम्यान प्रशस्त आठ पदरी महामार्ग उभारण्यात येत आहे. या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामामुळे खारेगाव येथील अंडरपासची रुंदीही वाढविली जात आहे. त्यामुळे महामार्गावरून खारेगाव गावात व स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता बंद झाला आहे. या संदर्भात नागरिकांनी तक्रारी केल्या होत्या. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, कंत्राटदार आणि ग्रामस्थांच्या प्रतिनिधींसोबत कपिल पाटील यांनी पाहणी दौरा आयोजित केला होता. या दौऱ्यामध्ये अखिल आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष व माजी ज्येष्ठ नगरसेवक दशरथ पाटील, माजी नगरसेवक उमेश पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

खारेगावमधील नागरिकांच्या सोयीसाठी अंडरपासची लांबी वाढविण्यात येणार आहे. मात्र या कामामुळे सध्या अंडरपास बंद आहे. तो तात्पुरता खुला करण्याबरोबरच रस्त्याच्या संरक्षक भिंतीपुढील जागेतून तात्पुरता रस्ता बनविण्याची सूचना माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी महामार्गाच्या अधिकाऱ्यांना केली. त्यावेळी लवकरच तात्पुरत्या स्वरुपातील रस्त्याचे काम सुरू करणार असल्याचे आश्वासन देण्यात आले. या ठिकाणी महापालिकेची पाईपलाईन गेली आहे. तिच्या स्थलांतर करण्यासाठी महापालिकेलाही विनंती करण्यात आली आहे.

# गांधीग्राम येथील जुना पूल पाडण्याच्या कामास प्रारंभ

## आमदार रणधीर सावरकर यांनी अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. १ : १२० वर्ष जुना गांधीग्राम येथील पुल पाडण्याचे काम सुरु करण्यात आले असून, त्या जागी नवीन पूलाच्या निर्मितीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना आमदार रणधीर सावरकर यांनी सूचना दिल्या. इंग्रज काळापासून १२० वर्ष जुने गांधीग्राम पूल पावसामुळे त्याच्या पिल्लर मध्ये गॅप आल्यामुळे सार्वजनिक बांधकाम व नॅशनल हायवे या विभागाने वाहतुकीला अपायकारक असल्याचा अहवाल तांत्रिक समितीने दिल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून अवघ्या दोन दिवसात अकोटसाठी रेल्वेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्या कामाची प्रगती पाहण्यासाठी सोमवारी खासदार अनुप



धोत्रे यांच्यासोबत आमदार रणधीर सावरकर तेथे गेले होते. त्यांनी गुणवत्तापूर्वक कामासंदर्भात अधिकाऱ्यांना यावेळी सूचना दिल्या. गांधीग्राम येथील पुल क्षतीग्रस्त झाल्याने त्यावरील वाहतूक बंद करण्यात आली होती. यामुळे अकोला-अकोट मार्गाने प्रवास करण्यासाठी नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत होते. पुलावरील वाहतूक बंद करून पर्यायी व्यवस्था गोपलखेड मार्गे करून हा प्रश्न निकाली काढण्यात आला. नागरिकांना आर्थिक भूर्दंड होऊ नये. यासाठी आमदार सावरकर यांनी माजी केंद्रीय मंत्री संजय धोत्रे यांच्या मार्गदर्शनात राज्य व केंद्राकडे पाठपुरावा केला होता. खासदार अनुप धोत्रे,आ.रणधीर सावरकर यांनी गांधीग्राम येथे जाऊन पुलाच्या निर्माण कार्याची पाहणी केली व अधिकाऱ्यांशी संवाद साधला व स्थानिक गावकऱ्यांच्या सूचना ऐकून घेत आवश्यक त्या सुचना अधिका?यांना दिल्या. जयंत मसने, विजय अग्रवाल, मनिराम टाले, विनोद मंगळे, मंगेश घुले, बाळासाहेब धुमाळे आदी कार्यकर्ते पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# आलेगावातील संत गजानन महाराज संस्थान येथे मोफत आरोग्य शिबिराला प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी,

पातूर, दि. १ : 'सामाजिक कार्यकर्ते रक्षण देशमुख व महाराष्ट्र राज्य रुग्णसेवक संघटनेच्या संयुक्त सहकार्याने आलेगाव येथील संत गजानन महाराज संस्थान येथे महिलांचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर झाले. कुटुंबासाठी कष्ट करताना महिलांचे अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. मात्र यामुळे अनेकदा जीवघेण्या आजारांचा धोका उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे महिलांनी स्वतःला जपलं पाहिजे. महिलांसाठीची आरोग्य शिबिरे म्हणजे त्यांच्यासाठी नवसंजीवनीच आहे,' असे मत डॉ. महेश देशमुख व डॉ. यशश्री म. देशमुख यांनी येथे व्यक्त केले. शिबिराचे उदघाटन रजनी देशमुख, डॉ यशश्री देशमुख यांच्या हस्ते झाले. ग्रामीण भागात जनजागृती व्हावी व स्त्रियांनी आरोग्याची घ्यावयाची काळजी व



उपचार यामध्ये प्रसूती सेवा, गर्भपिशवीचे उपचार व शस्त्रक्रिया, अंडाशय व गर्भनलिका शस्त्रक्रिया, कॅन्सर निदान, रजोनिवृत्ती सल्ला, मेमोग्राफी, वंध्यत्व निवारण याविषयी डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.

यावेळी पिंपरडोली येथील डॉ. संजय देशमुख, रुग्णसेवक मंगेश केणेकर, अशोक कापकर, सुखलाल सुलताने, सतीश कोरकने, गोपाल दि. महल्ले, संजय महल्ले, रवींद्र महल्ले, अभिषेक गोयल, विशाल मुर्तडकर, गजानन गावंडे आदी उपस्थित होते. आरोग्य शिबिराने महिलांमध्ये जनजागृती होऊन कामाच्या व्यापात स्वतःकडे लक्ष देण्यास मदत होते व गरजू लोकांना जिल्ह्यातील नामांकित डॉक्टर, तज्ज्ञांची ग्रामीण भागात सेवा मिळते. त्यामुळे आर्थिक बचतही होते व वेळही वाचतो.

ग्रामीण भागात शिबिरामुळे अनेकांना फायदा होतो, असे सिंधु रमेश येनकर म्हणाल्या.

# शेतकऱ्यांना वृक्ष लागवड अनुदानाची रक्कम द्यावी

### राजा शेतकरी ग्रुपची मागणी, तहसीलदारांना निवेदन सादर

■ महासागर प्रतिनिधी,

पातूर, दि. १ : तालुक्यातील शेतकऱ्यांना वृक्ष लागवडीची अनुदानाची रक्कम देण्यात यावी, अशी मागणी राजा शेतकरी ग्रुपने केली असून, याबाबत तहसीलदारांना निवेदन सादर केले.



शेतकऱ्यांनी दोन वर्षांपासून अंमलात असलेल्या वृक्ष लागवडीच्या अनुदानाची रक्कम न मिळाल्यामुळे तहसीलदारांना निवेदन दिले . शेतकरी राजा ग्रुपच्यावतीने रवी सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी निवेदन दिले. निवेदनातून सरकारकडून रोजगार हमी योजनेच्या अनुदानाची योग्य आणि पूर्ण देयक रक्कम देण्याची मागणी केली आहे.

यावेळी कैलास पराते, केशव जाधव, मोहन गाडगे, मुस्ताहिन बेग, बैजनाथ डाखोरे, भगवंत काळदाते, गोपाल वांडे, आदित्य वांडे, विलास वांडे, संजय वांडे आदी उपस्थित होते. वृक्ष लागवडीसाठी अपेक्षित अनुदानाची रक्कम अन्यत्र दाखवली जाते. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. शेतकऱ्यांनी याबाबत सरकारकडून एक योग्य आणि जलद निराकरणाची मागणी केली .

...तर नुकसान वाढणार : रोजगार हमी योजनेतून त्यांना हवी असलेली मदत मिळवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी अधिक सक्रिय होऊन कार्यवाही करावी, अन्यथा शेतकऱ्यांचे नुकसान आणखी वाढत जाईल, असे त्यांचे म्हणणे आहे. तालुक्यात शेतकऱ्यांनी चंदन, मोहबणी, तुती, बांबू यासह विविध वृक्षांची लागवड केली होती. मात्र अनुदानाची रक्कम मिळालेली नाही.

याबाबत शेतकऱ्यांना वारंवार सरकारी कार्यालयांत फेऱ्या मारल्या मात्र समाधानकारक उत्तरे मिळत नसून, त्यांची थट्टा करत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सरकारने शेतकऱ्यांना अनुदान देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना त्याचा काहीही फायदा होत नाही, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# राजर्षी शाहू फार्मसी करणार राज्यस्तरावर प्रतिनिधीत्व

### अविष्कार २०२४ मध्ये उत्कृष्टकामगिरी

स महासागर प्रतिनिधी,

बुलढाणा, दि. १ : राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ स्तरावरील अविष्कार २०२४ स्पर्धेत आपली श्रेष्ठता सिद्ध करून महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. हे विद्यार्थी आता राज्यस्तरीय अविष्कार २०२४-२५ संशोधन परिषदेत प्रतिनिधित्व करतील. संशोधन परिषदेचा कार्यक्रम २३ व २४ डिसेंबर रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात पार पडला. यामध्ये महाविद्यालयाचे एकूण १७ गट जिल्हास्तरीय फेरीतून निवडले गेले. पोस्टर सादरीकरणाच्या पहिल्या फेरीत १२ गट पुढील फेरीसाठी पात्र ठरले. अंतिम फेरीत ६ गटांनी विविध श्रेणींमध्ये अव्वल स्थान पटकावले. सहाय्यक प्राध्यापक, फार्मकोलॉजी विभाग प्रा. सचिन बोरीकर यांनी 'एम्पाग्लिफ्लोझिन मधुमेही उंदरांमध्ये सीयुएमएस प्रेरित उदासीनता शक्यतो सीआरएफ १ रिसेप्टर द्वारे सुधारते.' या प्रकल्पावर त्यांचे कार्य सादर केले आणि पीपीजी स्तरावर प्रथम क्रमांक मिळवला. प्राचार्य डॉ.शिरीष जैन यांचे मार्गदर्शन लाभले. ओमेश्वरी अशोक बंडोले



आणि भाग्यश्री कैलास औटी यांनी 'लेट्रोझोल प्रेरित पॉलिसिस्टिक ओव्हेरियन सिंड्रोम ऑन क्लिटोरिया टर्नेटिया फ्लॉवर एक्स्ट्रॅक्टचे फारमॅकोलॉजी कल इ व्हॅल्युएशन: फिमेल विस्टार रॅट्समध्ये एक व्यापक अभ्यास' शीर्षकाचे पोस्टर सादर केले आणि तृतीय क्रमांकावर पीजी रँक मिळवला. सहायक प्राध्यापिका, औषधनिर्माणशास्त्र विभाग मनीषा जावळे यांचे मार्गदर्शन लाभले वैद्यक आणि फार्मसी श्रेणी मध्ये यूजी लेव्हल: शुभम राजूसिंग राठोड आणि गणेश अण्णा जाधव यांनी 'तणावमुक्त शिरावाटी प्रशासनासाठी अभिनव उपकरण' या प्रकल्पासाठी प्रथम क्रमांक पटकावला. यासाठी प्रा वैष्णवी पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले. पीजी लेव्हल मध्ये प्रणव संतोष झोरे आणि सुप्रिया प्रल्हाद खर्तुडे यांनी 'एम्पाग्लिफ्लोजिनचा लिपोपॉलिसॅकॅराइड प्रेरित नैराश्यावरील परिणाम' या प्रकल्पासाठी प्रथम क्रमांक पटकावला. कृषी आणि पशुपालन श्रेणी मध्ये निकिता कचरू गाडेकर आणि साक्षी राजेंद्र चावट यांनी 'शाश्वत पॅकेजिंगकडे: कृषी उपपदार्थ आणि उसाच्या बगॅसचे योगदान' या प्रकल्पासाठी प्रथम क्रमांक मिळवला. यासाठी डॉ. दीपक लोकवानी यांचे मार्गदर्शन मिळाले.

तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी श्रेणी मध्ये मानसी गणेश करंडे आणि विशाल बबन राजगुरु यांनी 'सुधारित तेल सस्पेन्शन उपकरण नुरो सायकॉलॉजिकल उपकरण ' या प्रकल्पासाठी प्रथम क्रमांक मिळवला. यासाठी प्रा. डॉ. शैलेश केवतकर यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष धृपदराव सावळे, प्राचार्य डॉ. शिरीष जैन, उपप्राचार्य डॉ. प्रकाश केंद्रे व समन्वयक प्रा. डॉ. दीपक लोकवानी यांनी कौतुक केले.

# संत ज्ञानेश्वर ज्येष्ठ नागरिक संघाची वार्षिक सभा




### ८० वर्षे पूर्ण केलेल्या सभासदांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. १ : संत ज्ञानेश्वर ज्येष्ठ नागरिक संघ कौलखेडची वार्षिक सभा जानोरकर मंगल कार्यालयात ३० डिसेंबरला झाली.

मंचावर अध्यक्ष शशीधर शिंदे, सचिव विजयकुमार लांडगे, गुणवन्तराव जानोरकर, तुळशीराम बोबडे, पदमा गावंडे, कोकिळा धवस, शिवहरी मराठे, विश्वास देशमुख व प्रमुख, अतिथी ज्येष्ठांचे महर्षी ना. ना. इंगळे, शुद्धमती इंगळे, रामभाऊ बिरकड, वांडे गुरुजी, रमेश बाहेती चंद्रकांत कुलकर्णी उपस्थित होते. सभेत अहवाल वाचन, हिशेब वाचन, मंजूर करण्यात आले. ८० वर्षे पूर्ण केलेल्या सभासदांचा सत्कार करण्यात आला. त्यात अंबादास बोरकर, सदाशिव मेहरे, धन्यबा खडसे, अनंत माहोरे, अन्नपूर्णा भगत यांचा समावेश होता. टेकाडे हिने सुंदर नृत्य करीत गणेशवंदना सादर केली. तिचे अनेकांनी कौतुक करून बक्षीस दिले.

सुरुवातीस दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. स्व. मनोहर करांजकर यांचा मरणोपरांत उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार लक्ष्मीबाई करांजकर यांनी स्वीकारला. दुसरा उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार साहेबराव वहिले यांना देण्यात आला. आदर्श सुन पुरस्कार वानोडे परिवारातील मंजूषा व प्रमिला यांना प्रदान करण्यात आला.

गुणवंत विद्यार्थी पुरस्कार चंद्रकांत अवचार यांचा नातू अर्चित यास मिळाला. तुळशीराम बोबडे यांना विशेष उपलब्धी पुरस्कार देण्यात आला व खास म्हणजे परिसरातील घंटा गाडी चालक महादेव रामकृष्ण इंगळे यांना सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गुणवंतरावं जानोरकर यांचा सत्कार करण्यात आला.

ना. ना. इंगळे, रामभाऊ बिरकड, वांडे गुरुजी अंबादास बोरकर, मेहरे यांनी मनोगत व्यक्त केले. सभेस भरगच्च उपस्थिती लाभली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुळशीराम बोबडे यांनी तर आभार प्रदर्शन मराठे यांनी केले. सर्वांना सहभोजन देण्यात आले. शेवटी पसायदानाने सांगता करण्यात आली.

# इर्विनच्या परिसरात आता ५० खाटांची आयसीयू इमारत



■ महासागर प्रतिनिधी,

अमरावती, दि. १: जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेता, या ठिकाणी आयसीयू बेडची संख्या वाढवण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत होती. रुग्णालय प्रशासनानेही यासाठी पाठपुरावा केला होता. त्यामुळे इर्विनमध्ये ५० खाटांची आयसीयू इमारत मंजूर केली होती. या इमारतीच्या बांधकामालाही सुरुवात झाली आहे. या आयसीयू इमारतीत प्रत्येक आजारासाठीचे वेगवेगळे आयसीयू विभाग राहणार आहेत. नव्या वर्षात ही इमारत रुग्णांसाठी उभी होणार असून, याचे काम सुरू आहे.

या इमारतीच्या बांधकामासाठी रुग्णालय परिसरातील कर्मचाऱ्यांचे जुने निवासस्थान, आहार विभाग, तसेच स्टोरेज रूम पाडले आहेत. याच ठिकाणी ही इमारत उभी होत आहे. इर्विनमध्ये शेकडो रुग्ण उपचारासाठी येत असतात. यामध्ये अनेक गंभीर रुग्णांना आयसीयूची गरज असते. परंतु, रुग्णालयात केवळ सहा बेडचे आयसीयू विभाग असल्याने अनेक गंभीर रुग्णांना वेळेत आयसीयू बेड उपलब्ध होत नसल्याने त्यांना नागपूर रेफर करण्यात येते. त्यामुळे इर्विनमध्येच रुग्णांना उपचार मिळावे, याकरिता आयसीयू बेडची संख्या वाढवण्याची मागणी होत होती. या मागणीच्या अनुषंगाने रुग्णालय प्रशासनाने आयसीयू बेड वाढवण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला होता.

सुपरमध्ये सुरू होणार 'हायग्रेड कार्डियाक कॅथ लॅब' : सुपर स्पेशालिटीत एका महिन्यात दुसरी 'हायग्रेड कार्डियाक कॅथ लॅब' सुरू होणार असल्यामुळे जिल्ह्यातील हृदयरुग्णांना आता बाहेर जावे लागणार नाही. यासाठी राज्य शासनाने १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, मंजुरीचे पत्र सुपर स्पेशालिटी अमरावतीकडे पाठवले आहे. पेसमेकर, इम्प्लांट, अँजिओप्लास्टी, अँजिओग्राफी हायग्रेड कार्डियाक कॅथ लॅबमध्ये होणार असल्याने जिल्ह्यातील किंवा रुग्णालयात येणाऱ्या कोणत्याही हृदयरुग्णाला नागपूर, पुणे, मुंबईत रेफर करावे लागणार नाही.

५० खाटांच्या स्त्री प्रसूती विभाग अंतिम टप्प्यात इर्विनची इमारत ही सात वर्षांसाठी जीएमसी प्रशासनाच्या ताब्यात गेली आहे. त्यामुळे येथे २० खाटांचे आयसीयू विभागाचे काम सुरू आहे. वॉर्ड क्रमांक ८ मध्ये हा २० बेडचा विभाग आहे. तसेच येथे ५० खाटांचा स्त्री प्रसूती व बालरोग विभागही नव्याने उभारण्यात येत आहे. त्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

### आरोग्य यंत्रणेत भर

**भनव्या वर्षात जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेत भर पडणार आहे. इर्विन रुग्णालय परिसरात ५० खाटांची स्वतंत्र आयसीयू इमारत, तसेच ५० बेडचा स्त्री प्रसूती विभाग, यासह २० खाटांचे आणखी आयसीयू विभाग निर्माण होत आहे. याचे काम पूर्णत्वास आले आहे.**

**-दिलीप सौंदळे, जिल्हा शल्यचिकित्सक.**

# आदर्श हायस्कूलचे प्रा. संजय बोचे यांना 'आदर्श शिक्षक' पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी,

दर्यापूर, दि.१: येथील आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. संजय बोचे यांना नुकताच 'आदर्श शिक्षक' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांच्या हस्ते व कार्यकारिणी सदस्य प्राचार्य केशवराव गावंडे यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. याप्रसंगी शाळा समिती सदस्य प्रा. पंजाबराव म्हाला, ज्ञानदेवराव घाटे, अच्युतराव देशमुख, भागवतराव बुरघाटे तथा शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद प्रा. प्रभाकर कौलखेडे, शिवाजी देशमुख, डॉ. गुणवंत हरणे, श्रीराम तायडे, विनायक गावंडे, खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष प्रभाकर पाटील कोरपे यांची प्रमुख उपस्थिती



होती. शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद एकनाथ कावडकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नीलेश काळे यांच्याकडून प्राप्त ५१ हजार रुपयांच्या देणगीतून प्रतिवर्षी या पुरस्काराचे वितरण करण्यात येते. मागील १६ वर्षांपासून प्रा. संजय बोचे शिवाजी महाविद्यालयात निष्ठेने सेवा देत आहेत. कार्यतत्पर आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे. उत्तम वक्ता, कुशल संचलन, सुरेल गायक व कार्यालयीन कामकाजात तरबेज या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. संजय बोचे यांचे अभिनंदन केले.

### पर्यटकांची संख्या दरवर्षीच्या तुलनेत अल्प

■ महासागर प्रतिनिधी,

अमरावती, दि. १: दरवर्षी चिखलदऱ्याला थर्टी फर्स्टला पर्यटकांची चांगली गर्दी राहते. यंदा मात्र अपवाद आहे. ३१ डिसेंबरला चिखलदऱ्यात पोहोचलेल्या पर्यटकांची संख्या दरवर्षीच्या तुलनेत अल्प होती. रात्री साडेआठ वाजताच चिखलदऱ्यातील मुख्य चौक व मार्ग शांत दिसत होते. यावरून चिखलदऱ्यात जाऊन थर्टी फर्स्ट साजरा करणाऱ्यांमध्ये निरुत्साह दिसत आहे. चिखलदऱ्याला दरवर्षी ३१ डिसेंबरला मोठ्या संख्येत पर्यटक जात असतात. यंदा मात्र ३१ डिसेंबरला सुटीच्या दिवशी किंवा शनिवारी, रविवारी पर्यटकांची जी गर्दी राहते, त्यापेक्षाही कमी पर्यटक दाखल झाल्याचे काही स्थानिकांनी सांगितले आहे. अनेक हॉटेल्सच्या खोल्या रिकाम्या आहेत. रस्ते शांत आहेत. मुख्य बाजार ओळीतही फारशी वर्दळ नाही, असे स्थानिकांनी सांगितले आहे.


**जाहीर सूचना**

कोर्ट विद्यमान २ रे दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक यांच्या न्यायालयातील एम.जे.सी. नं. २९/२०२४

पेशी ता. १५/०१/२०२५ प्रोसेस नं. ............ दि. ............

अर्जदार : - १) श्रीमती अंबिका वि. गोविंदराव अंबादे वय - ७२ वर्ष, व्यवसाय घरकाम
२) प्रविण गोविंदराव अंबादे, वय - ५७ वर्ष,
३) अनिता वि किसन तिरपुडे वय ५४ वर्ष, व्यवसाय - घरकाम
सर्व रा वार्ड, न.०५ रामनगर पो देवलापार त. रामटेक, जि. नागपूर
-- विरुध्द --
प्रतिवादी - कोणीही नाही
मयतदार : गोविंदराव महादेवराव अंबादे, मयत दि. १४/१२/२०१०
रा. वार्ड, न ०५ रामनगर पो. देवलापार त. रामटेक, जि. नागपूर

सदरहू अर्जदाराने नियम २ प्रकरण १ मुंबई विनीमयम अधिनियम १८२७ सह कलम ३९० भारतीय वारसाहक्क अधिनियम १९२५ अंतर्गत या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने मयतदार गोविंदराव महादेवराव अंबादे यांचे वारस क्र. १ श्रीमती अंबिका वि गोविंदराव अंबादे २ प्रविण गोविंदराव अंबादे ३ अनिता वि किसन तिरपुडे सर्व रा वार्ड, न ०५ रामनगर पो देवलापार त रामटेक, जि नागपुर यांनी कायदेशीर वारस असल्याबाबत वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारीख १५/०१/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर मयतदाराच्या कायदेशीर वारसान प्रमाणपत्र बाबत जर कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारेखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि ३०/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक



**Change Of Name**

MY OLD NAME WAS SNAMSUNANISHA WAJID SAIYYAD. NOW MY NEW NAME IS SHAMSUNNISA WAJID SAIYYAD.
ADD : WARD NUMBER - 2, JUNI VASTI BORI, NAGPUR - 441108

MY OLD NAME WAS ALINA ASIM SYED ALI / ALINA ASIM SYED / ALINA SYED. NOW MY NEW NAME IS ALINA ALI SYED AZHAR ALI.
ADD : PRESTIGE TULIP APPT. TEACHER'S COLONY, JAFAR NAGAR , NAGPUR 440013



**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**

**Tender Notice**

Commissioner NMC invites Offline tenders for the following works in two envelops system. These tenders can be Submitted by the registered contractor of NMC. The terms and conditions of tenders are available at the Office of Executive Engineer Zone 10 Office, NMC. The sale and purchase of tenders can be done through offline.

| Name of Work | BOQ Cost | EMD | Tender Submission End Date/Sales End upto at 5.00 PM | Tender Opening Date at5.00PM |
|---|---|---|---|---|
| Repair & Contn of Samaj Bhawan Near Okka Bar In Pra. No. 01 | 385138/- | 4000/- | 15-01-2025 | 16-01-2025 |
| Providing & Laying Sewer Line at Yogendra Nagar In Pra. No. 11 **(4th Call)** | 829816/- | 9000/- | 08-01-2025 | 09-01-2025 |

**NOTE** - **1.** Cost of Blank Tender form (Rs. 590/-), Class of Contractor : I to VII, VIII, Time Limit : 4 Months. **2.** Sale Start/Submission Start Date : 01.01.2025. **3.** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in tender document. **4.** Tender required to submit Cost of Blank Tender form each Rs.590/- at the Office of Executive Engineer Zone 10 and should be submit the copy of these in Technical Bid Document Envelope.

**Advt No. 829 PR Date 01.01.2025**

**Sub-Divisional Engineer Zone 10**
**Nagpur Municipal Corporation**

P/N/25/829

# स्मारकाचे राजकारण...



इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

भारतीय अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणाचा शिल्पकार म्हणून ज्यांची जगाला ओळख झाली त्या सलग दहा वर्षे देशाच्या पंतप्रधानपदावर राहिलेल्या डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधानानंतर आम आदमीप्रमाणेच त्यांच्या पार्थिवावर दिल्लीच्या निगमबोध घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

डॉ. सिंग यांच्यावर शासकीय इतमामाने व शिख परंपरेनुसार झालेल्या अंत्यसंस्कार देशातील कोट्यवधी जनतेने टीव्हीच्या पडद्यावर बघितला.

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस संसदीय दलाच्या नेत्या सोनिया गांधी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिषी, प्रियंका गांधी, माजी मुख्यमंत्री अशोक गहलोट, माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट आदी दिग्गज नेते डॉ. सिंग यांच्या पार्थिव देहावरील अंत्यसंस्कार प्रसंगी हजर होते.

प्रत्येकाने डॉ. सिंग यांच्याविषयी आदराच्या भावना व्यक्त केल्या. पण अंत्यसंस्कारानंतरही माजी पंतप्रधान डॉ. सिंग यांच्यावर राजघाटावर किंवा शक्तिस्थळावर अंत्यसंस्कार करण्यास केंद्र सरकारने परवानगी का दिली नाही, हा प्रश्न कायम चर्चेत राहिला.

आज जगात भारताची बलशाली प्रतिमा निर्माण होण्यामागे डॉ. मनमोहन सिंग यांनी घेतलेल्या आर्थिक धोरणाचा व दूरगामी निर्णयांचा मोठा वाटा आहे. दोन टर्म सलग पूर्ण करणारे गांधी-नेहरू परिवाराच्या बाहेरचे डॉ. सिंग हे पहिलेच पंतप्रधान ठरले.

डॉ. सिंग हे देशाचे पहिले शीख पंतप्रधान होते. ते राजकारणी नव्हते. सोनिया गांधींनीच त्यांना एकदा नव्हे, तर दोन वेळा देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान होण्याची संधी दिली. मग त्यांच्या निधनानंतर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी अन्य पंतप्रधानांच्या तुलनेने वेगळी वागणूक का देण्यात आली? देशभरातील मीडियातून डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर केंद्र सरकारने राजघाटावर अंत्यसंस्कार करण्यास नकार दिल्याचीच चर्चा जास्त झाली.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंनी पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्र्यांशी संपर्क साधून डॉ. सिंग यांच्या अंत्यसंस्कार व स्मारकासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली होती. स्मारकाला जागा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व औपचारिकता सरकार लवकरच पूर्ण करील असे त्यांना उत्तर देण्यात आले.

भाजपाचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी म्हटले की, डॉ. सिंग यांची समाधी व स्मारक बनविण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे. त्यासाठी जमिनीचे अधिग्रहण करणे, ट्रस्ट निर्माण करणे, जमिनीचे हस्तांतरण करणे यासाठी काही वेळ लागू शकतो. डॉ. मनमोहन सिंग हे देशाचे पंतप्रधान झाले ते काँग्रेसमुळेच. पण त्यांना पदावर असताना काँग्रेस पक्षाने, गांधी परिवाराने कसे वागवले हे सर्वश्रूत आहे.

डॉ. सिंग हे दहा वर्षे पंतप्रधान असताना सोनिया गांधी याच सुपर पीएम होत्या, असे वातावरण होते. त्या काळात डॉ. सिंग यांना सोनिया गांधींचे बाहुले म्हटले जात असे. दि. ३ डिसेंबर २००४ रोजी माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांचे निधन झाले. तेव्हा काँग्रेसप्रणीत यूपीएचे सरकार सत्तेवर होते. मग तेव्हा नरसिंह राव यांचा अंत्यसंस्कार राजघाटावर का झाला नाही? नरसिंह राव यांचे स्मारक काँग्रेसने दिल्लीत का नाही उभारले?

राव यांचे अंत्यसंस्कार राजधानीत होऊ नयेत व त्यांचे स्मारकही दिल्लीत असू नये असे काँग्रेसला वाटत होते, असे त्यांचे पुत्र प्रभाकर यांनीच म्हटले आहे. नरसिंह राव यांची हयात दिल्लीत गेली पण त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे स्मारक हैदराबादमध्ये उभारणार असे काँग्रेसने तेव्हा म्हटले होते.

राव यांच्या कुटुंबाने राव यांचे दिल्लीत स्मारक व्हावे असे सोनिया गांधींना पत्रही दिले होते. पण सोनियांनी काहीच केले नाही. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर त्यांच्या सरकारने २०१५ मध्ये नरसिंह राव यांची समाधी दिल्लीत बांधली व २०२४ मध्ये राव यांना भारतरत्न हा मरणोत्तर सर्वोच्च पुरस्कार दिला. काँग्रेसने नेहरू-गांधी परिवाराच्या पलीकडे कोणाचाच आदर केला नाही हा इतिहास आहे. सीताराम केसरी, नरसिंह राव, प्रणव मुखर्जी आणि डॉ. मनमोहन सिंग अशा उत्तुंग नेत्यांच्या बाबतीत हेच घडले.

प्रणव मुखर्जी हे राष्ट्रपती झाले. त्यांच्या निधनानंतर आपल्याच नेत्याला काँग्रेस कार्यकारिणीत साधी श्रद्धांजलीही पक्षाने अर्पण केली नाही. सोनिया गांधींनी त्यांची कन्या शर्मिष्ठा यांना प्रणवबाबूंच्या निधनानंतर दुःख झाल्याचे पत्र पाठवले पण ज्या पक्षासाठी मोठ्या नेत्याने हयात घालवली, त्यांच्या निधनानंतर शोकप्रस्तावही काँग्रेसने संमत केला नाही.

डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर राहुल गांधी यांनी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार निगमबोध घाटावर करावा लागतोय, हा देशाच्या पहिल्या शीख पंतप्रधानांचा अवमान केला, असे ट्वीट केले. डॉ. सिंग यांच्या अंत्यसंस्कारासाठी व स्मारकासाठी १ हजार यार्ड जागा भाजपा सरकार देऊ शकत नाही, याबद्दल मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी खंत व्यक्त केली आहे.

डॉ. सिंग यांचे स्मारक उभारण्यासाठी शक्तिस्थळ (इंदिरा गांधींची समाधी) किंवा वीरभूमी (राजीव गांधींची समाधी) जवळ जागा देण्यास काय अडचण होती, अशी विचारणा प्रियंका गांधींनी केली. पंजाब काँग्रेसचे नवज्योत सिद्धू यांनी म्हटले, अटलजींचा अंत्यविधी राजघाटावर होणार नाही व तिथे स्मारक होणार नाही, असे कोणी सांगितले तर तुम्हाला कसे वाटेल? शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीरसिंग बादल यांनीही केंद्राच्या भूमिकेबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

आपण माजी पंतप्रधानांच्या निधनानंतर कसे वागलो याचे जरी काँग्रेसने स्मरण केले तरी स्मारकावरून राजकारण करणे योग्य आहे का, याचे उत्तर काँग्रेसलाच मिळेल. तिरंग्यात लपटलेले नरसिंह राव यांचे पार्थिव दिल्लीतील काँग्रेसच्या मुख्यालयासमोर आणले गेले तेव्हा अर्धा तास तेथे थांबूनही मुख्यालयाचा दरवाजा उघडला गेला नव्हता.

या घटनेने कोणालाच यातना झाल्या नसतील असे काँग्रेस श्रेष्ठींना वाटते का? देशाच्या दहा दिवंगत पंतप्रधानांच्या समाधी आहेत. मोरारजी देसाई यांची समाधी अहमदाबाद येथे आहे. पंतप्रधान असताना मंडल आयोगाच्या शिफारसी अमलात आणणाऱ्या विश्वनाथ प्रताप सिंग यांची समाधी नाही. अटलबिहारी वाजपेयी यांचे राष्ट्रीय स्मृतिस्थळ राजघाटावर उभे आहे. डॉ. मनमोहन सिंग यांना पंतप्रधान होण्याची इच्छा नव्हती आणि महत्त्वाकांक्षा मुळीच नव्हती.

२००४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाची इंडिया शायनिंग घोषणा फसली आणि काँग्रेसचे आश्चर्यकारक पुनरागमन झाले. त्यावेळी सोनिया गांधी काँग्रेस अध्यक्ष होत्या आणि त्याच आता पंतप्रधान होणार असे सर्वांनीच गृहीत धरले होते. पण भाजपाने त्यांच्या विदेशी जन्माचा मुद्दा उपस्थित केला. इटलीत जन्म झालेली व्यक्ती भारताची पंतप्रधान कशी होऊ शकते?

देशाच्या सर्वोच्च संवेदनशील पदावर विदेशी जन्माची व्यक्ती कशी बसू शकते? भाजपाच्या आक्रमक नेत्या सुषमा स्वराज व उमा भारती यांनी सोनिया यांना पंतप्रधान होण्यास कठोर विरोध केला. सोनिया पंतप्रधान झाल्या, तर आपण मुंडन करून देशभर निषेध व्यक्त करीत फिरू असा इशारा सुषमा स्वराज यांनी दिला.

सुषमा व उमा या फायरब्रँड महिलांच्या लढाऊ पावित्र्याने सोनिया गांधींचा पंतप्रधान पदाचा मार्ग रोखला. काँग्रेस पक्षातील सारे नेते सोनियांनी पंतप्रधान व्हावे म्हणून हट्टाला पेटले होते, पण त्यातला धोका सोनियांनी ओळखला. सोनियांना सरकार स्थापन करण्याचे निमंत्रण राष्ट्रपती भवनमध्ये तयार होते. पण काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकीत स्वतः सोनिया यांनीच नेते पदासाठी डॉ. मनमोहन सिंग यांचे नाव सुचवले आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. सन २००९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला आणखी मोठे यश मिळाले. पण त्या यशाचे श्रेय कोणी डॉ. सिंग यांना दिले नाही.

सोनिया यूपीए व राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार समितीच्या अध्यक्ष होत्या. तेव्हा राज्याचे व केंद्राचे मंत्री, खासदार, व्हीआयपी हे थेट १० जनपथवर सोनियांना भेटायला जात असत. पंतप्रधानांवर सोनिया यांचाच रिमोट कंट्रोल चालतो, अशी भरपूर टीका झाली. डॉ. सिंग यांना मौनीबाबा म्हणून आणि ॲक्सिडेंटल प्राइम मिनिस्टर म्हणून संबोधले गेले. पण डॉ. सिंग आपले काम शांतपणे करीत राहिले, कोणाच्याही टीकेला त्यांनी कधीच उत्तर दिले नाही.

न्यायालयाने दोषी ठरविल्यानंतर खासदार-आमदाराचे सदस्यत्व रद्द होणार असा मोठा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्यावर काँग्रेससह यूपीएतील सारे पक्ष हादरले. सर्वोच्च न्यायालयाच्या निकाल रोखणारा अध्यादेश तेव्हा यूपीए सरकारने काढला. भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण देणारा अध्यादेश काढला, म्हणून विरोधी पक्षाने देशभर वादळ उठवले. तेव्हा राहुल गांधींनी दिल्ली प्रेस क्लबमध्ये हा कसला अध्यादेश म्हणून तो जाहीरपणे टराटरा फाडून फेकून दिला.

आपल्याच पक्षाच्या पंतप्रधानांचा एवढा जाहीर अवमान यापूर्वी कोणी केला नव्हता. तेव्हा डॉ. सिंग हे विदेशात होते, भारतात परतल्यावर त्यांनी पण राजीनामा देण्याची तयारी दर्शवली होती. पंतप्रधान असताना पहिल्या टर्ममध्ये त्यांनी जेएनयू (जवाहरलाल नेहरू विद्यापीठ) ला भेट दिली. सिंग यांच्या बजेटमधील आर्थिक धोरणाला व काही कपातींना विरोध म्हणून विद्यार्थ्यांनी काळे झेंडे दाखवून त्यांचे स्वागत केले.

पंतप्रधानांच्या विरोधात घोषणाही दिल्या. नंतर स्वतः डॉ. सिंग विद्यार्थ्यांसमोर भाषण करताना म्हणाले - विद्यार्थी असोत किंवा कोणीही, प्रत्येकाला निषेध करण्याचा अधिकार आहे. आपले प्रश्न कोणी मांडत असेल, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. पत्रकारांशी बोलताना डॉ. सिंग एकदा म्हणाले - मै यह नहीं मानता कि मैं एक कमजोर प्रधानमंत्री हूँ. मुझे उम्मीद है कि मीडिया की तुलना में इतिहास मेरा मूल्यांकन करते समय जादा उदार होगा.

●●●●●●●●●

# सुजाण ग्राहकत्व काळाची गरज




*बुडतां हे जन न देखवे डोळां।*
*येतो कळवळा म्हणउनि ॥*

तुकाराम महाराजांनी या अभंगात प्रतिपादन केल्याप्रमाणे ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी यांनी 1972 च्या भीषण दुष्काळानंतर ग्राहकांचे होणारे अतोनात शोषण रोखण्यासाठी मोलाची कामगिरी बजावत 6 सप्टेंबर 1974 रोजी अनेक समविचारी लोकांना सोबत घेऊन एक प्रभावी ग्राहक चळवळ उभारली जी अखिल भारतीय ग्राहक पंचायत म्हणून नावारूपास आली. पुढे चालून ग्राहक पंचायतीच्या पुढाकाराने 24 डिसेंबर 1986 रोजी ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. 20 जुलै 2019 पासून अधिक प्रभावी आणि सुदृढ अशा सुधारीत ग्राहक संरक्षण कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. तत्पूर्वीच 1986 सालापासून 24 डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. तसेच दरवर्षी 15 डिसेंबर ते 31 डिसेंबर दरम्यान देशभरात ग्राहक जागरण पंधरवडा साजरा करायला सुरुवात झाली. अखिल भारतीय ग्राहक पंचायत ही ग्राहकांच्या हक्कांसाठी लढणारी प्रभावी चळवळ आज आपल्या देशात परिणामकारकरीत्या कार्यरत आहे. ग्राहक पंचायतीच्या पुढाकाराने देशभरात राष्ट्रीय ग्राहक दिन नुकताच साजरा करण्यात आला. ग्राहक दिन व ग्राहक जागरण पंधरवडा साजरा करण्यामागची भूमिका अशी की या देशातल्या प्रत्येक नागरिकाला ग्राहक म्हणून त्याच्या हक्क आणि कर्तव्यांची जाणीव झाली पाहिजे म्हणजे असे सुजाण ग्राहक हे शोषणमुक्त ग्राहकत्वाचा प्रचार आणि प्रसार करतील.

-------------------

सजग आणि सुजाण ग्राहकत्व अंगीकारणे आज काळाची गरज बनली आहे कारण या जगात ग्राहकांना फसवण्याचे असंख्य मार्ग आज राजरोसपणे वापरले जात आहेत. ग्राहक म्हणून वस्तू अथवा सेवा खरेदी करताना आपण फसवले जाणार नाही ना याची काळजी ग्राहकाने स्वतःच घ्यावी लागते. अन्यथा इथे फसवणूक करणाऱ्यांची अजिबात कमी नाही.

ग्राहकाने सजग राहताना काही नियमांचे पालन केले तर ग्राहक म्हणून होणाऱ्या फसवणुकीबद्दल जागृती होऊन सर्व प्रकारचे आर्थिक नुकसान टाळले जाऊ शकते. खरेदीसाठी सर्वात पहिला नियम म्हणजे खरेदीला घराबाहेर पडताना विचारपूर्वक बाहेर पडणे. खरेदी किती आवश्यक आहे याचा सारासार विचार करून आवश्यक व अनावश्यक खरेदीचा प्रवर्ग ठरवणे. दैनंदिन जीवनात अन्नधान्य, भाजीपाला, कपडे, रोजच्या वापरातील वस्तू यांची मोठी यादी असते जी सर्व आवश्यक या प्रवर्गात मोडते.

ही सर्व खरेदी नियमीत कालांतराने करावी लागते, असे असले तरी या वस्तूंची प्रतवारी आणि मूल्य यांची सांगड घालून उत्तम दर्जाची खरेदी करणे आपल्या हाती असते. अन्यथा शंभर रुपयांच्या वस्तूसाठी हजाराने रक्कम मोजावी लागू शकते. त्याबरोबरच अगदी दहा रूपयांची खरेदी केली तरी त्या खरेदीची पक्की पावती घेतलीच पाहिजे.

आपल्याकडे काही हजारांची खरेदी केली तरी देखील पक्की पावती घेण्याचा विचार ग्राहक फारसा करत नाहीत आणि विक्री करणाऱ्यांना तेच हवे असते. त्यामूळे पावती न घेता खरेदी करणे सोडून समयसूचकता दाखवून पावतीसाठी आग्रह धरला पाहिजे. जेणेकरून फसवणूक झालीच तर अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद व ग्राहक तक्रार निवारण आयोग यांच्या माध्यमातून दाद मागता येईल.

ज्या प्रकारची वस्तू मागितली आहे तशीच ती मिळते का हे सुद्धा ग्राहकाने तपासून पाहिले पाहिजे, दुकानदार पुष्कळ वेळा त्यांचा न विकलेला माल विकण्यासाठी वस्तू लादण्याचा भक्कम प्रयत्न करतात पण ग्राहकाने सुद्धा तेवढ्याच भक्कमपणे विक्रेत्यांचा तो प्रयत्न हाणून पाडला पाहिजे. आपल्याला कोणत्या प्रकारची आणि कशी वस्तू हवी आहे हे ठरवून आपण अगदी तशीच खरेदी करावी.

अन्नधान्य, खाद्यपदार्थ, सौंदर्य प्रसाधने, औषधी यांच्या बाबतीत उत्पादन तयार झालेली तारीख, त्यातले घटक पदार्थ आणि केव्हापर्यंत वापरण्यायोग्य आहे याची इत्थंभूत माहिती करून घेऊन नंतरच पक्क्या पावतीसह खरेदी करावी. म्हणजे फसवणूक अथवा शोषण झाले तर दाद मागता येते. ग्राहकाने स्वतःचे सर्व हक्क अबाधित ठेऊन खरेदी करण्यावर भर द्यावा. आपल्या घाई गडबडीचा फायदा घेऊन बरेचदा अनावश्यक आणि दर्जाहीन वस्तू आपल्या माथी मारल्या जातात, त्यामूळे खरेदी करताना अनावश्यक घाई प्रकर्षाने टाळली पाहिजे.

आजच्या आधुनिक काळात एका महत्त्वाच्या पद्धतीने खरेदी लोक मोठ्या प्रमाणावर करू लागले आहेत ती म्हणजे ऑनलाईन खरेदी. ही खरेदी करताना तर अत्यंत काळजीपूर्वक व्यवहार करावे लागतात, अन्यथा प्रचंड मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसू शकतो.

त्याबरोबर मनस्ताप आणि तणाव सुद्धा मोफत मिळतो. त्यामूळे गरज असेल तेव्हाच आणि सुरक्षिततेबाबत संपूर्ण काळजी घेऊन, नियमावली संपूर्ण वाचून, समजून घेऊन, खबरदारी बाळगून ऑनलाइन खरेदी आणि व्यवहारात पडले पाहिजे अन्यथा भीक नको पण कुत्रा आवर असे म्हणण्याची वेळ येऊ शकते.

ऑनलाईन फसवणूक झालीच तर ग्राहक संरक्षण कायदा आहेच, तो प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी, ग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदा कायम सकारात्मक भूमिकेतून सहकार्याचा हात पुढे करतात, पण ग्राहकांनी तिथपर्यंत पोहचणे ही त्यांची जबाबदारी असते.

याशिवाय पुढचा महत्त्वाचा विचार म्हणजे पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य देऊन खरेदी करण्यास ग्राहकांनी पसंती दिली पाहिजे. आज जग एक मोठी बाजारपेठ बनले आहे आणि आपला माल विकण्याचा उत्पादक हर तऱ्हेने प्रयत्न करतात, हलक्या दर्जाचा माल बनवणे, वस्तू बनवत असताना पर्यावरणस्नेही उत्पादने तयार करण्याची तसदी न घेणे, त्याच्याविषयी असलेली नियमावली धाब्यावर बसवून स्वतःच्या कंपनीची उत्पादने विक्रीसाठी बाजारात आणणे आणि या सर्व बाबींवर सरकारी यंत्रणेचे नियंत्रण नसणे किंवा ते नाममात्र असणे यामुळे पर्यावरणाचे अतोनात नुकसान होत आहे व याचा फटका बसून नागरिकांना आरोग्यविषयक समस्यांना वारंवार तोंड द्यावे लागत आहे.

यावरचा उपाय म्हणजे शाश्वत विकासाला चालना देणाऱ्या पर्यावरणपूरक सेवा आणि वस्तू यांचे उत्पादन व विक्री सक्तीची करणे, त्यासाठी जे नियम असतील त्यांचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे. कारण जोपर्यंत पर्यावरणास घातक वस्तूंचे उत्पादन होत राहील, आणि ग्राहक जागरुक होऊन या घातक वस्तू आणि सेवांची खरेदी थांबवणार नाही तोपर्यंत पर्यावरणाचा ऱ्हास कोणीही थांबवू शकणार नाही हे निश्चित आहे.

जगभरात अस्ताव्यस्त पसरत जाणारे प्लास्टिक, प्लास्टिक उत्पादने, वस्तूंची अविघटनशील आवरणे, वेस्टने व त्यांची विक्री आणि खरेदी हा असाच एक विवेकहीन व्यापार बनला आहे, आता तर ही घातक उत्पादने बेधडकपणे खाद्यपदार्थांमध्ये मिसळली जात आहेत. असा कुठलाही खाद्यपदार्थ शिल्लक ठेवला जात नाहिये की ज्यामध्ये कोणत्यातरी प्रकारची भेसळ केलेली नसते. म्हणजे एकंदर नफा, नफा आणि केवळ नफा कमावणे हेच व्यापारी तत्त्व झाले आहे!

नफा कमावण्यासाठी हवा, पाणी व अन्नधान्य दूषित करणे, निसर्ग आणि नैसर्गिक संसाधनांना हानी पोहोचवणे या सर्व बाबी अतिशय सामान्य झाल्या आहेत, या प्रत्येक प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने पुढाकार घेणे क्रमप्राप्तच आहे. कारण समस्या निर्माण झाल्यावर त्यावर तोडगा काढण्यापेक्षा समस्या निर्माण होऊच नयेत यासाठी काळजी घेणे सोयीस्कर ठरते. यासाठीच ग्राहक दिन आणि ग्राहक पंधरवडा अशी प्रयोजने असतात.

कायदे खूप आहेत, एवढे कायदे असताना सुद्धा ग्राहक संरक्षण कायद्याची निर्मिती करावी लागली आणि तरीही मोठ्या प्रमाणावर आज ही ग्राहकांचे शोषण होतच असते. असे का होते तर याचे कारण म्हणजे जनजागृतीचा अभाव, कायद्याविषयी असणारे अज्ञान, कायदेपालन न करता 'माझे कोण काय वाकडे करू शकतो?' ही लांछनास्पद दर्पोक्ती.

ज्या देशात प्रचंड प्रमाणात कायदे असतात त्या देशाचे मानसिक स्वास्थ्य ही चिंतनीय बाब असते म्हणूनच पर्यावरण संरक्षण कायदा, ग्राहक संरक्षण कायदा आणि इतर सर्व प्रकारचे कायदे असूनही कायद्याचे पालन मात्र मोठ्या प्रमाणावर आणि सर्व स्तरांवर होताना दिसत नाही हे विदारक सत्य आहे, या धर्तीवर राष्ट्रीय ग्राहक जागृती पंधरवड्यात देशभर ग्राहक संरक्षणविषयक जनजागृती प्रसृत करण्याचे मोठ्या प्रमाणावर होत असलेले कार्य लाक्षणिक अर्थाने उठून दिसते.

सर्वांनी मिळून ही ग्राहक जागृतीची चळवळ उपयुक्ततेबाबत सर्वोच्च पातळीवर घेऊन जाणे हे अखिल भारतीय ग्राहक पंचायत आणि जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांचे परमकर्तव्य ठरते! ग्राहक हे खरेदी करता येत नसतात ते विश्वासाने कमवावे लागतात हे व्यापाऱ्यांना समजले आणि उमगले पाहिजे, तसेच ग्राहक हा राजा असतो, अर्थव्यवस्थेचा कणा असतो हे विसरता कामा नये!

ग्राहक जागरण पंधरवाड्यात ग्राहक समस्यांची उकल होऊन ग्राहकांना न्यायदानाच्या काही प्रेरणादायी कहाण्या लिहायला, वाचायला मिळो आणि कानी पडो हीच सदिच्छा!

जय ग्राहक.... !

●●●●●●●●●



डॉ. संगीता देवयानी गोविंदराव आवचार
शिक्षण समिती प्रमुख,
देवगिरी प्रांत,
अखिल भारतीय ग्राहक पंचायत तथा
सदस्य, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद
परभणी, महाराष्ट्र शासन

# चिंताजनक विमान दुर्घटना



दक्षिण कोरियामध्ये जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान रविवारी मुआन विमानतळावर उतरताना भीषण अपघात झाला. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले. या अपघाताने संपूर्ण जगात हळहळ व्यक्त करण्यात आली.

विमान अपघात घडून त्यात निष्पाप प्रवाशांचा जीव गेल्याची ही जगातील पहिलीच घटना नाही. या आधीही विमान अपघाताच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागील वर्षीच म्हणजे २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहारांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता.

कोरियात झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे मात्र विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाल्यानंतरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल. मागील वर्षी नेपाळमध्ये झालेला विमान अपघात हा खराब हवामानामुळे झाला होता. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सांगण्यात येते. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो.

या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो. तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात.

हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. काही वेळा पक्षाची धडक बसल्याने विमान अपघात झाल्याचे सांगण्यात येते. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा यात जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजार १६४ विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत.

भारतातही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या घटना वाढल्या आहेत. मागील वर्षी दिल्लीवरून बंगळुरुला जाणाऱ्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने सुदैवाने अपघात टळला होता.

विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यावेळी अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचा जीव वाचला होता. त्या प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्या विमानाचा अपघात झाला नाही. मात्र आपल्या देशात विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमावावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. संजय गांधी, माधवराव सिंधिया, जी एम सी बालयोगी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत.

दोन वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे.

केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.

●●●●●●



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# झोपण्यापूर्वी वेलची खा.. मोठे फायदे



भारतीय स्वयंपाकघरांमध्ये अनेक मसाल्यांचा वापर केला जातो. मसाल्यांमुळे तुमच्या जेवणाची चव तर वाढते त्यासोबतच तुमच्या आरोग्याला फायदे होतात. मसाल्यांमधील अनेक घटक तुमच्या अनेक समस्या दूर करण्यास मदत करते. मसाल्यामधील वेलची तुमच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते.

रात्री जेवल्यानंतर किंवा झोपण्यापूर्वी २ ते ३ वेलची खाल्ल्यामुळे तुम्हाला फ्रेश वाटते आणि तुम्हाला ताजेतवाने होण्यास मदत होते. वेलची खाल्ल्यामुळे तुमचे शरीर निरोगी राहाण्यासाठी फायदेशीर ठरते. आयुर्वेदानुसार, वेलची खाण्याचे अनेक फायदे सांगितले आहेत. रात्री झोपण्यापूर्वी वेलची खाल्ल्यामुळे तुमची पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. तुम्हाला जर जास्त प्रमाणाच ॲसिडिटीचा त्रास होत असेल तर रात्री झोपण्यापूर्वी २ वेलची खाल्ली पाहिजे.

तुम्हाला रात्री अचानक जाग येत असेल तर झोपण्यापूर्वी २ ते ३ वेलची खाव्यात. यामुळे तुम्हाला शांत झोप लागते आणि तुम्हाला जर तोंडातून दुगंधीची समस्या देखील दूर होते. रात्री झोपण्यापूर्वी वेलची खाल्ल्यामुळे सकाळी तुमचे शरीर डिटॉक्स होण्यास मदत होते आणि दिवसभर तुम्ही फ्रेश राहाता.

रात्री झोपण्यापूर्वी वेलची खाल्ल्यास तुमच्या शरीरातील चयापचय सुधारण्यास मदत होते. त्यासोबतच वेलचीमधील औषधी घटक गॅस, ॲसिडिटी, पोटदुखी आणि मळमळ यांच्यां सारख्या समस्या दूर ठेवण्यास मदत करते. त्यासोबतच रात्री वेलची खाल्ल्यामुळे तुमचं अन्न पचण्यास मदत होते आणि अपचनाचा त्रास होत नाही.

तुम्हाला रात्री गाड झोप लागत नसेल तर रात्री झोपण्यापूर्वी २ ते ३ वेलचीचे सेवन करावे. वेलचीमध्ये भरपूर प्रमाणात ॲंटिऑक्सडेंट्स असतात ज्यामुळे तुम्हाला रात्री गाड झोप लागते.

वेलचीचे सेवन केल्यामुळे तुमचा मानसिक तणाव कमी होण्यास मदत होते आणि तुमचं मन शांत राहाण्यास मदत होते.

ताज्या वेलचीचे सेवन केल्यामुळे तुमच्या तोंडामधील दुर्गंधीपासून मुक्ती मिळते. वेलचीमधील गुणधर्म हिरड्यांचे आरोग्य निरोगी राहते. वेलची खाल्ल्यामुळे शरीरातील चयापचय वाढते आणि वजन नियंत्रित राहाण्यास मदत होते. वेलचीमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते.

●●●●●●

## अशोकायन

### स्वागतम् २०२५

मागे वळूनी पाहतांना
काय कमवलं काय गमवलं
याचा घ्यावा आढावा
चुकांची घेऊन दखल
नवा प्लॅन आखावा..

मधुर स्मृती ठेवूनी मनी
कटू स्मृतीला विसरू
नव्या प्रेरणेने नववर्षाचे
चला स्वागत आपण करू..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# अँथेम बायोसायन्सेस लिमिटेडने ३,३९५ कोटी रुपयांच्या आयपीओसाठी डीआरएचपी दाखल केले

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ०१ जानेवारी:

अँथेम बायोसायन्सेस लिमिटेड, नावीन्यपूर्णतेचा ध्यास घेऊन आणि तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करून, कॉन्ट्रॅक्ट संशोधन, विकास आणि उत्पादन क्षेत्रात काम करते. पूर्णपणे एकीकृत संचालन असलेली ही कंपनी औषधांचा शोध लावणे, ती विकसित करून त्यांचे उत्पादन करण्याचे काम करते. अँथेम बायोसायन्सेस लिमिटेडने सेबीकडे आयपीओसाठी ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) दाखल केले आहे. या बंगलोर-स्थित कंपनीच्या आयपीओमध्ये समभाग विक्री करू इच्छिणाऱ्या समभागधारकांकडून ३,३९५ कोटी रुपयांपर्यंतचे इक्विटी समभाग विक्रीसाठी प्रस्तुत करण्यात आले आहेत.

विक्रीसाठीच्या ऑफरमध्ये समभाग विक्री करू इच्छिणारे प्रमोटर गणेश सांबशिवम आणि के रवींद्र चंद्रप्पा यांच्याकडून प्रत्येकी ३५० कोटी रुपयांपर्यंतचे इक्विटी समभाग विक्रीसाठी प्रस्तुत करण्यात येत आहेत. समभाग विक्री करू इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांमध्ये व्हिरीडीटी टोन एलएलपी (ट्रू नॉर्थ) यांच्याकडून १३२५ कोटी रुपयांपर्यंत, पोर्ट्समाऊथ टेक्नॉलॉजीज एलएलसी यांच्याकडून ३२० कोटी रुपयांपर्यंतच्या इक्विटी समभागांचा समावेश आहे.

समभाग विक्री करू इच्छिणाऱ्या इतर समभागधारकांमध्ये प्रकाश करियाबेटन यांच्याकडून ८० कोटी रुपयांपर्यंत आणि के रामकृष्णन यांच्याकडून १० कोटी रुपयांपर्यंतच्या इक्विटी समभागांच्या समावेश असणार आहे. २००६ साली सुरु करण्यात आलेल्या या कंपनीच्या दोन ऑपरेशनल मॅन्युफॅक्चरिंग फॅसिलिटीज भारतामध्ये आहेत, दोन्ही कर्नाटकमध्ये असून यापैकी युनिट १ बोम्मासांद्रा येथे आणि युनिट २ हरोहल्ली येथे आहे. त्यांची वार्षिक कस्टम सिंथेसिस क्षमता आणि फर्मेंटेशन क्षमता अनुक्रमे २७० केएल आणि १४२ केएल आहे. (३० सप्टेंबर २०२४ नुसार) हरोहल्ली येथे युनिट ३ चे बांधकाम सुरु आहे. २०२५ च्या पहिल्या सहामाहीत ते पूर्णपणे सुरु होईल अशी अपेक्षा आहे.

अँथेमच्या व्यवसायामध्ये सीआरडीएमओ (कॉन्ट्रॅक्ट संशोधन, विकास आणि उत्पादन) सेवा आणि विशेष सामग्रीचे उत्पादन व विक्री यांचा समावेश आहे. न्यू केमिकल एन्टिटी (एनसीई) आणि न्यू बायोलॉजिकल एन्टिटी (एनबीई) लाईफसायकल्स मध्ये सर्वसमावेशक, एकीकृत आणि कस्टमाइज करता येईल अशा सीआरडीएमओ सेवांची श्रेणी ही कंपनी प्रस्तुत करते. आरएनएआय, एडीसी, पेप्टाइड्स, लिपिड्स आणि ऑलिगोन्युक्लेओटाइड्स यासारख्या विविध मॉडेलिटीज आणि फ्लो केमिस्ट्री, एंझामॅटिक प्रक्रिया, बायोकॅटलिसिस आणि फर्मेंटेशन यासारखी उत्पादन तंत्रे यामध्ये या कंपनीने आपले मजबूत स्थान निर्माण केले आहे. औषधे विकसित करण्यासाठी तंत्रज्ञान क्षमतांची एक विशाल श्रेणी ही कंपनी प्रस्तुत करते.

आर्थिक वर्ष २०२३ मध्ये या कंपनीचे संचालनातून मिळणारे उत्पन्न १०५६ कोटी रुपये होते जे आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ३४.३% नी वाढून १४१९ कोटी रुपयांवर पोहोचले. ३१ मार्च २०२४ रोजी समाप्त झालेल्या वर्षांमध्ये करपश्चात नफा ३६७ कोटी रुपये नोंदवण्यात आला होता. या ऑफरचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स जेएम फायनान्शियल लिमिटेड, सिटीग्रुप ग्लोबल मार्केट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, जे पी मॉर्गन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि नोमुरा फायनान्शियल अड्वायजरी अँड सिक्युरिटीज (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड हे आहेत.

# श्री क्षत्रिय कोसले माळी समाज (विदर्भ)च्या वतीने क्रांतीजोती सावित्रीमाई फुले जयंती ५ जानेवारीला आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ०१ जानेवारी:

श्री क्षत्रिय कोसले माळी समाज (विदर्भ), नागपुर संस्थेच्या वतीने रविवार दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता दिघोरी नाका, उमरेड रोड, साईनगर, नागपूर येथे क्रांतीजोती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती उत्सवाच्या आयोजन करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिति श्री किशोर कन्हेरे माजी विश्वस्त ना.सु.प्र., उद्घाटक श्रीमती संध्याताई गुरनुले माजी अध्यक्षा जि.प. चंद्रपूर, अध्यक्षस्थानी प्राचार्य श्री नामदेवराव जेंगठे ओबीसी विचारवंत ब्रह्मपुरी, प्रमुख उपस्थिती श्री अविनाशभाऊ ठाकरे, श्री नामदेवराव कोकोडे, श्री. गोविंदराव वैराळे, श्री. मधुसुदनजी देशमुख, श्री. दशरथजी आदे यांची उपस्थिती लाभणार आहे.

तसेच प्रसिद्ध कवीयत्री, युवा वक्ता कुमारी प्रतीक्षा विठ्ठलराव गुरूनुले सामाजिक विचारवंत, यवतमाळ यांची उपस्थिती राहील.

या उत्सवात समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या



बंधू-भगिनींचाजाहीर सत्कार करण्यात येणार आहे. यात विदर्भातील प्रगतशील शेतकरी, युवा उद्योजक, व्यवसायी, सामाजिक कार्यक्षेत्रातील व्यक्तिमत्व अशा क्षेत्रातील काही समाज बांधवांना समाविष्ट करण्यात येईल. समाजातील बांधवांच्या कलागुणांना प्रोत्साहित करण्याकरिता भगिनी मंडळीद्वारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची प्रस्तुती करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण कु. सखिला मुखरू गुरनुले एक पात्री कलाकार मी सावित्री बोलते दिभना गडचिरोली, आकाश महाडोळे मिमिक्री आर्टिस्ट वणी यवतमाळ, कु. हर्षदा रामदास वसाके शास्त्रीय कथ्थक नृत्यांगना (नॅशनल डान्स चॅम्पियनशिप २०२२) राहणार आहे. या कार्यक्रमात सर्व समाज बांधवांनी सामाजिक कार्यात सहभाग घेऊन समाजासाठी योगदान द्यावे असे आवाहन कोसरे माळी संघटना नागपूर तर्फे करण्यात येत आहे.

# सर्वसामान्यांसाठी असलेल्या योजना त्यांच्यापर्यंत सुलभतेने पोहचाव्यात यावर भर : बावनकुळे

## कोराडी महालक्ष्मी ते अयोध्या तिर्थदर्शन यात्रेस प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ०१ जानेवारी:

केंद्र सरकार व राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहचाव्यात यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. सर्वसामान्यांना अधिकाधिक योजनांचा लाभ व्हावा यादृष्टीने मुख्यमंत्री तीर्थदर्शन यात्रा ही अनेक गोरगरिबांना आपल्या इच्छांची पूर्ती करणारी यात्रा म्हणून महत्वाची आहे. यादृष्टीने विचार करुन कोराडी महालक्ष्मी जगदंबा संस्थेच्यावतीने महालक्ष्मी ते अयोध्या तिर्थयात्रेचा आज शुभारंभ करण्यात आला. पहिल्याच यात्रेत आमच्या कष्टकरी लाडक्या बहिणींना अयोध्या येथील तिर्थदर्शनाचा लाभ होत असल्याचा मनस्वी आनंद आहे असे प्रतिपादन



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

कोराडी महालक्ष्मी संस्थांच्यावतीने आयोजित या तिर्थयात्रेचा शुभारंभ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी आमदार टेकचंद सावरकर व इतर मान्यवर उपस्थित होते. वातानुकुलीत बसद्वारे सुमारे ५४ महिला यात्रेकरुंना यात संधी मिळाली.

महिण्यातून दोन वेळा ही यात्रा अयोध्याला जाईल. आजच्या यात्रेकरुमध्ये अनेक बहिणी या दररोज रोजीवर कामाला जाणाऱ्या आहेत. तिर्थयात्रा करण्याचे स्वप्न त्यांनी मोठ्या आशेने बाळगले आहे. आर्थिक परिस्थितीमुळे आजवर पूर्ण न होणारी त्यांचे हे स्वप्न या तिर्थयात्रेच्या माध्यमातून पूर्ण होत आहे हे अधिक महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. कालांतराने ही योजना मुख्यमंत्री तिर्थदर्शन यात्रेच्या स्वरुपात अधिक परिपूर्ण करु असे त्यांनी स्पष्ट केले.

# ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे पारदर्शक व गुणवत्तापूर्ण करावी

## ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ०१ जानेवारी:

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामात पारदर्शक व गुणवत्तापूर्ण कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

मंत्रालयात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या तसेच कंत्राटी कामगार वेतन थकबाकीबाबत आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे सचिव सतिश चिखलीकर, वित्तीय नियंत्रक अभय धांडे, उपसचिव प्रशांत पाटील, कार्यासन अधिकारी विवेक शिंदे, अच्युत इप्पर, विजय चौधरी उपस्थित होते.

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री श्री. गोरे म्हणाले की, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील निकषात बदल करण्यासाठी केंद्र सरकारसोबत चर्चा करण्यात येईल, जेणेकरुन कामात सुलभता निर्माण होईल. ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विस्तारण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात यावेत. ग्रामीण तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत पुढील कामे मंजूर करण्यासाठी बाह्य वित्तीय संस्थांकडून आर्थिक मदत घेण्याबाबत प्रयत्न करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कंत्राटी कामगार वेतन थकबाकीसंदर्भातील आढावाही यावेळी घेण्यात आला.

# धान खरेदीच्या ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ०१ जानेवारी:

खरीप पणन २०२४-२५मधील धान खरेदीच्या ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी यापूर्वी दि. ३१ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु बरेच शेतकरी नोंदणी अभावी वंचित असल्यामुळे शासनाकडून ऑनलाईन शेतकरी नोंदणीसाठी १५ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

ही मुदतवाढ ही अंतिम असून यापुढे धान, भरडधान्य उत्पादक शेतकरी नोंदणीस कोणत्याही कारणास्तव मुदवाढ देण्यात येणार



नाही. तरी १५ जानेवारी २०२५ पूर्वी धान खरेदीकरीता ऑनलाईन शेतकरी नोंदणी करावी. नोंदणी करताना शेतकऱ्यांचा ऑनलाईन ७/१२, पीक पेऱ्यांची नोंद, आधार कार्ड, चालु बँक खाते आवश्यक असणार आहे. आपल्या नजीकच्या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी अजय बिसने यांनी केले आहे

# धान भरडधान्य खरेदीसाठी शासकीय पोर्टलवर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ०१ जानेवारी:

शासकीय खरेदी केंद्रावर धान/भरडधान्य विक्रीसाठी शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. त्याकरिता ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत होती. मात्र अनेक शेतकरी नोंदणीपासून वंचित असल्याने विविध लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार शासनाने नोंदणीसाठी १५ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ दिल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्हमार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून धान/ भरडधान्य खरेदी केले जाते. त्यासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे.

खरीप पणन हंगाम २०२४-२५मध्ये शेतकरी नोंदणीकरिता ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत अंतिम मुदत होती. मात्र अनेक भागातील शेतकरी नोंदणीपासून वंचित असल्याने शासनाने नोंदणीसाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी अर्थ व नियोजन विभागाचे राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार राजू कारेमोरे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधींनी केली होती. या मागणीस अनुसरून शेतकरी नोंदणीची मुदत १५ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. याबाबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या उपसचिव राजश्री सारंग यांनी महाराष्ट्र राज्य कोऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन आणि महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळासह संबंधित एजन्सी यांना याबाबत कळवले आहे.

ही मुदतवाढ अंतिम असून विहित मुदतीत शेतकऱ्यांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन श्री. मुंडे यांनी केले आहे.

# निवृत्तीवेतन धारकांचे माहे डिसेंबर २०२४ चे वेतन विलंबाने

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ०२ जानेवारी:

वरिष्ठ कोषागार कार्यालय नागपूर अंतर्गत निवृत्तीवेतन घेणाऱ्या सर्व राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे माहे डिसेंबर २०२४ चे निवृत्तीवेतन अदा करण्यास २ ते ३ दिवस विलंब होणार असल्याची माहिती अपर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) यांनी दिली आहे.

निवृत्तीवेतन धारकांचे हयातीचे दाखले संगणकीय प्रणालीत समाविष्ठ करण्याचे काम सुरु असल्यामुळे तसेच निवृत्तीवेतन धारकांचे वेतन ज्या बँकामधून आहरीत करण्यात येते त्या बँकांकडून जीवन प्रमाणपत्राच्या नोंदवह्या उशीराने प्राप्त झाल्याने निवृत्तीवेतन अदा करण्यास २ ते ३ दिवस विलंब होणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# महत्वाकांक्षी प्रकल्पांच्या वॉर रूम साठी विविध विभागप्रमुखांची टीम गठीत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ०१ जानेवारी:

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प नागपुरात साकारत आहेत. यातून रोजगार निर्मितीसह आर्थिक विकासाला मोठे बळ प्राप्त होणार आहे. हे प्रकल्प जलदगतीने प्रत्यक्षात साकारण्यासाठी संबंधित विविध विभागांचा समन्वय व विविध शासकीय जबाबदारी वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. यादृष्टीने प्रशासकीय पातळीवरचा अनुभव लक्षात घेता मुंबईच्या धर्तीवर नागपूर येथेही वॉर रूम केली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचीएक टीम





तयार करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे वॉर रूमसंदर्भात एक व्यापक आढावा बैठक जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे व इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रस्तावित विकासकामे व योजनांबाबत संबंधित कार्यान्वयन विभागांना विहित प्रपत्र देण्यात येणार आहेत. त्या-त्या विभागांना त्यानुसार संबंधित प्रकल्पांची माहिती विहित प्रपत्रात भरावी लागणार आहे. या माहितीचा आढावा प्रत्येक टप्प्यांवर घेण्यात येणार आहे. आवश्यकता भासल्यास स्वतंत्र याबाबत पोर्टल विकसित करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी स्पष्ट केले. सद्यस्थितीत जर एनआयसीकडे एखादे पोर्टल वापरता असेल तर त्याबाबत चाचपणी करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागप्रमुखांना दिल्या. यासाठी निश्चित कार्यपद्धती दोन दिवसांमध्ये ठरविण्यात येऊन ती संबंधित विभागप्रमुखांना पाठविण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# नायलॉन मांजा प्रतिबंधासाठी व्यापक तपासण्या व कडक कारवाई करा : जिल्हाधिकारी

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ०१ जानेवारी:

नायलॉन मांजा मानवी जिवित व पशुपक्ष्यांच्या दुखापतीस, अपघातास कारणीभूत ठरतो. त्यामुळे त्याची वाहतूक, विक्री व वापर जिल्ह्यात पूर्णपणे रोखण्यासाठी व्यापक तपासण्या आणि कडक कारवाई करावी, असे आदेश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मकरसंक्रांतीच्या अनुषंगाने नायलॉन मांज्याची अवैध वाहतूक, विक्री व वापरावर बंदी आणून विक्रेत्यांवर कारवाई आदी पूर्वतयारीसाठी बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. महापालिकेचे आयुक्त डॉ. सुनील लहाने, उपवनसंरक्षक डॉ. कुमार स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी महेश भिवापूरकर, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी डॉ. विश्वनाथ वडजे, स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. शंकर शेळके व इतर अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, नायलॉन मांजाचा वापर मानवी जिविताबरोबरच पशुपक्ष्यांनाही घातक ठरतो.



नायलॉन, सिथेंटिक मांजाबरोबरच ग्लास कोटेड कॉटन थ्रेड मांजाही घातक आहे. त्यामुळे त्याची विक्री, वापर, वाहतूक पूर्णपणे रोखणे आवश्यक आहे. महापालिका, नगरपालिका, पोलीस, प्रदूषण नियंत्रण मंडळ, वनविभाग आदी यंत्रणांनी व्यापक तपासण्या व कठोर कारवाई करावी.

जिल्हा पोलीसांकडून अकोला जिल्ह्यातील २० गुन्ह्यांत २१ आरोपींवर कारवाई, तसेच ५ लक्ष ७५० रू. किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महापालिकेडून ८७ ठिकाणी तपासणी करून ३८ रील मांजा जप्त करण्यात आला, तसेच संबंधितांना २३ हजार रू. दंड ठोठावण्यात आला, अशी माहिती डॉ. लहाने यांनी दिली. महापालिकेने केलेल्या कारवाईत दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे निर्देश जिल्हाधिका-यांनीयावेळी दिले.

नायलॉन मांज्याची अवैध वाहतूक, विक्री व वापरावर बंदी आणून विक्रेत्यांवर कारवाई करण्यासाठी २०२२ मध्ये पथक गठित करण्यात आले. या पथकाने अद्यापपावेतो केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा. जिल्ह्यात नायलॉन मांजाचे उत्पादन होते किंवा कसे, याबाबत एमपीसीबीने वेळोवेळी तपासण्या कराव्यात. नायलॉन मांजा विक्रीबाबत नागरिकांना तक्रार द्यावयाची असल्यास तसे दूरध्वनी क्रमांक जाहीर करण्याचे निर्देशही जिल्हाधिका-यांनीदिले. जिल्ह्यात नगरपालिकांकडून घंटागाडीद्वारे उद्घोषणा, पोस्टर आदी जनजागृतीविषयक उपक्रम राबवले जात असल्याचे डॉ. वडजे यांनी सांगितले.

याठिकाणी करा तक्रार

नायलॉन मांजाची विक्री, वाहतूक व वापर होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी पुढाकार घेऊन संबंधित यंत्रणेकडे तक्रार दाखल करण्याचे आवाहन जिल्हाधिका-यांनी केले. महापालिका क्षेत्रात असे आढळल्यास नागरिकांनी दक्षिण झोनल अधिकारी देवीदास निकाळजे यांच्याकडे ९८५०२०३१६१ या, पूर्व झोनल अधिकारी विजय परतवार यांच्याकडे ७७०९१ ७७६६६ या, पश्चिम झोन अधिकारी दिलीप जाधव यांच्याकडे ८२०८७५४४४१

या आणि उत्तर झोन अधिकारी विठ्ठल देवकाते यांच्याकडे ९८२२५६३२६८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर माहिती द्यावी. तसेच अकोट शहरात अक्षय फरतोडे भ्र. क्र. ९०११९५६५६२, तेल्हारा शहरात रूपेश जोगदंड भ्र. क्र. ७९७२६५८१३४, पातूर येथे श्रीकृष्ण पाटील भ्र. क्र. ९४२१७४६९४२, बार्शिटाकळी शहरात आदिल शेख भ्र. क्र. ९८२३६९१६६३, बाळापूर शहरात अरविंद जाधव भ्र. क्र. ८३०८३२७३०८, मूर्तिजापूर शहरात नरसिंह चावरे भ्र. क्र. ८३०८००६०८५, तसेच हिवरखेड येथे कैलास डांगे भ्र, क्र. ९७६६७२४१०७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# शब्दकोडे क्रमांक २००५



आडवे शब्द :-
१) हातपाय पसरावयास लावणारे दोन सण
११) मार्ग, रस्ता
१२) लाज
१३) कांती, तेज
१४) बाजार
१५) नेहमी
१६) सासरी गेलेल्या मुलीच्या आई वडिलांचे घर
१७) उजाड, खिन्न
१९) नवे, न वापरलेले
२१) यात्रेस जाणे
२२) नगद
२३) माता-पिता
२७) घर फिरले की घराचे ** पण फिरतात
२८) टरफल
२९) पद्धत
३०) धपाटा
३१) खोबरे घालून केलेला भात
३४) मेहनत, श्रम, त्रास
३६) वाळा गवताचे सुगंधी मूळ
३८) वेळ, समय (हिं.)
३९) सिद्ध
४०) भीती
४३) अवाजवी
४४) तात्काळ, लगेच
४६) गोड्या पाण्यातील एक मासा
४७) मुसलमानांचा उपवासाचा महिना
४९) च्यासह
५१) शासकीय
५२ ) उत्सव
५३) माणसाळलेले, पाळलेला
५५) प्रतिसाद हाक
५७) संतापी
५९) नेत्रसुखद
६२) नाजूक
६४) छोटे कुबड
६७) चरण
६८) कहाणीतील गाव
७२) रवाळ
७४) अभिनेता
७५) दावानल
७६) उग्र, अत्यंत तिखट
७८) दाह अग्नी
७९) विशेष
८०) समुद्र
८१) पुन्हा पुन्हा

उभे शब्द :-
१) दीपक
२) रस्त्यावर अडवून लुटण्याचे प्रकार
३) श्रीरामाच्या वडिलांचे नाव
४) पावसाची झड
६) रामावर विश्वास टाकून
७) इमारतीचा मूळ आधार
८) पहारा करणारा
९) मोठी उथळ वाटी
१०) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
१८) बगल
१९) कोपरा, बाळंते
२०) मत्स्य
२१) श्रीविष्णूचे बटु रूप
२३) ढग, लवकर
२४) सांभाळ, रक्षण
२५) पाण्याने भरलेला ढग
२६) बागवान
२७) वायू, हवा, वैताग(बो.भा.)
२८) समुद्रकिनारा
३२) रुधिर
३३) भाग्यवंत
३४) करुणा, कीव
३५) किल्ल्यावरचा अधिकारी
३७) शरीराने मोठा, जाडगेला
३९) काकडीचा कीस, तांडळाचे पीठ आणि गूळ घालून केलेला पदार्थ
४१) पृथ्वी
४२) श्रीकृष्णाचे एक नाव
४३) चुकून, नकळत
४५) सैन्याला मालपुरवठा
४६) ठेकेदार
४८) चामखीळ
५०) गीत, गाणे
५३) बसण्याची लाकडी फळी
५४) कर्णेंद्रिय
५५) तुलनेतील सारखेपणा
५६) प्रयत्नावाचून, आपले आपण
५८) सैनिकांचे पथक
६०) मृत्युदाता, कालपुरुष
६१) सुंदर तरुणी
६२) आंब्याची बी
६३) कपाळ
६५) कापणे (इं.)
६६) घट्ट, तणावाची स्थिती
६७) झाडाभोवतीचा कट्टा
६९) स्वरूपानंद स्वामींच्या समाधीचे रत्नागिरी जवळचे गाव
७०) बाज विणण्याची सुती पट्टी
७१) धोबी
७२) मनाचा ओढा
७३) लाकडी जिना
७४) गाव
७७) माळ, सर
७८) पाणी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# राज्य नाट्य स्पर्धेत 'द वल्चर अँड द लिटील गर्ल' प्रथम

## होमीसाईड द्वितीय, थलाई कुत्थलला तृतीय पारितोषिक

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. १:** महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस 'द वल्चर अँड द लिटील गर्ल' या नाटकाला मिळाले आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य संचालक विधीषण चवरे यांनी आज, मंगळवारी हा निकाल घोषित केला. या स्पर्धेचे द्वितीय पारितोषिक होमीसाईड या नाटकाला देण्यात आले असून तृतीय पुरस्कार थलाई कुत्थलला मिळाला आहे.

सिपना महाविद्यालयाच्या अरविंद लिमये सभागृहात १३ ते २६ डिसेंबरदरम्यान अमरावतीची नाट्य स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत एकूण १४ नाटके सादर झाली. 'द वल्चर अँड द लिटील गर्ल' हे नाटक पंचशील बहुउद्देशीय स्वयंसेवी संस्थेने सादर केले होते. तर



होमीसाईडचे सादरीकरण अंबापेठ क्लबने आणि थलाई कुत्थलचे गंधर्व बहुद्देशीय संस्थेने केले होते. नाटकाच्या विजयासोबतच या नाट्य संस्थांच्याही लौकीकात भर पडली आहे.

दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक 'द वल्चर अँड द लिटील गर्ल' या नाटकासाठी राहुल वासनकर यांना देण्यात आले. तर द्वितीय क्रमांक सचिन गोटे (नाटक -होमीसाईड) यांनी पटकावला. परीक्षकांच्या नजरेतून थलाई कुत्थल या नाटकाची प्रकाशयोजना अगदी उत्कृष्ट होती. त्यामुळे ती साकारणाऱ्या दीपक नांदगावकर यांना प्रथम पारितोषिक देण्यात आले. द्वितीय पारितोषिक अमोल आढाव (नाटक -'द वल्चर अँड द लिटील गर्ल') यांना मिळाले. नेपथ्याचा प्रथम पुरस्कार होमीसाईडचे डॉ. प्रशांत देशपांडे यांना तर द्वितीय अंधारडोहचे चेतन बरदिवे यांच्या नावाने जाहीर झाला आहे.

त्याचवेळी रंगभूषेचे प्रथम पारितोषिक निलेश ददगाळ (नाटक स्वधर्म) तर द्वितीय लालजी श्रीवास (नाटक -थलाई कुत्थल) यांना घोषित झाले. उत्कृष्ट अभिनयाचे रौप्यपदक गणेश वानखडे (नाटक - 'द वल्चर अँड द लिटील गर्ल') आणि शर्वरी ठाकरे (नाटक- होमीसाईड) यांना घोषित झाले असून अभिनयाचे गुणवत्ता प्रमाणपत्र शिल्पा धुंडियाल, रचना आष्टीकर, संगीता कडू, रिद्धी

चाबुकस्वार, विनोद सुरोसे, प्रसाद खरे, गोपाल दामदार, आकाश पांडे यांना दिले जाईल. या स्पर्धेसाठी चंद्रकांत शिंदे, शशिकांत चौधरी व किर्ती मानेगावकर यांनी काम पाहिले. दरम्यान नाट्य स्पर्धेतील सर्व विजेत्यांचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, अपर मुख्य सचिव विकास खारगे आणि अ.भा. नाट्य परिषदेच्या मध्यवर्ती संघटनेचे विश्वस्त डॉ. प्रशांत देशपांडे यांनी अभिनंदन केले आहे.

# अतिवृष्टी व गारपीटचे रखडलेले अनुदान शेतकऱ्यांना तात्काळ द्या

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. १:** अतिवृष्टी व गारपीटचे रखडलेले अनुदान शेतकऱ्यांना तात्काळ द्या अन्यथा उच्च न्यायालयात याचिका दाखल करू, असा इशारा किसान न्याय हक्क संघर्ष समितीने दिला आहे. वरूड तालुक्यात सन २०२३ मध्ये अतिवृष्टी झाली होती. त्यावेळी शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले. परिणामी शासनाने हेक्टरी अनुदान जाहीर केले होते. परंतु त्या अनुदानाची रक्कम अजूनही अप्राप्त आहे.

शेतकऱ्यांना शासनाने तीन हेक्टरपर्यंतच्या मर्यादित अनुदान जाहीर केले होते. परंतु प्रशासनाच्या दिरंगाईमुळे अजूनही अनुदान प्राप्त झाले नाही. दरम्यानच्या काळात एप्रिल २०२४ मधे वरूड तालुक्यात गारपीट झाली. त्यावेळीही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. शासनाने गारपीटग्रस्तांनाही अनुदान जाहीर केले. परंतु त्यामध्ये प्रशासनाच्या चुकीने पन्नास हजार




रुपयांच्यावर मिळणारे अनुदान अडकले आहे.

अनुदानाच्या रकमेसाठी शेतकरी रोज तहसील कार्यालयात हेलपाटे मारत आहेत.

तहसील प्रशासन सांगते की काही दिवसात पैसे येणार पण ही निव्वळ शेतकरी यांची दिशाभूल आहे. त्यासाठी आता शेतकरी न्याय हक्क समितीने वरूडचे तहसीलदार, अमरावतीचे जिल्हाधिकरी व शासनाला निवेदन देऊन यावर तोडगा काढून सर्व पात्र उर्वरित शेतकऱ्यांना अतिवृष्टी व गारपीट चे अनुदान द्या, असे निवेदन दिले आहे. यावेळी संघर्ष समितीचे पदाधिकारी सप्नील खांडेकर, तृषार निकम, नरेंद्र उर्फ बबलू पावडे, सुधाकर दोड, बाबाराव मंगुळकर, मोहन खुजे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### ही आहे खरी अडचण

**प्रशासनाने अतिवृष्टी व गारपीट हे एकाच आर्थिक वर्षात दाखवले. त्यामुळे शेतकऱ्यांना गारपीटचे अनुदान मिळणार नाही, असे संकेत प्रशासनातील काही अधिकारी यांनी दिले आहे.**

**सध्य स्थितीत अतिवृष्टीचे शिल्लक पात्र शेतकरी ४ हजार ४१४ असून त्यांचे ११ कोटी ५५ लाख ३८ हजार ६०० रुपये व गारपीट २०२४ चे पात्र शेतकरी १०८३ असून त्यांची रक्कम ३४ कोटी २४ लाख ६ हजार ६१२ रुपये आहे.**

# उच्च शिक्षणाची जबाबदारी असलेल्या विद्यापीठावर आता शाळांचीही जबाबदारी

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. १:** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (एनइपी) शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या तरतुदी आणि त्यानुसार शिक्षक, मुख्याध्यापकांनी अंगीकारावयाची पद्धती समजून सांगण्यासाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. 'स्कुल कनेक्ट २.०' असे या उपक्रमाचे नाव आहे.

एरवी विद्यापीठ हे केवळ उच्च शिक्षणाशी संबंधित घडामोडींकडेच लक्ष पुरविते. परंतु सेवाभाव तसेच शैक्षणिक सहाय्य या परिभाषेनुसार शासनानेच आता विद्यापीठांवर ही जबाबदारी सोपविली आहे. त्यानुसार विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांच्या परिसरात ज्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालये आहेत, त्यांना एनइपीबाबत माहिती दिली जाईल. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात कार्यशाळेचे आयोजन केले जाणार आहे. यामध्ये संबंधित शाळांचे विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक आणि पालक यांना सहभागी करुन घेतले जाईल. तसे निर्देश कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी संलग्नित सर्व महाविद्यालयांना दिले आहेत.

या कार्यशाळांमधून इयत्ता नववी ते बारावीपर्यंतच्या शाळा, महाविद्यालयांना ब?ळकटी मिळेल. त्या ठिकाणी शिक्षण घेणा?या विद्यार्थ्यांना विद्यापीठांनी तयार केलेल्या अनुभवाधिष्ठित, बहुविद्याशाखीय लवचिक अभ्यासक्रम, मूल्यमापनातील श्रेयांक पध्दती आणि त्यामुळे आलेली लवचिकता, कल्पक, व्यावसायिक आणि कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम याचीही माहिती मिळेल. दहावी-बारावीनंतर आवडीचे अभ्यासक्रम निवडण्यासाठी मार्गदर्शन केले जाईल. शिवाय रोजगाराभिमुख अभ्यासक्रमासाठी असलेल्या संधी, पदवी अभ्यासक्रमातील संधी, पदवी स्तरावर विद्यापीठातील पदव्युत्तर विभागांमध्ये कॅम्पस टूरचे आयोजन, प्रयोगशाळा, तेथील उपकरणे,




विविध भौतिक सुविधा आदी बार्बीविषयीही माहिती दिली जाईल.

यासंदर्भात महाविद्यालयांचे प्राचार्य आणि माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांनी (इयत्ता नववी ते बारावी) आपापसांत संपर्क साधावा, असे आवाहनदेखील कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरूडॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले.

# बीड हत्येप्रकरणी ग्रामपंचायतींना ठोकले कुलूप



## जिल्ह्यातील १२४८ ग्रामपंचायतींचे कामकाज बंद

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. १ :** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ प्रदेश सरपंच संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देवून जिल्ह्यातील १ हजार २४८ ग्रामपंचायती तीन दिवस बंद ठेवण्याच्या निर्णय घेतला. मंगळवारी दि. ३१ डिसेंबर रोजी सरपंच संघटनेने ग्रामपंचायतींना कुलुप लावले. या आंदोलनामुळे गावगाडा ठप्प पडला असून, अनेक नागरिकांची कामे प्रभावित झाली आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग ग्रामपंचायतचे आदर्श सरपंच संतोष देशमुख यांनी विकास कामातून अनेक पुरस्कार मिळवून दिले. गावाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करीत होते. त्यांचे अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकारामुळे महाराष्ट्रातील सर्व सरपंचाच्या मनात अतिशय भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्येचा कट रचणाऱ्या सर्व आरोपींना तत्काळ अटक करून प्रकरण फास्ट ट्रक कोर्टच्या माध्यमातून फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी सरपंच संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या घटनेच्या निषेधार्थ जिल्ह्यातील एक हजार २४८ ग्रामपंचायती गुरूवार दि. २ जानेवारी पर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे. मस्साजोग प्रकरणाची दखल न घेतल्यास महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेच्या वतीने ग्रामपंचायतचे बेमुदत कामबंद आंदोलन करू, असाही इशारा निवेदनातून दिला. बंदच्या पहिल्या दिवशी या आवाहनाला सरपंच व सदस्यांनी शंभर टक्के प्रतिसाद देत ग्रामपंचायतींचे कामकाज बंद ठेवले. ग्रामपंचायतीचे कामकाज पुढील दोन दिवस ठप्प होणार असून याचा फटका नागरिकांना बसणार आहे. सरपंच सुरक्षेसाठी कडक कायदा केला जावा भमस्साजोग ग्रामपंचायतचे आदर्श सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली.


## कार्यालय नगर परिषद वानाडोंगरी

### त. हिंगणा, जि. नागपूर

दूरध्वनी क्र. : ९८२३५१४९९५, ई-मेल : mcwanadongari2016@gmail.com

जावक क्रमांक: आस्थापना विभाग/०४/२०२४-२०२५ दिनांक : ०१/०१/२०२५

### निविदा सूचना

सुचित करण्यात येते की, नगरपरिषद वानाडोंगरी मध्ये किरकोळ कार्यालयीन फर्निचर, टेबल, चेयर, कर्टन व इतर सजावटीचे साहित्य, किरकोळ दुरूस्ती, तसेच डेकोरेशन सेटअप, जेवण, नास्ता, फोटो सहित फ्रेमिंग इतर किरिकोळ साहित्याचा समावेश असून सदर साहित्य खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे तीन कोटेशन मागविणे करिता ऑफलाइन निविदा पत्रक मागविण्यात येत आहे.

निविदा प्राप्त करण्याचा कालावधी :- दि. ०२/०१/२०२५ ते ०८/०१/२०२५ ला ५.०० वा. पर्यंत

निविदा स्विकारण्याचा कालावधी :- दि. ०८/०१/२०२५ ला सायंकाळी ५ वाजेपर्यंत.

मुख्याधिकारी
नगरपरिषद वानाडोंगरी


# पालकमंत्रीपदावर भाजपचा दावा, पण मित्रपक्षांचीही नजर

■ महासागर प्रतिनिधी,

**नागपूर, दि. १ :** विधानसभेच्या निवडणुका होऊन आता एक महिन्याच्या कालावधी लोटला असून अजूनही जिल्ह्य पालकमंत्री पदाचा तिढा कायम असून आता नवीन वर्षातच याचा फैसला होणार हे उघड आहे. दरम्यान जिल्ह्यात पुन्हा मोठा भाऊ म्हणून सिद्ध झालेल्या भाजपचा पालकमंत्री म्हणून भरभक्कम दावा असला तरी दोन्ही मित्र पक्षही इच्छुक असून या महत्वाच्या पदावर नजर ठेवून आहेत.

मागील २३ नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला. राज्यात महायुतीला बहुमत मिळाले असले तरी भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) या मित्र पक्षातील रुसवे फुगवे, अंतर्विरोध, समन्वयाचा अभाव यामुळे सरकार स्थापन होण्यास विलंब झाला. पहिल्या टप्प्यात केवळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे, अजित पवार या दोन उपमुख्यमंत्र्यांनीच शपथ घेतली.यानंतर गृह आणि अन्य मलाईदार खात्यावरून मंत्री मंडळ विस्तार रखडला. एकदाचा मंत्री मंडळ विस्तार झाला पण खाते वाटप रखडले. आता पालकमंत्री पदाचा तिढा कायम असल्याचे चित्र आहे. निवडणुकीला एका महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटूनही बुलढाण्यासह अन्य जिल्ह्याचे पालक अजूनही ठरले . आज सरत्या वर्षाने निरोप घेतला असल्याने आता नवीन वर्षातच पालकमंत्री मिळणार असे चित्र आहे. बीड आणि परभणी जिल्ह्यातील घडामोडी मुळे नवीन वर्षातही पालकांची नियुक्ती लवकर होणार नाही असे विचित्र चित्र आहे.



### फुंडकरांची दाट शक्यता पणः

दरम्यान विधानसभा निवडणुकीत बुलढाणा जिल्ह्यातील ७ पैकी वाट्याला आलेल्या चारही जागा जिंकून भाजपने आपली ताकद आणि प्रभुत्व सिद्ध केले. निवडणुकीपूर्वी फार्मात असलेल्या शिवसेना शिंदे गटाला तीन पैकी बुलढाण्याची एकच जागा तीही केवळ ८४१ मतांनी राखता आली. मेहकरात माजी आमदार संजय रायमूलकर तर सिंदखेडराजा मध्ये शशिकांत खेडेकर पराभूत झाले. अजितदादा गटाने चमत्कार करीत सिंदखेडराजा मध्ये विजय मिळवला. या तुलनेत भाजपने खामगाव, जळगाव जामोद, मलकापूर आणि चिखली या चार ठिकाणी बाजी मारली. धक्का तंत्र साठी प्रसिद्ध भाजपने ऐनवेळी खामगावचे आमदार आकाश फुंडकर यांना कॅबिनेट मंत्री पद बहाल केले.

यामुळे भाजपचा बुलढाणा जिल्हा पालकमंत्री पदावर जोरकस दावा आहे. त्यातच शेजारील अकोला जिल्ह्याला मंत्रिमंडळ मध्ये संधी नाकारण्यात आली आहे. यामुळे कामगार मंत्री आकाश फुंडकर हे बुलढाणा जिल्ह्याचे पालक राहण्याची दाट शक्यता आहे. मंत्रिपदा सारखीच त्यांना अकोला जिल्ह्याचेही पालकमंत्री म्हणून लॉटरी लागू शकते. त्यांचे पिता दिवंगत पांडुरंग फफुंडकर यांनी अकोल्याचे लोकसभेत प्रतिनिधित्व केले असून त्यांना मानणारा मोठा वर्ग तिथे आहे. त्यामुळे आकाश फफुंडकर यांना पालक पदाचा दुहेरी मान मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र महायुती मधील सुंदोपसुंदी, लाथाळ्या, वर्चस्वाची लढाई लक्षात घेता हे वाटते तितके सोपे नाही. शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजितदादा गट देखील पालकमंत्री पदावर नजर ठेवून आहे. महाआघाडीच्या सरकार मध्ये शिंदे गटाचे गुलाबराव पाटील हे पालकमंत्री राहिले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील विधानसभा लढतीत शिंदे गटाची झालेली वाताहत, दुफळी, खासदार प्रतापराव जाधव विरुद्ध बुलढाणा आमदार संजय गायकवाड असा उघड संघर्ष लक्षात घेता एकनाथ शिंदे गुलाबराव पाटील यांच्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे वृत्त आहे. राष्ट्रवादी ने दीर्घ काळ बुलढाण्याचे पालकत्व सांभाळले आहे.राजेंद्र शिंगणे हे दीर्घ काळ पालकमंत्री राहिले आणि त्यांच्यानंतर दिलीप वळसे पाटील यांनी ही धुरा सांभाळली. दुसरीकडे २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना एकनाथ खडसे, पांडुरंग फुंडकर आणि शेवटच्या टप्प्यात संजय कुटे हे पालक राहिले आहेत. यामुळे पालकमंत्री पदाचा गुंता वाटतो तितका सोपा नाही हे उघड आहे. हा गुंता कधी सुटतो आणि जिल्ह्याला पालक कधी मिळतो हा मुद्धा ऐरणीवर आला आहे. वरकरणी वाटते तसं आकाश फुंडकर पालकमंत्री होतात की ऐनवेळी धक्कातंत्रचा वापर होतो याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधले आहे.


## कार्यालय नगर परिषद कामठी

कमांक नपका/कवि/०२/२०२४ दिनांक - ०१/०१/२०२५

### जाहिर सुचना

सर्व नागरीकांना कळविण्यात येत आहे की, खालील दर्शविलेल्यानुसार घर / प्लॉट क्रमांक वर नाव दाखल खारीज करण्याकरीता अर्जदाराने संबंधीत घराचे कागदपत्र तसेच तहसिल कार्यालय / नझूल कार्यालयाचे रिकार्ड अर्जासह सादर केलेला आहे. न.प. रिकार्डनुसार घर कमांक / प्लॉट क्रमांक वर खालील दर्शविल्याप्रमाणे नावाची नोंद आहे. तरी कुणास नाव दाखल खारीज विषयी आक्षेप असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिध्दी झाल्याचे ७ दिवसाचे आत न.प. कामठी कार्यालयात लेखी आक्षेप व सोबत संबंधीत घराचे कागदपत्रे सादर करावे अन्यथा न.प. रिकार्डमध्ये संबंधित घरावर नाव दाखल करण्यात येईल.

| अ.क्र | वार्ड क्र | घर कमाक | सध्या स्थितीत न.प. रिकॉर्ड मध्ये दाखल असलेले तसेच खारीज करावयाचे असलेल्यांचे नांव व पत्ता | कोणत्या आधारावर नाव दाखल करावयाचे आहे | सादर कागदपत्रानुसार न.प. रिकॉर्ड मध्ये दाखल करावयाचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 13 | NL/22 | विनोद कोठीराम शेन्डे | वारसानपत्रनुसार | विनोद कोठीराम शेंडे / अमीत विनोद शेंडे / कपील विनोद शेंडे |
| 2 | 10 | I/7 (52.00) चौ.मी | मोहम्मद युनुस व मोहम्मद युसुफ | विक्रीपत्रनुसार | रिजवाना परवीन मोहम्मद आसिफ कुरैशी / हफेजा जमाल कुरेशी मोहम्मद साजीद कुरेशी |
| 3 | 10 | F/427 (31.10) चौ.मी | उजाला वी शेख मोहम्मद | वारसानपत्रनुसार | तोसीफ खान अब्दुल मतीन खान मिस्त्री / अलमास नाझीम शेख / मोसीना खान नाबिल शहजाद खान |
| 4 | 12 | NL | गोदरु पुनाजी शेंडे | सम्मतीपत्रानुसार नाव जोडण्याबाबत | गोदरु पुनाजी शेंडे / गजानन गोदरु शेंडे / संतोष गोदरु शेंडे |
| 5 | 11 | NL | किरण नामादास साखरे | बक्षिसपत्रनुसार | सामरीन शेख अब्दुल लतीफ शेख / तनविर शेख व अब्दुल लतीफ शेख |
| 6 | 12 | NL (37.63) चौ.मी | रघुनाथ मगंल डोगरे | वाटणीपत्रनुसार | सुनील रघुनाथ डोगेरे |
| 7 | 11 | NL (220) चौ.मी | राजकुमार शंकर हाडके | बक्षिसपत्रनुसार | दिलीप शंकर हाडके |
| 8 | 31 | C/41 | हसन अली व रनजान अली | हस्तातरण | मुन्सीफ अली व सईदुल हसन |
| 9 | 31 | A/96 | राष्ट्रपाल रामदास मालापुरे | वारसान हक्कानुसार हस्तातरण | आशा राष्ट्रपाल मालापुरे / पियुष मालापुरे / गौरव राष्ट्रपाल मालापुरे |
| 10 | 26 | W/220 | नादीर बालनियों | आखीव पत्रिका नुसार | मोबीन अहमद व नैयमुद्दीन |

मुख्याधिकारी
नगर परिषद कामठी


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




## लिची की चेरी?

मधुमेहींसाठी कोणती फळं योग्य, याबाबत सतत चर्चा झडत असतात. मधुमेह झाल्यानंतर काही फळं आहारातून वर्ज्य करावी लागतात तर काही फळं काही प्रमाणात खाता येतात. काही फळं मधुमेहींसाठी लाभदायी ठरतात. पावसाळ्यात मिळणाऱ्या लिची आणि चेरी या फळांबाबतही हाच प्रश्न उपस्थित होतो.

एखादं फळ किंवा पदार्थ मधुमेहींसाठी योग्य की अयोग्य हे त्याच्या ग्लायसेमिक इंडेक्सवरून ठरतं. कर्बोदकयुक्त पदार्थाच्या रक्तातल्या साखरेवर होणाऱ्या



परिणामावरून त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स (जीआय) ठरतो. कमी ग्लायसेमिक इंडेक्सचे पदार्थ मधुमेहींसाठी योग्य मानले जातात. ५५ किंवा त्यापेक्षा कमी जीआय असणाऱ्या घटकांचा रक्तात साखर सोडण्याचा वेग खूप कमी असतो. म्हणजेच रक्तातली साखरेची पातळी अचानक वाढत नाही. लिची आणि चेरी यांचा जीआय अनुक्रमे ५० आणि २२ आहे. त्यामुळे मधुमेहींनी चेरी खायला हरकत नाही.

आहारतंत्र

मात्र लिची प्रमाणात खायला हवी. एका वेळी मध्यम आकाराच्या चार ते पाच लिची खाता येतील, असं तज्ज्ञ सांगतात.

## धोका गर्भाशयाच्या कर्करोगाचा

भारतामध्ये दर आठ मिनिटांनी एका महिलेचा गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगामुळे मृत्यू होतो. ही हृदयद्रावक सत्यता परिस्थितीची गंभीरता दर्शवते. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग हा महिलांमधील कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंचा प्रमुख कारण ठरतो. या रोगामुळे दरवर्षी ७६ हजार महिलांचा मृत्यू होतो. भारतातील महिलांमध्ये हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वसामान्य कर्करोग ठरतो. हा आजार टाळता येण्यासारखा असूनही, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग आणि त्याच्या जोखमींबाबत सर्वांत अज्ञान आहे. त्यामुळे उशिरा निदान होते आणि मृत्यूदर वाढतो.



गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण म्हणजे 'ह्युमन पॅपिलोमाव्हायरस' (एचपीव्ही) या विषाणूंच्या उच्च-जोखीम प्रकारामुळे होणारा संसर्ग. २०० हून अधिक प्रकारांच्या या विषाणूंपैकी काही प्रकार असामान्य पेशींमध्ये बदल घडवून आणून कर्करोगाला कारणीभूत ठरतात.

आरोग्यवेध

भारतामध्ये गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे सर्वाधिक प्रमाण आहे. ग्रामीण भागांमध्ये, जागरूकतेचा अभाव आणि आरोग्यसेवा सुविधांपर्यंत पोहोचण्याची अपुरी क्षमता लवकर निदानास अडथळा ठरते. महिलांना लक्षणांबद्दल माहिती नसते आणि ती लक्षणे चुकीच्या पद्धतीने समजली जातात किंवा दुर्लक्षित केली जातात. जसे की संभोगानंतर रक्तस्राव, असामान्य स्त्राव, पोटदुखी, सूज आणि क्रिएटिनिन पातळी वाढणे.

*** दरवर्षी १.३२ लाख नवे रुग्ण**

भारतामध्ये दरवर्षी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे अंदाजे १.३२ लाख नवीन रुग्ण आढळतात. चिंताजनक बाब म्हणजे फक्त १८ टक्के लोकांना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाबद्दल माहिती आहे, आणि त्याहीपैकी फक्त ४-११ टक्के लोकांनी एचपीव्ही लसीकरण केले आहे. ही लस गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाची ८५ टक्के प्रकरणे टाळू शकते.

*** ग्रामीण भारतातील आव्हाने**

ग्रामीण भारतामध्ये आरोग्यसेवेच्या सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे लवकर निदान आणि प्रतिबंध करण्यात अडचणी येतात. याशिवाय, महिलांना योग्य वयात 'एचपीव्ही लस देणे हेही एक आव्हान आहे. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासाठी तपासणी ही लवकर निदान आणि प्रतिबंधासाठी महत्त्वाची पायरी आहे. 'पॅप टेस्ट' आणि 'एचपीव्ही टेस्ट' या प्रमुख तपासण्या आहेत. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग झाल्यास शस्त्रक्रिया, रेडिएशन थेरपी आणि केमोथेरपी या उपचार पद्धती आहेत. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या उपचारांमध्ये किरणोत्सर्ग थेरपी महत्त्वाची भूमिका बजावते. योग्यवेळी आणि योग्यप्रकारे दिलेला किरणोत्सर्ग, इतर उपचार पद्धतींसह एकत्रित केल्यास कर्करोगाचे व्यवस्थापन प्रभावीरीत्या करता येते आणि रुग्णांच्या जीवनमानात सुधारणा करता येते.

*** एकत्रित प्रयत्नांची गरज**

गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे निदान आणि प्रतिबंधासाठी लसीकरण आणि लवकर तपासणी ही दोन मुख्य साधने आहेत. ही दोन साधने योग्यरित्या वापरल्यास कर्करोगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर कमी केले जाऊ शकते.

## पॅरासिटामॉलच्या गोळ्या घेताय, सावधान!

छोट्या मोठ्या दुखण्यासाठी पॅरासिटामॉलचा वापर करत असाल, तर ते घातक ठरू शकते. पॅरासिटामॉल घेतल्याने शरीराच्या अनेक भागांवर वाईट परिणाम होऊ शकतो, असे नुकत्याच झालेल्या एका अभ्यासातून समोर आले आहे.

पॅरासिटामॉलचा वापर आजकाल सर्रास झाला आहे. डोकेदुखी, ताप किंवा सौम्य वेदनांसाठी डॉक्टरांचा सल्ला न घेता पॅरासिटामॉलचा वापर केला जातो. पॅरासिटामॉलचा वृद्धांच्या मूत्रपिंड आणि हृदयावर वाईट परिणाम होऊ शकतो, असे नुकत्याच झालेल्या एका अभ्यासातून समोर आले आहे.

आरोग्य चर्चा

पॅरासिटामॉल हे अंगदुखी आणि ताप कमी करण्यासाठी औषध आहे. यामुळे मेंदूतील रसायनांचा प्रभाव कमी होतो. त्यामुळे वेदना आणि ताप येतो. हे सहसा सौम्य ते सौम्य वेदना, ताप, मायग्रेन आणि संधिवातमध्ये दिले जाते; मात्र ते मर्यादित प्रमाणात घ्यावे. ओव्हरडोजसाठी किंवा दीर्घकाळ हे औषध घेतल्यास शरीराच्या अनेक महत्वाच्या अवयवांचे नुकसान होऊ शकते.



*** पचनसंस्था, मूत्रपिंडावर परिणाम**

ब्रिटनमधील नॉटिंघम विद्यापीठातील संशोधकांनी आपल्या अभ्यासात असे सिद्ध केले आहे, की पॅरासिटामॉलच्या जास्त किंवा दीर्घकालीन वापरामुळे पचनसंस्था आणि मूत्रपिंडावर वाईट परिणाम होऊ शकतो. पॅरासिटामॉलचे सेवन विशेषत: वृद्धांसाठी धोकादायक ठरू शकते. पॅरासिटामॉल हे जास्त काळ घेतल्याने पोटात अल्सर होण्याची शक्यता वाढते. हे पोटाच्या पडद्याचे नुकसान करू शकते. त्यामुळे पचन समस्या उद्भवू शकतात. याशिवाय हे औषध मूत्रपिंडावरही परिणाम करते. मूत्रपिंड शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करते; परंतु पॅरासिटामॉलच्या सतत वापरामुळे मूत्रपिंडावरील दबाव वाढू शकतो. वृद्धांमध्ये मूत्रपिंडाचे कार्य आधीच कमकुवत असते, म्हणून पॅरासिटामॉल घेतल्यास ही स्थिती बिघडू शकते.

*** हृदयावरही परिणाम**

पॅरासिटामॉलचा परिणाम केवळ पचनसंस्था आणि मूत्रपिंडापुरता मर्यादित नसून त्याचा परिणाम हृदयावरही होतो, असे अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. वृद्धांमध्ये पॅरासिटामॉलचा सतत वापर केल्यास हृदयरोगाचा धोका वाढू शकतो. पॅरासिटामॉलमुळे रक्तदाबावर ही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे हृदयावर अधिक दबाव पडतो. ज्यांना आधीच हृदयाशी संबंधित समस्या आहेत त्यांच्यासाठी हे औषध अधिक धोकादायक ठरू शकते.

*** बचाव कसा करायचा?**

* डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय पॅरासिटामॉल घेऊ नका.
* पॅरासिटामॉल दीर्घकाळ सतत घेणे टाळा.
* वारंवार वेदना किंवा ताप येत असेल तर डॉक्टरांना भेटा.
* निरोगी आहार आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करा.

## नखांकडे दुर्लक्ष नको!

नखं हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. नखांमधला साधासा बदलही एखाद्या रोगाचा संकेत असू शकतो. जीवनसत्त्वाच्या कमतरतेपासून जंतूसंसर्गापर्यंत बरंच काही नखांमधून अधोरेखित होत असतं. नखांवर पडलेले पांढरे चट्टे किंवा डाग जीवनसत्त्वं किंवा विशिष्ट अन्नघटकाच्या कमतरतेचं द्योतक असू शकतं किंवा नखांच्या मुळाशी दुखापत झाल्याने अशा खुणा दिसू शकतात. ॲलर्जीमुळेही या खुणा दिसू शकतात. अर्थात याची लक्षणं लवकर लक्षात येत नाहीत. त्यामुळे नखांवरचे पांढरे चट्टे किंवा डागांकडे आपण दुर्लक्ष करतो. यासोबतच मेनिक्युअर आणि नेल पेंट्सचा सततचा वापर यामुळेही नखांचं बरंच नुकसान होऊ शकतं. क्वचित प्रसंगी हृदयविकार, मज्जासंस्थेशी संबंधित विकार आणि अनारोग्यामुळेही नखांवर विशिष्ट खुणा दिसतात.



प्रत्यक्षात नखं किंवा त्यांच्या आसपासच्या त्वचेत झालेल्या बदलाकडे दुर्लक्ष करू नये. दाह, दुखापती आणि पांढऱ्या डागांसोबतच नखांवर काळपट,करड्या रंगाचे चट्टे आढळले तर अधिक सतर्क होण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत तातडीने तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा.

नखांखाली रक्त साकळणं, काही औषधांचे दुष्परिणाम या कारणांमुळेही नखांवर काळपट डाग पडू शकतात. मात्र हे एका दुर्धर व्याधीचं लक्षण असू शकतं हेही आपण लक्षात घ्यायला हवं. अमेरिकन अकादमी ऑफ डर्मिटॉलॉजीच्या म्हणण्यानुसार नखांवरची काळी रेष किंवा डाग त्वचेच्या कॅन्सरचं लक्षण असू शकतो. हा छोटासा काळा डाग सर्वात घातक अशा मेलानॉमा या कॅन्सरकडे अंगुलीनिर्देश करू शकतो यावर आपला विश्वास बसू शकणार नाही. त्वचेचा कॅन्सर आपल्या नखांखालीही वाढू शकतो.

व्याधी विचार

कमकुवत नखं, नखांवर चिरा पडणं, नखांच्या आसपास रक्तस्राव होणं, नखांवरचा वाढत जाणारा काळपट डाग, नखांच्या आसपासच्या त्वचेचा रंग बदलणं, नखांमध्ये पू होणं, त्वचेवरच्या तीळाचा रंग बदलणं ही सुद्धा त्वचेच्या कॅन्सरची काही लक्षणं असू शकतात. याकडे दुर्लक्ष झालं तर हा कॅन्सर संपूर्ण शरीरात अगदी झपाट्याने पसरू शकतो.

नखांमध्ये होणाऱ्या कोणत्याही बदलाकडे आपण पटकन लक्ष देत नाही. असेल एखादी दुखापत असं म्हणून साफ दुर्लक्ष करतो. मात्र नखांमधला साधासा बदलही कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाचं लक्षण असू शकतो यावर आपला पटकन विश्वास बसणार नाही.

म्हणून नखांवरचा कोणताही डाग नेल पॉलिशखाली लपवू नका. साधीशी दुखापत म्हणून त्याकडे दुर्लक्षही करू नका. अर्थात यामुळे घाबरून जाण्याचं काहीच कारण नाही. काळपट डाग हे त्वचेच्या कॅन्सरचं लक्षण असू शकतं. त्यामुळे कोणताही धोका टाळण्यासाठी आपण प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करून घेणं योग्य ठरतं. त्यामुळे शरीरातच्या प्रत्येक अवयवाकडे लक्ष देणं गरजेचं आहे.

## सॅनिटायझर : योग्य की अयोग्य?

सध्याच्या काळात हातांच्या स्वच्छतेसाठी हँड सॅनिटायझरचा वापर होतो. प्रवासादरम्यानही हँड सॅनिटायझरमुळे हात झटपट स्वच्छ होतात. लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येक जण हँड सॅनिटायझर बाळगतो. मात्र वारंवार सॅनिटायझर वापरणं योग्य ठरतं का? याचे काही दुष्परिणाम आहेत का?



जाणून घेऊ या.

बाजारात विविध प्रकारचे हँड सॅनिटायझर मिळतात. तुमच्या सॅनिटायझरच्या निवडीवर बरंच काही अवलंबून असतं. प्रत्येक सॅनिटायझर वेगळा असतो. तज्ज्ञांच्या मते किमान ६० टक्के अल्कोहोल असणारा सॅनिटायझर वापरायला हवा. अल्कोहोल नसलेल्या सॅनिटायझर्सचा फारसा उपयोग होत नाही. असे सॅनिटायझर्स प्रभावीपणे जंतू नष्ट करू शकत नाहीत. त्यातच ते आरोग्यासाठीही हानिकारक ठरतात. काही काळानंतर जंतू अशा सॅनिटायझर्सना प्रतिकारही करू लागतात. त्यामुळे अल्कोहोल नसलेल्या सॅनिटायझर्सचा वापर करू नये.

आपण कुठे चुकतो?

ट्रायक्लोसॅन हा घटक असणारे सॅनिटायझर्सही टाळायला हवेत. ट्रायक्लोसॅनच्या सततच्या संपर्कामुळे शरीरातल्या काही थायरॉइड हार्मोन्सचं प्रमाण कमी होतं आणि जंतू प्रतिजैविकांना प्रतिकार करू लागतात.

## ही फळं आहेत प्रभावी

उच्च रक्तदाबावर फक्त औषधांनी नियंत्रण मिळवता येत नाही. या औषधांनी काही काळासाठी बरं वाटलं तरी त्यांचा दीर्घकालीन वापर आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो. संतुलित आहार आणि नियमित व्यायाम हा रक्तदाब नियंत्रणात ठेवण्याचा एक मार्ग आहे. यासोबतच फळांच्या रसांचं योग्य पद्धतीने सेवन केल्याने बरेच लाभ होऊ शकतात. काही फळं उच्च रक्तदाबाच्या दृष्टीने गुणकारी ठरतात.



आयुर्वेद आणि विकार

साखरविरहित फळांचे रस आहारात समाविष्ट करायला हवेत.

डाळिंबामध्ये रक्तदाब नियंत्रणात ठेवणारे गुणधर्म असतात. यात अ, क आणि ई ही जीवनसत्त्वं आणि फॉलिक ॲसिड असतं. यातल्या पोटॅशियममुळे रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुधारते. डाळिंबातले अँटिऑक्सिडंट्सही प्रभावी ठरतात. डाळिंबाच्या रसाचा आहारात समावेश केल्याने जंतूसंसर्ग टाळता येतो.

संत्र हा क जीवनसत्त्व आणि फायबरचा प्रमुख स्रोत आहे. यातले मॅग्नेशियम आणि पोटॅशियम हे घटक रक्तदाब नियंत्रणात ठेवतात. संत्र्याच्या रसामुळे चयापचय क्रियाही सुधारते.

उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी क्रॅनबेरीचा रस घ्यायला हरकत नाही. या फळातही क जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतं. यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहू शकतो.

## प्रदूषणामुळे रक्तात गुठळ्या होण्याचा धोका

थंडीमुळे आरोग्य बिघडत असून प्रदूषणाची थंडी आणखीनच धोकादायक बनली आहे. ताज्या संशोधनातून असे दिसून आले आहे, की प्रदूषणामुळे रक्तवाहिन्यांमधील रक्ताच्या गुठळ्या होण्याचा धोका शंभर टक्क्यांनी वाढतो.

नसांमध्ये रक्ताच्या गुठळ्या तयार होणे म्हणजे उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका आणि ब्रेन स्ट्रोक. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, दरवर्षी ब्रेन स्ट्रोकमुळे होणाऱ्या ५० लाख मृत्यूंना प्रदूषण मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. इतकेच नाही तर प्रदूषणात सतत श्वास घेतल्याने मानसिक आजारांचा धोकाही वाढतो. ज्या लोकांना रक्तातील साखरेची समस्या आहे किंवा त्यांना आजार आहे. त्यांनी परिस्थिती लक्षात घेता अधिक सतर्क राहावे लागेल. मधुमेह आणि उच्च रक्तदाबाच्या या धोकादायक मिश्रणामुळे हृदयविकाराचा धोका अनेक पटींनी वाढेल. अशा परिस्थितीत आपण सर्दी आणि प्रदूषणाचा प्रभाव कसा कमी करू शकतो आणि साखर आणि रक्तदाब कसे नियंत्रित करू शकतो.



वेगळं काही

*** गंभीर आजाराचा धोका**

हवेतील लहान कण श्वासोच्छवासातून फुफ्फुसात, फुफ्फुसातून रक्तापर्यंत, रक्तापासून संपूर्ण शरीरात आणि नंतर सर्व अवयवांपर्यंत पोहोचून नुकसान करतात. त्यामुळे गंभीर आजारांचा धोका वाढतो. प्रदूषणाचा फुफ्फुस, डोळे आणि मेंदूवर वाईट परिणाम होतो.

*** काय उपाय?**

* प्रदूषणाचा फुफ्फुसांवर सर्वाधिक परिणाम होतो. फुफ्फुसांना बळकटी देण्यासाठी श्वसरीचा उष्टा प्या.
* रोज मसाला चहा पिणेदेखील फायदेशीर ठरेल. ज्या लोकांना घशाच्या ॲलर्जीची समस्या आहे त्यांनी मिठाच्या पाण्याने गुळण्या कराव्यात
* लिकोरिस खाल्ल्याने घशाला आराम मिळतो आणि ॲलर्जीची समस्या दूर होते. याशिवाय झोपण्यापूर्वी तळव्यावर कोमट मोहरीचे तेल लावा. यामुळे आराम मिळेल. तसेच नाभीमध्ये मोहरीचे तेल लावावे. नाकात मोहरीचे तेल लावल्यानेही आराम मिळेल.

### सप्लिमेंट्स ठरतात घातक!

नवसंशोधन

वजन कमी करणं असो, स्नायूंची क्षमता वाढवणं असो किंवा शरीरातली ऊर्जा टिकवून ठेवणं असो; सध्याच्या काळात आहाराला पूरक अशी सप्लिमेंट्स घेतली जातात. जीवनसत्त्वांचा अभाव दूर करण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. स्नायूंची क्षमता वाढवणाऱ्या विविध पावडरच्या जाहिराती येत असतात. मात्र हे सर्व आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.



त्यातही लहान मुलं आणि तरुणांच्या आरोग्याच्या दृष्टीने अशी सप्लिमेंट्स घातक ठरू शकतात. शून्य ते २५ या वयोगटातल्या लोकांवर सप्लिमेंट्सच्या परिणामांचा होणारा वापर शास्त्रज्ञांनी अभ्यासला. अशा सप्लिमेंट्सच्या वापरामुळे अकाली मृत्यू, अपंगत्व किंवा रुग्णालयात दाखल होण्याची वेळ येऊ शकते, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.

### कशी राखायची तोंडाची निगा?

दंतारोग्य

तोंडाची स्वच्छता आरोग्याच्या दृष्टीने किती गरजेची आहे हे आपण जाणतो. पण त्याकडे आपलं दुर्लक्षच होतं. तोंडाच्या स्वच्छतेबाबत भरपूर माहिती उपलब्ध असल्यामुळे नेमकी सुरूवात कशी करायची, असा प्रश्न आपल्याला पडतो. खरं तर तोंडाची स्वच्छता राखण्याची सवय लहानपणापासूनच अंगी बाणायला हवी. दात घासण्यासाठी योग्य ब्रशचा वापर करणं गरजेचं आहे. शक्यतो मऊ ब्रशचा वापर करा. नायलॉनच्या धाग्यांपासून बनवलेला गोलाकार ब्रश वापरणं गरजेचं आहे, असं तज्ज्ञ सांगतात.



### करा प्रदूषणापासून बचाव

डोळ्यांचं आरोग्य

वाढत्या प्रदूषणामुळे वातावरणात धूर आणि धुक्याचं प्रमाण वाढत चाललं आहे. यामुळे डोळ्यांना बराच त्रास होतो. अशा वातावरणात डोळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. धुरामुळे डोळे जळजळत असतील तर बाहेरून घरी आल्यावर डोळ्यांवर थंड पाणी मारा. डोळ्यांची सतत उघडझाप करत रहा. मोबाईल, कॉम्प्युटरचा वापर करत असताना डोळ्यांची उघडझाप करणं महत्त्वाचं आहे. बाहेर जाताना मोठ्या आकाराचा गॉगल लावा. प्रदूषित कण डोळ्यात गेल्यानंतर चोळू नका. महत्त्वाचं म्हणजे 'अ' जीवनसत्त्व आणि 'ओमेगा ३' फॅटी ॲसिड्सयुक्त आहार घ्या. हिरव्या भाज्या, गाजर यांचं आहारातलं प्रमाण वाढवा.



### प्रभावी शिकेकाई

आजीबाईंचा बटवा

सध्या अनेकांना केसांच्या समस्या भेडसावतात. प्रदूषण, रसायनयुक्त उत्पादनांचा वापर, आहाराच्या चुकीच्या सवयी यामुळे केसांचं आरोग्य बिघडत चाललं आहे. केस गळणं, पांढरे होणं, कोंडा होणं या सर्वसाधारण समस्या आहेत. केसांना नैसर्गिक पोषण मिळवून देणारे अनेक घटक असले तरी शिकेकाईच्या नियमित वापरामुळे केसांच्या अनेक समस्या दूर होऊ शकतात. टाळूची त्वचा स्वच्छ ठेवणं हा केसांचं आरोग्य उत्तम राखण्याच्या प्रक्रियेतला पहिला टप्पा आहे. शिकेकाईमुळे टाळूला थंडावा मिळतो. टाळूची त्वचा कोरडी पडत असेल तर शिकेकाईचा वापर योग्य ठरतो. शिकेकाईमध्ये बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. यामुळे टाळूवरची त्वचा स्वच्छ होते. कोंड्याची समस्याही शिकेकाईमुळे दूर होऊ शकते.



# भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघे ठार

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १ :
नातेवाईकांची भेट घेऊन, हॉटिलात जेवण करून वणी या स्वगावी परत जात असतांना समोरून येणाऱ्या ट्रकवर दुचाकी आदळून सतीश भाऊराव नागपुरे (५१), मंजुषा सतीश नागपुरे (४७) व माहिरा राहुल नागपुरे या तीन जणांचा मृत्यू झाला. अपघाताची ही दुर्दैवी घटना नागपूर ते चंद्रपूर मार्गावरील डाली पेट्रोलपंप समोर मंगळवारी रात्री दहा वाजताच्या सुमारास घडली.

मंगळवारी सर्वत्र नववर्षाच्या स्वागताची तयारी सुरू होती तर मावळत्या वर्षाला निरोप देत सर्व जण पार्टीत मस्त होते. मात्र याच वेळी वणी येथील नागपुरे कुटूंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. हॉटिलमधून जेवण आटोपून दुचाकीने घरी जात



असताना हायवेवर यु टर्न घेताना दुचाकी समोरून येणाऱ्या ट्रकवर आदळून झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघांच मृत्यू झाला.

वणी तालुक्यातील रासाघोणसा येथील नागपुरे कुटुंब भद्रावती येथे नातेवाईकाकडे भेटीसाठी आले होते. दरम्यान भद्रावती शहरालगत नातेवाईकाच्या मालकीच्या हॉटिलमध्ये जेवण केल्यानंतर नागपुरे कुटुंब (एम.एच. २९ ए. झेड. ९९४९) या दुचाकीने आपल्या नातेवाईकाच्या घराकडे परत जात असताना हायवेवर यू टर्न घेताना समोरून येणाऱ्या (एम. एच.४० एके २०९५) या ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात मंजुषा सतीश नागपुरे यांचा घटनास्थळीच मृत्यु झाला तर सतीश भाऊराव नागपुरे व माहिरा राहुल नागपुरे या दोन वर्षीय बालिकेचा उपचारासाठी नेताना मृत्यू झाला. या अपघातात स्मायली कामतवार ही सात वर्षीय मुलगी किरकोळ जखमी झाली आहे.

अपघाताच्या या घटनेनंतर ट्रक चालक नंदू चव्हाण रा. पुसद याला भद्रावती पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. घटनेचा पुढील तपास भद्रावती पोलीस करीत आहे.

या अपघातामुळे नागपुरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मावळत्या वर्षाला निरोप देतांना व नवीन वर्षाचे स्वागत करतांना जिल्ह्यात अपघाताच्या घटना घडू नये यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मद्यपींवर देखील कारवाईचे सत्र सुरूच होते. मात्र दुर्दवाने अपघाताची ही घटना घडल्याने नववर्षाच्या स्वागताला गालबोट लागले आहे.

# पाच गुंडांकडून युवकाची तलवारीने हत्या

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १ :
अवैध व्यवसाय करणाऱ्या पाच गुंडांनी एका युवकाची तलवारीने वार करून निर्घृण हत्या केल्याची घटना पथ्रोट पोलीस ठाणे हद्दीतील शिंदी बु. येथे सरत्या वर्षाच्या रात्री घडली.

पोलिसांनी या प्रकरणी हत्येचा गुन्हा नोंदविला असून मारेकरी अद्याप गवसलेले नाहीत. अवैध व्यवसायाची माहिती पोलिसांना पुरविल्याच्या संशयातून या युवकाची हत्या करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

सनी दशरभ भीमसागर (२५) असे मृत युवकाचे नाव आहे. फियार्दी दशरथ भैय्यालाल भीमसागर पोही रोड शिंदी बु. येथे ३ मुलांसह राहतात. काही दिवसांपूर्वी पथ्रोट पोलिसांनी मुख्य आरोपी अभिजीत बबन मात्रे याच्या अवैध व्यवसायावर छापा टाकला होता. याची माहिती दशरथ यांचा मुलगा सनी याने दिल्याच्या संशयावरुन अभिजीत बबन मात्रे याच्यासह शेख शफीक शेख रफीक सौदागर, शेख आतीक शेख रफीक सौदागर, शुभम ऊर्फ गोलु मन्नालाल धुर्वे, शंकर मन्नालाल धुर्वे यांनी सनी याच्यावर हल्ला केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सनी हा कुत्र्याला घेऊन बाहेर उभा असताना आरोपी अभिजीत मात्रे याने त्याच्या छातीवर तलवारीने वार केला. शंकर मन्नालाल धुर्वे, शफीक शे. रफीक सौदागर याने सनीला जखमी अवस्थेत रस्त्यावर घासत नेले. सनी याला त्याचा लहान भाऊ भीमराज याने मित्राच्या मदतीने पथ्रोट आरोग्य वर्धिनी केंद्रात उपचारासाठी आणले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले. आरोपी हल्ल्यानंतर मोटरसायकलींवरून पळून गेले. सर्व आरोपी पसार असून ३ पोलीस पथके आरोपींचा माग घेत आहेत. काही दिवसापूर्वी मुख्य आरोपी अभिजीत बबन मात्रे याच्याकडे पथ्रोट पोलिसांनी छापा टाकून दारु जप्त केली होती. या प्रकरणी प्रतिबंधात्मक कारवाई करुन गुन्हे दाखल करण्यात आले होते.

त्या अवैध व्यवसायाची माहिती सनी याने पोलिसांना दिली असल्याच्या संशयावरुन हत्या झाल्याची चर्चा परिसरात आहे. अवैध व्यवसायाला रोखण्यात पोलीस यंत्रणेला अपयश आले आहे. हा अवैध व्यवसाय शाळा परिसरातच सुरू होता.

त्याची तक्रार पालकांनी पथ्रोट पोलिसांत तक्रार केली होती. स्थानिक पोलीस ठाणे अशा घटनांना अटकाव घालतील की अजून काही बळी जातील असा सवाल नागरिक विचारत आहेत. या घटनेमुळे शिंदी या गावात भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. या घटनेने खळबळ माजली आहे.

## महाराष्ट्राचे पहिले एआय धोरण तयार करा
### माहिती व तंत्रज्ञान मंत्री अँड आशिष शेलार यांचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राने दिशादर्शक व्हावे यासाठी राज्याचे पहिले एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) धोरण तयार करा, असे निर्देश माहिती व तंत्रज्ञान मंत्री अँड आशिष शेलार यांनी आज विभागाला दिले.

एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उद्योग, व्यवसाय उभे राहतील. तरुणांना रोजगार मिळतील व तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्र सक्षमपणे स्पर्धा करु शकेल असे त्यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृहावर माहिती व तंत्रज्ञान विभागाचा मंत्री अँड आशिष शेलार यांनी आढावा घेतला. या बैठकीस आयटी विभागाचे सचिव पराग जैन नैनुटिया, महाआयटीच्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

विभागाचा आढावा घेत अधिकाऱ्यांना पुढील वाटचालीविषयी मार्गदर्शन करताना मंत्री अँड आशिष शेलार म्हणाले, एआय तंत्रज्ञानाचा युग सुरू झाले आहे. महाराष्ट्राने या क्षेत्रात आघाडी घेतली पाहिजे. एआयचा प्रभावी उपयोग करून आपण अधिक उद्योग व व्यवसाय आकर्षित करीत तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ शकतो. जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राचे स्थान भक्कम करण्याची ही संधी आहे.

## नापास का होतोस? असे विचारले..
# मुलाने आई-वडिलांनाच संपवले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :
इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणारा मुलगा वारंवार नापास होत असल्यामुळे आई-वडिलांनी त्याला याबाबत विचारणा केली. आईवडिलांचे हे विचारणे सहन न झाल्याने मुलाने आईवडिलांचा खून केला. अगदी क्षुल्लक कारणावरुन मुलाने पाऊल उचलल्यामुळे आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

नववर्षाच्या पहिल्याच दिवशी कपीलनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत हे दुहेरी हत्याकांड उघडकीस आले. लीलाधर डाखोळे आणि अरुणा डाखोळे असे खून झालेल्या दाम्पत्याचे नावे आहे. तर उत्कर्ष लीलाधर डाखोळे (२४, खसाळा, कपीलनगर) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी या हत्याकांडाचा छडा लावत मुलाला अटक केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लीलाधर डाखोळे हे कोराडी वीज केंद्रात टेक्निशियन पदावर नोकरीवर होते तर पत्नी अरुणा डाखोळे या संगीता विद्यालयात शिक्षिका होत्या. त्यांना मुलगा उत्कर्ष (२४) आणि मुलगी सेजल (२१) अशी दोन मुले होती. उत्कर्ष हा इंजिनिअरिंगच्या तिस?या वर्षाला शिकतो तर मुलगी बीएएमएसच्या प्रथम वर्षाला शिकते. उत्कर्ष हा गेल्या दोन वर्षांपासून वारंवार नापास होत होता. त्यामुळे शिक्षिका असलेल्या आईने त्याला बैलवाड्याला असलेली त्यांची शेती कसण्यास सांगितले होते. वडिल लीलाधर यांनीही इंजिनिअरिंग झेपत नसेल तर आयटीआय किंवा पॉलिटेक्निकला प्रवेश घेण्याचा सल्ला मुलाला दिला होता. त्यामुळे त्याला आईवडिलांचा राग आला. घरात वारंवार त्याला शिक्षण सोडून देऊन शेती करण्यासाठी टोमणे मारण्यात येत होते. २५ डिसेंबरला वडिलांनी उत्कर्षला मारहाण केली आणि शिक्षण सोडून शेतीवर जाण्यास सांगितले. आईने त्याची बॅग भरुन ठेवली होती. आता इंजिनिअरिंग सोडून पॉलिटेक्निकला प्रवेश घ्यावा लागेल, अशी भावना मनात आल्यामुळे तो अस्वस्थ होता.

आईवडिलांमुळे आपल्या शैक्षणिक भवितव्याचे वाटोळे होणार या भावनेने उत्कर्ष अस्वस्थ होता. त्यामुळे त्याने आईवडिलांचा काटा काढण्याचा कट रचला. गेल्या २६ डिसेंबरला विद्यार्थ्यांचे पेपर तपासण्यात आई व्यग्र होती. उत्कर्षने आईचा दोन्ही हातानी गळा आवळून खून केला. त्यानंतर तो आईच्या मृतदेहाजवळ बसून होता. तासाभराने त्याचे वडिल घरी आले. त्यांना घरातील घटना पाहून धक्काच बसला. ते सोफ्यावर बसलेले असताना उत्कर्षने मागून येऊन त्यांच्या मानेवर चाकूने वार केले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. दोघांचेही मृतदेह घरात ठेवून उत्कर्ष घर बंद करुन बाहेर निघून गेला.



**असे आले हत्याकांड उघडकीस**

नववर्षाच्या पहिल्याच दिवशी लीलाधर यांना शुभेच्छा देण्यासाठी एक मित्र घरी आला. त्याला घरातून दुगंर्धी आली. त्याने शेजा?यांना माहिती दिली. ठाणेदार महेश आंधळे यांनाही माहिती देण्यात आली. पोलिसांनी घराचे दार तोडून आतमध्ये प्रवेश केला. त्यांना अरुणा आणि लीलाधर यांचे मृतदेह दिसले. मुलगा आणि मुलीबाबत चौकशी केली असता दोघेही बोखारा येथे राहणाऱ्या काकांकडे गेल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी दोन्ही भावंडाना घरी आणले. पोलिसांना उत्कर्षच्या हालचाली संशयास्पद वाटत होत्या. त्यामुळे पोलिसांनी त्याला खाक्या दाखवताच त्याने आईवडिलांचा खून केल्याची कबुली दिली. गेल्या आठ दिवसांत ९ हत्याकांड गेल्या आठ दिवसांत ९ हत्याकांडाच्या घटना नागपुरात उघडकीस आल्यामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडल्याची स्थिती आहे. शनिवारीसुद्धा गांधीबागमध्ये दुहेरी हत्याकांड घडले होते. तर रविवारी जरीपटक्यातील खिश्चन कब्रस्तानात शिंदे हत्याकांड घडले. गुरुवारी आणि शुक्रवारीसुद्धा अजनी आणि धंतोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत खुनाच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे एकेकाळी दरारा असलेली गुन्हे शाखा आता अवैध धंदेवाल्यांकडून वसुली करण्यात मग्न असल्याची चर्चा होत आहे.

# जळगावच्या पाळधीत 'थर्टी फस्ट'च्या रात्री राडा

■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. १ :
जळगाव जिल्ह्यातील पाळधी गावात 31 डिसेंबर रोजी रात्री हॉर्न वाजवल्याच्या किरकोळ कारणावरून मोठा राडा झाला आहे. या घटनेत दोन गटांनी एकमेकांवर दगडफेक करत काही दुकाने व वाहनांची जाळपोळ केली आहे. त्यामुळे येथे उद्या सकाळपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. एका वृत्तानुसार, मंत्री गुलाबराव पाटील यांच्या कुटुंबीयांस घेऊन जाणाऱ्या वाहन चालकाने हॉर्न वाजवून कट मारल्याप्रकरणी हा राडा झाला.

जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यातील पाळधी गावात 31 डिसेंबर रोजी रात्री 12 च्या सुमारास मंत्री गुलाबराव पाटील यांचे कुटुंबीय बाहेर जात होते.

यावेळी त्यांच्या कार चालकाने हॉर्न वाजवला व एका गाडीला कट मारला. त्यामुळे दुसऱ्या एका कारमधील तरुणांनी पाटलांच्या गाडीच्या ड्रायव्हरला शिवीगाळ केली. त्यावेळी कारमध्ये मंत्री गुलाबराव पाटील यांच्या पत्नी होत्या. त्यामुळे त्यांच्यासोबत असणाऱ्या शिवसैनिकांनी समोरील तरुणांवर धाव घेतली, असे वृत्तात म्हटले आहे. प्रारंभी पाळधी गावचे काही तरुण व शिवसेनेचे काही कार्यकर्ते यांच्यात वाद झाला.

**: लोकसेवार्थ :**

**लोकजागर**

## अनाथ बालकांचा आधार जननी आशिष



अनाथ मुलांना आई-वडिलांच्या प्रेमाची उणीव भासणार नाही, अशा पद्धतीने लळा लावून त्यांचे संगोपन करणाऱ्या अनेक सामाजिक संस्था कार्यरत आहेत. अशाच संस्थांमध्ये डोंबिवलीतील जननी आशीष संस्थेचा समावेश करता येईल. समाजाप्रति आपलेही काही देणे लागते, या विचाराने प्रेरित होऊन डोंबिवलीतील २१ महिलांनी एकत्र येऊन या संस्थेची स्थापना केली. गेली २२ वर्षे ही संस्था पूर्वीइतक्याच जिव्हाळ्याने आणि जिद्दीने अनाथांचा आधारवड बनण्याचे काम करत आहे.

मध्यमवर्गीय कुटुंबातील अनेक महिलांना आपण काही तरी सामाजिक काम करावे, असे वाटत असते. मात्र एकट?ाने ते शक्य नसते. याची जाणीव झाल्यानंतर डोंबिवलीतील डॉ. कीर्तिदा प्रधान, पुष्पलता पाटील, जयश्री मोकाशी, शोभा किणी, सुधा ओतीव, बीना धूत, जयश्री देशपांडे, आशा भगत, स्नेहल कर्णिक, सुलभा धोंडे यांसह २१ महिलांनी एकत्र येत जननी आशीष या संस्थेची स्थापना केली आहे. १९९३ मध्ये स्थापन झालेली जननी आशीष ही संस्था अनाथ तसेच नको असलेल्या मुलांचे संगोपन व त्यांना दत्तक देण्याचे काम पाहते. ठाणे जिल्ह्यातील अनाथ मुलांसाठी काम करणारी ही पहिली संस्था आहे.

या विषयी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. कीर्तिदा प्रधान सांगतात, १९८९ मध्ये मुंबई दूरदर्शनवरील एका कार्यक्रमातून अनाथांसाठी काम करणाऱ्या संस्थेची माहिती झाली. त्यातूनच अनाथ मुलांना आश्रय देणारी एखादी संस्था सुरू करण्याचा विचार मनात आला. त्या वेळी आमच्याकडे काही नव्हते, माझ्या मैत्रिणी व मी धावपळ करुन इतर परिचितांकडून मदत मिळवून संस्थेसाठी जागा मिळविली. त्यानुसार डोंबिवलीतील औद्योगिक विभागात पेंढरकर रस्त्याला लागूनच कोपऱ्याला आम्हाला मोक्याची जागा मिळाली. आमच्या घरातील मंडळींनी तसेच नातेवाईकांनी आम्हाला इमारत बांधणीसाठी हातभार लावला. त्यांच्या सर्वांच्या प्रयत्नामुळेच ही संस्था २२ वर्षांची वाटचाल करू शकली असून यापुढेही चांगले कार्य करेल.

सुरुवातीला महिलांच्या पाच हजार रुपयांच्या वर्गणीतून ती सुरू झाली. त्यानंतर दानशूर व्यक्तींनी दिलेल्या अनुदानावरच ही संस्था आत्तापर्यंत आपला खर्च भागवित आली आहे. नवजात शिशू अवस्थेपासून ते सहा वर्षांपर्यंतची बालके येथे ठेवली जातात. मात्र आता १३ ते १४ वर्षांपर्यंतची मुले पोलिसांमार्फत येतात. त्यांचीही सोय येथेच करावी लागते.

संस्थेत २५ मुलांची राहण्याची क्षमता आहे; परंतु येथे सध्या ४०च्या आसपास मुलांनी आधार घेतला आहे. तर आत्तापर्यंत येथील साडेतीनशेहून अधिक मुलांना दत्तक देण्यात आले आहे. ■ ■ ■



## संघर्षमय यशोगाथा पर्यटन व्यवसायाची

कोणतेही आर्थिक पाठबळ नसताना एखाद्या व्यवसायाची पायाभरणी करणे,हे तसे अवघड काम,मात्र साफल्याच्या जयवंत राठोड यांनी हाताशी कोणतेही आर्थिक पाठबळ नसताना शून्यातून स्वतःचे विश्व निर्माण करत विविधांगी व्यवसाय उभारले. त्यांच्या व्यवसाय भरारीमुळे अनेक ग्रामस्थांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत.

कोणताही व्यवसाय स्वबळावर सुरु करायचा तर सर्वात महत्वाचं असत ते भांडवल. व्यवसायात नफा कमवायचा तर भांडवलरूपी गुंतवणूक आलीच.अशीच व्यावसायिक गुंतवणूक स्वबळावर पालघर जिल्ह्यातील सफाळ्यातील उद्योजक जयवंत राठोड यांनी केली ती पर्यटन व्यवसायात आणि आज एक सर्वसामान्य गिरणी कामगाराचा मुलगा ते यशस्वी उद्योजक असा त्यांचा प्रवास हा सफल झालेला आहे.

कोणतेही आर्थिक पाठबळ नसताना स्वबळावर पालघर सारख्या जिल्ह्यात जयवंत यांनी पर्यटनाचा व्यवसाय सुरु केला आणि यातूनच त्यांना इतरही उद्योगांची प्रेरणा मिळाली. जयवंत राठोड यांच्या या उद्योगामुळे सफाळ्यातील अनेक ग्रामस्थांच्या हाताला रोजगार मिळाला आहे.

मूळचे बोर्डीचे रहिवासी जयवंत याना वडिलांच्या गिरणी कामाच्या निमित्ताने जयवंत मुंबईत आले. मात्र गिरण्या बंद पडल्यामुळे जयवंत याना शिक्षण अर्धवट सोडावे लागले. घरची जबाबदारी सांभाळण्यासाठी विविध समारंभासाठी विद्युत रोषणाई करणे,सर्कस मध्ये तंबू उभारणे, रिक्षा धुणे, पे अँड पार्क अशी कामे त्यांनी केली. त्यांचे मूळ गाव बोर्डी हे समुद्र किनाऱ्यालगतचे असल्याने मत्स्यव्यवसायामध्ये जयवंत याना आधीपासूनच रस होता. त्यांनी निमखाऱ्या पाण्यातील कोळंबी शेतीचे प्रशिक्षण घेऊन स्वतःचे घर विकून, बँकेचे कर्ज काढून सफाळे गावातच तलाव बनवून निमखाऱ्या पाणयात कोळंबीची शेती सुरु केली. निमखारी हि कोलंबीची विशिष्ट जात असून परदेशातून या कोलंबीला प्रचंड मागणी असते. जयवंत यांनी हा व्यवसाय सुरु केला खरा मात्र ते सफाळे गावात बाहेरून आले म्हणून तिथल्या ग्रामस्थांनी त्यांच्या व्यसायाला नाहक विरोध करायला सुरवात केली. खूप संघर्षानंतर त्यांना हा व्यवसाय बंद करावा लागला. मात्र सहा एकर जमिनीपैकी उर्वरित चार एकर जमिनीवर त्यांनी रेन वाटर हार्वेस्टिंगचा प्रकल्प सुरु केला. विविध रोपटी विकण्याचा देखील सुरवात केली आणि तिथेच छोटयाशा तळ्यात रोहा, कटला, भिंग अशा माशांची पैदास आणि विक्री सुरु केली. इथेच लोक आग्रहास्तव जयवंत यांनी एक छोटे उपहारगृह देखील सुरु केले.त्यांना घरगुती जेवणाची मागणी होऊ लागली. त्यांच्या व्यवसायाचा फाफटपसारा वाढतच गेला आणि त्यातूनच मग त्यांनी पर्यटनाचा व्यवसाय सुरु केला. त्यांचे सफाळ्यातील फिशरमेन रिसॉर्ट हे अल्पावधीतच सुप्रसिद्ध झाले आहे. त्यांची ही यशोगाथा आजच्या बेरोजगार तरूणांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. ■ ■

**शब्दार्थ**
**ईसीजी**
हृदय हा आपल्या शरीराचा सर्वात महत्वाचा भाग आहे. ईसीजी ही एक चाचणी आहे जी सहसा हृदयाशी संबंधित आजार शोधण्यासाठी केली जाते. ईसीजीला इलेक्ट्रोकार्डियोग्राम असेही म्हणतात. काही चाचण्यांद्वारे, हृदय योग्यरित्या काम करत आहे की नाही हे आपण शोधू शकतो. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre@rediffmail.com

# मोठे मासे सापडणार

■ वृत्तसंस्था, जालना, दि. १ :
सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक करा, या मागणीसाठी मस्साजोगच्या ग्रामस्थांनी आज जलसमाधी आंदोलन केले. तर दुसरीकडे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनीही फरार आरोपींना अटक करण्याची मागणी केली आहे. वाल्मीक कराडला अटक झाली आहे, आता मोठे मासे सापडतील, असा विश्वास मनोज जरांगे यांनी व्यक्त केला. ते आज माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे यांच्याबाबतही भाष्य केले.

बीडच्या मस्साजोग हत्याकांडाशी निगडीत खंडणी प्रकरणात पोलिसांना हवा असणारा वाल्मीक कराड मंगळवारी दुपारी पुण्यातील सीआयडी कार्यालयात शरण आला.

मात्र, तीन आरोपी अद्यापही फरार आहेत. यावरून मस्साजोगचे ग्रामस्थ आणि मनोज जरांगे आक्रमक झाले आहे. आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी मस्साजोगच्या ग्रामस्थांनी आज सामूहिक जलसमाधी आंदोलन केले. तर दुसरीकडे मनोज जरांगे यांनीही आरोपींना अटक करण्याची मागणी लावून धरली आहे.

# हे सर्व प्री प्लॅन असावे...

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १ :
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणीच्या गुन्ह्यात फरार असलेला वाल्मीक कराड मंगळवारी शरण आला. यावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी भाष्य केले आहे.

वाल्मीक कराड कुठे लपलेला होता, हे पोलिस खात्याला माहीत नव्हते याचे आश्चर्य वाटते. गुप्तचर यंत्रणांनी आपल अपयश वारंवार जनतेसमोर आणू नये, अशा शब्दांत प्रकाश आंबेडकर यांनी सुनावले आहे. तसेच हे सर्व प्री प्लॅन वाटत असून ते सरळ सरळ दिसत असल्याचेही ते म्हणाले.

पोलिस खात्याला वाल्मिक कराड कुठे लपलेला आहे? हे माहिती नाही, याचे मला आश्चर्य वाटत आहे. तपास यंत्रणांनी आपले अपयश वारंवार लोकांसमोर आणू नये. सरकामध्ये यासंदर्भात दबाव आहे याची मला जाणीव आहे. त्यामुळे त्यांनी या प्रकरणात लवकरात लवकर कारवाई करावी एवढीच त्यांना विनंती असल्याचे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

हे सर्व प्री प्लॅन वाटत असून ते सरळ सरळ दिसत आहे. त्यामध्ये नवीन काहीच दिसत नाही. तसेच या प्रकरणी सरकारवर प्रचंड दबाव असून या दबावाला मुख्यमंत्र्यांनी बळी पडू नये. त्या लढ्याला मराठा विरुद्ध वंजारी हा रंग दिला जातोय, त्यामध्ये शासनाने अधिक दक्षता बाळगली पाहिजे होती, असेही ते म्हणाले. दरम्यान, या प्रकरणावर त्यांनी पोलिसांवर संशय व्यक्त केला.

## छाती फाडली तर साहेबच दिसतील

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :
राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते व मंत्री नरहरी झिरवाळ यांनी पुन्हा एकदा त्यांची शरद पवार यांच्यावर असलेली निष्ठा व्यक्त करून दाखवली आहे. बजरंगाच्या छातीत प्रभू राम दिसतील. तर माज्या छातीत तुम्हाला शरद पवार साहेबच दिसतील, असे म्हणत पुढे झिरवळ म्हणाले, आता शरद पवार यांच्यासमोर जाऊन लोटांगण घालून पाया पडणार आहे, असे विधान नरहरी झिरवाळ यांनी माध्यमांशी बोलताना केले आहे.

झिरवाळ म्हणाले, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मातोश्री यांनी पवार कुटुंब पुन्हा एकत्र आले पाहिजे, असे साकडे पांडुरंगाला घातले आहे. यावर नरहरी झिरवाळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

नरहरी झिरवाळ म्हणाले, माझी एकच मागणी आहे. प्रत्येक माणूस तीच मागणी करतोय, विरोधक असो की राष्ट्रवादीचा कोणीही माणूस असो, सगळ्यांना वाटत आहे की अजितदादा आणि शरद पवार साहेब यांनी एकत्र आले पाहिजे. आम्ही पवार साहेबांना सोडून गेलो. मात्र लोकांनी आम्हाला निवडून दिले, दोन्ही पवार एकत्र आले पाहिजे ही पांडुरंगाला विनंती करतो, मी पाडुरंगाच्या शेजारी पवारसाहेबांना पाहतो, असे ते म्हणाले.

## अजित आणि शरद पवार पुन्हा एकत्र येऊ दे!
# दादांच्या मातोश्रींचे पांडुरंगाला साकडे



■ वृत्तसंस्था, पंढरपूर, दि. १ :
अजितला नवीन वर्षातच सुख समृद्धी लाभू दे, तसेच अजित पवार आणि शरद पवार पुन्हा एकदा एकत्रित यावे यासाठी आपण पंढरपूरच्या पांडुरंगाला साकडे घातला असल्याची माहिती अजित पवार यांच्या मातोश्री आशा पवार यांनी दिली.

नवीन वर्षानिमित्त आशा पवार यांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. कुटुंबातील सर्व वाद मिटून पुन्हा पवार कुटुंब एकत्रित गुणा गोविंदाने नांदू दे, असे साकडे आपण पांडुरंगाला घातले असल्याचे आशा पवार यांनी म्हटले आहे.

शरद पवार यांचे नातू आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्या आईने देखील काही दिवसांपूर्वी पवार कुटुंबातील वाद मिटण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. कुटुंबातील मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र राहणे ही काळाची गरज असल्याचे रोहित पवार यांच्या आईने म्हटले होते. त्यानंतर आता अजित पवार यांच्या आईने देखील पांडुरंगाच्या चरणी पवार कुटुंबाने एकत्र राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

अजित पवार आणि शरद पवार यांच्यात वाद झाल्यानंतर या दोघांनी पुन्हा एकत्र यावे, अशी इच्छा कार्यकर्ते तसेच पदाधिकारी वारंवार व्यक्त करत आहेत. त्यातच विधानसभा निवडणुकीच्या नंतर अनेकांनी पवार कुटुंबाने एकत्र येण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र या संदर्भात शरद पवार किंवा अजित पवार यांनी वक्तव्य केलेले नाही. मात्र आता अजित पवार यांच्या मातोश्री यांनी पांडुरंगाच्या चरणी यासाठी साकडे घातले आहे. अजित पवार आणि सर्वांनाच नवीन वर्ष चांगले सुखचे राहू दे. तसेच पवार कुटुंबातील सर्व वाद मिटू दे, अशी मागणी त्यांनी केली.

नागपूर

# महासागर वृत्तसागर

गुरूवार ■ दि. २ जानेवारी २०२५


## आरोपी शरण आल्यानंतर टीका करणे योग्य नाही

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १:**
आरोपी शरण आल्यानंतर टीका करणे योग्य नाही. बीड प्रकरणातील एकही आरोपी सुटणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच सांगितले होते, असे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. ते आज माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी मस्साजोग ग्रामस्थांच्या जलसमाधी आंदोलनावर प्रतिक्रिया देत सरकारवर विश्वास ठेवावा, अशी विनंती मस्साजोगच्या ग्रामस्थांना केली.

बीडच्या मस्साजोग हत्याकांडाशी निगडीत खंडणी प्रकरणात पोलिसांना हवा असणारा वाल्मीक कराड 22 दिवसांपासून फरार होता. तो मंगळवारी पुण्यातील सीआयडी ऑफिसमध्ये शरण आला. फरार आरोपीला अटक न होता, तो स्वतःहून शरण आल्यामुळे विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली होती. या टीकेवर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्युत्तर दिले.

एखादा आरोपी शरण येत असेल आणि तपास पुढे जाणार असेल, तर त्यावर टीका करणे योग्य नाही. कालपर्यंत आरोपीला पकडत नाही, असे म्हणत होते. आता तो शरण आला, तर त्यावरही टीका करतात, तपास यंत्रणांवर कोणतेही दडपण येणार नाही, असेही ते म्हणाले. बीडच्या प्रकरणातील कोणताही आरोपी सुटणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे, असे ते म्हणाले.



■ **नागपूर :** बघता बघता 2024 हे वर्ष सरले आणि नवीन वर्ष उजाडले. नूतन वर्षाचे स्वागत करण्यासाठी तरूणाई अत्याधिक उत्सूक असते. मंगळवारच्या रात्री नागपुरातील तरूणाईने नववर्षाचे जल्लोषात स्वागत केले. यात मुलींचाही विशेष सहभाग दिसून आला. आशा आकांक्षा फलद्रूप होवोत म्हणून प्रार्थना करीत या मुलींनी 2025 वर्षाचे अनोख्या पद्धतीने स्वागत केले.

## वहिनीच्या प्रेमाची ईच्छा आणि भावाचा खून

वहिनीसोबत दीराचे सूत जुळले. त्याची कुणकुण मोठ्या भावाला लागली. प्रेमसंबंधात मोठा भाऊ अडसर ठरत होता. त्यामुळे वहिनीचे प्रेम मिळविण्यासाठी लहान भावाने मोठ्या भावाचा पुतण्याच्या मदतीने दगडाने ठेचून खून केला.

मृतदेह जंगलात फेकून पळ काढला. मात्र, बुटीबोरी पोलिसांनी मोठ्या शिताफीने हत्याकांडाचा छडा लावून दोघांनाही अटक केली. चंद्रकांत असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. पंकेश आणि बंटी अशी आरोपींची नावे आहेत.

चंद्रकांत (४०) हा जामठ्यात शेतमजुरी करायचा. त्याला पत्नी व एक मुलगा बंटी आहे. त्याच्या घराशेजारी त्याचा चुलत भाऊ पंकेश (३०) राहतो. चंद्रकांतला दारुचे व्यसन होते. तो घरातही पत्नी व मुलाशी वाद घालत होता. पंकेश हा विवाहित असून त्याला दोन मुले आहेत. त्याचे तिच्याशी चांगले संबंध होते. मोठा भाऊ चंद्रकांत हा पत्नीचा छळ करीत असल्याची त्याला जाणिव होती.

अनेकदा पंकेश हा चंद्रकांत आणि तिचे भांडण सुरु असल्यानंतर त्यांच्या घरी जाऊन भांडण सोडवत होता. ती पंकेशसोबत किराणा आणायला, खरेदी करायला किंवा अन्य कामासाठी जात होती. यादरम्यान, दोघांची जवळीक वाढली. प्रेमसंबंध जुळ्ले. याबाबत तिचा मुलगा बंटी यालाही माहिती होती. मात्र, वडिलाचा स्वभाव बघता त्यानेही आईच्या प्रेमसंबंधाला मूकसंमती दिली.

**अनैतिक संबंधाची पतीला कुणकुण**

तिचे आणि पंकेश या दोघांचे अनैतिक संबंध बरेच वाढले. दबक्या आवाजात वस्तीत दोघांच्या प्रेमाची चर्चा होती. ती चंद्रकांतच्या कानावर आली. त्यामुळे त्याने दोघांवर पाळत ठेवली. महिनाभरापूर्वी शेतावर जाणार असल्याचे सांगून तो तासाभरात घरी परतला. त्यावेळी पंकेश हा त्याच्या घरी आढळून आला. त्यामुळे दोघांनाही चंद्रकांतने मारहाण केली.

**असा केला खून**

वहिनीला नेहमी मारहाण होत असल्यामुळे पंकेशचा जीव तुटत होता. त्याने पुतण्या बंटीला हाताशी धरले आणि चंद्रकांतचा खून करण्याचा कट रचला. सोमवारी रात्री चंद्रकांतला दारु पिण्यासाठी बोलावले. उमरेड-बुटीबोरी राज्य महामार्गावर नेऊन दारु पाजली. त्यानंतर बंटी आणि पंकेशने चंद्रकांतचा गळा आवळून खून केला. ओळख पटू नये म्हणून त्याच्या चेहरा दगडाने ठेचला. मात्र, दुस?या दिवशी पोलिसांनी तंत्रज्ञान व गुप्त माहितीच्या आधारे हत्याकांडाचा छडा लावला.

## नाट्य रंगभूमीवरील खणखणीत नाणं नरेश गडेकर

■ **सुजाता बंडावार**
**नागपूर, दि. १:**
अभिनय, लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य अशा नाट्य रंगभूमीच्या सर्वच क्षेत्रात आपली अमिट छाप सोडणारे व आपल्या वकुबी कौशल्याने विविध पुरस्काराने अलंकृत असणारे सर्वव्यापी नरेश गडेकर म्हणजे नाट्य रंगभूमीवरील खणखणीत नाणं होय.

त्यांच्या नाट्य क्षेत्रातील प्रवासाची सुरुवात मात्र या क्षेत्राविषयीच्याअनास्थेने झाली. आई-वडिलांनी लगावलेले ठोसे व श्रेष्ठ मंडळींकडून आलेल्या निमंत्रणातून त्यांच्यातील अभिनय कौशल्याला स्फुरण चढलं व त्यांनी या रंगभूमीवरील एक एक एक्के काबीज करीत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या प्रथम अध्यक्ष व उपाध्यक्ष पर्यंत मजल मारली.



**पूर्वार्ध**

झाडीपट्टी रंगभूमीवरील अष्टपैलू, सदासर्वदा मागणी असलेले अभिनेते व ज्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत येथील झाडीपट्टी रंगभूमीची सेवा केली असे सुमंत गडेकर यांचे सुपुत्र असलेले नरेश गडेकर यांच्यात अभिनयाचे उपजत गुण असूनही त्यांना मात्र या रंगभूमीविषयी बालपणी अजिबात आवड नव्हती.

आपल्या वडिलांची धडपड, रात्री बेरात्रीचे काम व त्यांचे हाल पाहून त्यांचा नाट्य क्षेत्राला वाहून घेण्याचा अजिबात मानस नव्हता. पण एवढ्या मोठ्या नटाचा मुलगा म्हणून अवतीभवती असलेल्या परिजनांकडून त्यांच्याबद्दल नाटक करण्याविषयीच्या रास्त अपेक्षा होत्या. यातूनच त्यांनी शाळेत असताना काही नाटकात काम केले व त्यांच्या अभिनयाचे कौतुकही झाले. व त्यातून रंग स्वानंद संस्थेच्या माध्यमातून चिकी चिकी बोंब बोंब, लाटने काकू बाल न्यायालयात, कृष्ण गोकुळी येतो, चिमणा बांधतो बंगला यासारखे बालनाटके केली.

काही काळानंतर त्या काळाचे नावाजलेले अभिनेते, दिग्दर्शक असलेले किशोर आयलवार यांनी अरे मानसा मानसा या नाटकाच्या मुख्य भूमिकेसाठी विचारणा केली. पण ही भूमिका करण्याविषयी आसक्ती नसताना घरच्यांनी लगावलेल्या तागदयातून या भूमिकेच्या दोन-तीन तालमी केल्यानंतर ही भूमिका त्यांच्याकडून काढून टाकण्यात आली. आणि त्यांना एका लखवा मारलेल्या व्यक्तीची छोटेखाणी भूमिका देण्यात आली. त्यामुळे नाराज असलेल्या नरेश गडेकर यांना त्यांच्या आई-वडिलांनी समजविल्यानंतर त्यांनी ही भूमिका साकारली आणि प्रेक्षकांची मोठी दादही मिळाली.

या या भूमिकेनंतर नजरेत आलेल्या नरेश गडेकर यांनी त्याच दिग्दर्शकाने विचारणा केलेल्या महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवाच्या मुक्तिपथ नाटकात मुख्य नायकाची भूमिका साकारली आणि ही भूमिका प्रचंड गाजली.

(क्रमशः)

## सोन्याच्या दरात किंचित वाढ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १:**
नववर्षाचे स्वागत सर्वसामान्य नागरिकांकडून जल्लोषात करण्यात आले. परंतु, सोने- चांदीच्या दराने ग्राहकांची चिंता वाढवली आहे.

नववर्षाच्या पहिल्याच दिवशी सोने- चांदीच्या दराने ग्राहकांची चिंता वाढवली आहे. दरम्यान नागपुरातील सराफा बाजारात ३१ डिसेंबर २०२४ रोजी बाजार उघडल्यावर सोन्याचे दर घसरले होते. परंतु नववर्षाच्या पहिल्याच दिवशी दर वाढले. नागपुरातील सराफा बाजारात सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७६ हजार ३०० रुपये इतके होते.







■ **नागपूर :** नूतन वर्षाच्या आदल्या सायंकाळी पोलिसांनी विशेष मोहिम राबविली. त्याअंतर्गत स्वतः पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल यांनी स्वतः रस्त्यावर उतरून वाहन चालकांचे प्रबोधन केले. पोलिस अधिकाऱ्यांनीही वाहन चालकांना पुष्प देवून स्वागत केले.

## रस्ते अपघातात ३ ठार, २ जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १:**
शहर पोलिसांकडून नववर्षाच्या पूर्वसंध्येला ह्यशून्य अपघात मोहीमह्ण राबविण्यात आली होती. पोलिस आयुक्तांनी नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आणि मद्यप्राशन करून वाहन न चालविण्याचे आवाहन केले होते.

अपघाताची पहिली घटना शांतीनगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. मद्यपी ऑटो चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून दुचाकीला जबर धडक दिली. यात दुचाकीने जात असलेल्या दोन मित्रांपैकी एकाचा मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी आहे. कार्तिक विलास मारोडे (16) रा. शांतीनगर घाट, असे मृता नाव आहे. जखमी प्रणय मुकेश डोळस (19) रा. मुदलीयार चौक, श्रीहरी रोड, शांतीनगर याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

प्रणय आणि कार्तिक थर्टीफस्टची पार्टी करण्यासाठी दुचाकीने लकडगंज परिसरातील हॉटेल सुनील येथे जात होते. इतवारी रेल्वे स्थानकाजवळ समोरून भरधाव आलेल्या ऑटो चालकाने त्यांना जबर धडक दिली आणि पळून गेला. प्रणय आणि कार्तिक दोघेही वाहनासह खाली पडून गंभीर जखमी झाले. आसपासच्या नागरिकांनी दोघांनाही उपचारार्थ खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान कार्तिकचा मृत्यू झाला, तर प्रणयवर उपचार सुरू आहेत.

अपघाताची दुसरी घटना कपिलनगर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. दारूच्या नशेत असलेल्या ट्रक चालकाने रस्ता ओलांडत असलेल्या दोघांना जबर धडक दिली. यात एकाचा मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी आहे. संजय घनश्याम पराशर (42) रा. मांडवा वस्ती, कामठी रोड असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी जखमी राजेश बाबुलाल लांजेवार (40) यांच्या तक्रारीवरून आरोपी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

अपघाताची तिसरी घटना बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. अज्ञात वाहनाच्या धडकेत एका दुचाकीस्वार व्यक्तीचा मृत्यू झाला. निमेश सुखदयाल आर्या (46) रा. अप्पास्वामी अपार्टमेंट, चिंचभवन, बेलतरोडी असे मृताचे नाव आहे.




# अमित शहा वक्तव्याच निषेधार्थ रामटेक मधील विविध संघटनेमार्फत राष्ट्रपतींना निवेदन

**महासागर प्रतिनिधी,**

**रामटेक, दि. १ :** गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेमध्ये केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी अपमानास्पद वक्तव्याच्या विरोधात व परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूच्या विरोधात विविध संघटनाच्या वतीने रामटेक येथील नायब तहसीलदारांच्या मार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले. नुकतेच संसदेत गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल अपमानास्पद वक्तव्य केले. या द्वेषपूर्ण वक्तव्य विषयी गृहमंत्री अमित शहा यांना



पदावरून बरखास्त करावे व तसेच सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूस दोषी असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी असे निवेदन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राजू हटवार, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ॲड. आनंद गजभिये, अखिल भारतीय शेतमजूर युनियनचे भीमराव गोंडाने, भाऊराव भिलावे, भीम संग्राम सेनेचे भागवत सहारे व बुद्धीष्ट सोसायटीचे डोंगरे, रामराव कळंबे, राजेश वानखेडे व रामकृष्ण टिपले यांच्या शिष्टमंडळाने नायब तहसीलदार मार्फत राष्ट्रपतींना सादर केले.

# गजानन महाराज पालखी यात्रेचे काली मंदीरात येथे ३ जानेवारी ला आगमन व भव्य स्वागत

**महासागर प्रतिनिधी,**

**कन्हान, दि. १ :** श्री संत गजानन महाराज सेवा समिती, तीन खंबा चैक नागपुर व्दारे अठराव्या वर्षी संत गजानन महाराज पायी पालखी दिंडी यात्रेचे आयोजन करून शुर्क वार (दि.३) जानेवारी ला सायंकाळी कन्हान शहरात आगमन होताच मॉ काली माता सेवा टस्ट सत्रापुर कन्हान व्दारे भव्य स्वागत करून, किर्तन व नंतर महाप्रसाद आणि मुक्काम करण्यात येईल.

**: गण गण गणात बोते ओम नमो भगवते गजाननाय श्री राम जय राम जय जय राम:**

श्री सद्गुरू गजानन बाबांचे वास्तव्य नागपुर शहरात श्री गोपाळ बुटी यांचे वाडयात असतांना श्री भक्त हरी कुकाजी पाटील त्यांना परत नेण्याकरिता आले व (दि.५) जानेवारी १९०९ ला सद्गुरू गजानन बाबा सोबत ते रामटेकला गेले. त्याकाळी प्रत्यक्ष श्री रामभक्त शंकरबुवा रामटेक गड़मंदिरवर प्रभु श्रीरामां च्या प्रत्यक्ष दर्शनासाठी जप करित होते. त्यांचे नित्य नेम प्रभु रामाच्या नामाचा जप व गडमंदीर परिसराची साफ्र सफ्राई हे कार्य करताकरता १२ वर्षाचा कालावधी झालेला होता. श्री गजानन बाबा गडावर पोहोचले व त्यावेळेस शंकरबुवा हाती झाडु घेऊन मुखाने श्रीरामाचा जप करित आनंदाने स्वच्छतेचे कार्य करित होते. त्यांनी पाहिले कि, कोदंडधारी वनवासी जटाजूट असलेले श्रीराम साक्षात गडावर येत आहेत. त्यांच्या हाताचा झाडु जमिनीवर पडला व ते प्रभु रामाच्या पायावर लोटले. आपल्या



नेत्रातील अश्रुधारेंनी प्रभुंचे पायाचा अभिषेक केला व परत उठुन पाहिले तर समोर गजानन बाबा दिगंबर अवस्थेमध्ये दिसले. परत डोळे मिटुन उघडले तो साक्षात पितांबरधारी श्रीराम उभे हा भक्त व भगवंत यांच्या भेटीचा सोहळा बराच वेळ चालला. सद्गुरू गजानन बाबांनी शंकरबुवांना घट्ट आलिंगन दिले व आशीर्वाद दिला. हा प्रसंग म्हणजे 'जीव आणि शिव' यांची एकात्मता याचे साक्षात उदाहरण आहे. या प्रसंगाची आठवण प्रत्येक भक्ताला व्हावी. या निमित्य 'श्री' ची छोटीशी सेवा म्हणुन (दि.३) जानेवारी २०२५ ला श्री संत गजानन महाराजां ची पालखी यात्रा टिमकी, तीनखंबा चौक नागपुर श्री हरिहर गजानन निवास येथुन प्रस्थान होऊन (दि.५) जानेवारी २०२५ रोजी श्रीक्षेत्र रामटेक येथे आगमन व (दि.६) जानेवारी २०२५ ला गोपालकाल्याचे कीर्तन व समापन होऊन पालखी यात्रा परत होईल.

**मॉ काली माता मंदीर सत्रापुर- कन्हान येथे भव्य स्वागत व मुक्काम.**

शुक्रवार (दि.३) जानेवारी पहाटे सकाळी वाजता श्रीं ची आरती, श्री हरिहर गजानन निवास, टिमकी, तीन खंबा चौक, नागपुर येथुन सकाळी संत गजानन महाराज पायी पालखी दिंडी यात्रेचे प्रस्थान होऊन श्री गजानन महाराज मंदिर प्रेमनगर येथे सकाळी वा. श्री भवानी माता मंदीर कळमना येथे सकाळी . वा. फराळ पाणी, कामठी येथे आगमन, मिरवणुक, कामठी , मोदी राम मंदीर येथे श्री भक्त कामठी वासियां व्दारे दुपारचे जेवण तदंतर प्रवचन व अल्प विश्रांती, काली माता मंदीर येथे पालखीचे आगमन होताच मॉ काली माता मंदीर सेवा ट्रस्ट, सत्रापुर कन्हान व्दारे भव्य स्वागत व साय किर्तन व नंतर महाप्रसाद आणि मुक्काम. शनिवार (दि.३) जानेवारी ला सकाळी पालखी प्रस्थान, राष्ट्रीय महामार्गाने गणेशनगर, श्री हनुमान, गजानन मंदीर तीवाडे ले-आऊयेथुन पांधन रोडने कन्हान नगर प्रदक्षिणा करित स. . वा. श्री काकडे निवास येथे चाय नास्ता व विसावा, शितला माता मंदीर जे एन रोड येथे स्वागत नंतर कांद्री गाव प्रदक्षिणा करून जे एन दवाखाना चौक ते बोरडा

**-नगरधन मार्गे रामटेक कडे मार्गक्रमण करेल.**

या पालखी यात्रेत आपण सहभागी होऊन श्री गजानन महाराजांचे सोबत प्रभु श्रीरामचंद्रांचे दर्शनाचा लाभ घेऊन या मंगल प्रसंगी आठवण साकार करावी असे आवाहन मॉ काली माता मंदीर ट्रस्ट चे व्यवस्थापक श्री उत्तमरावजी दुरूगकर हयानी केले आहे.

# दुसऱ्या आंतरजातीय व ३२व्या हलबा जमात वधू-वस्रोफत परिचय संमेलनाचे आयोजन ५ जानेवारी



**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १ :** हलबा समाज मॅरेज ब्युरो तर्फे दुसऱ्या आंतरजातीय व ३२व्या हलबा जमात वधू-व मोफ्रत परिचय संमेलनाचे आयोजन ५ जानेवारी रोजी टेलिफोन एक्सचेंज चौकातील श्री गुरु कोलबास्वामी सभागृहात करण्यात आले आहे. कार्यक्र माच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार अशोक मानकर असतील तर स्वागत वक्ते म्हणून राजू बुरडे उपस्थित राहणार आहेत. यावेळी नवनिर्वाचित आमदार कृष्णा खोपडे, मोहन मते, प्रवीण दटके आदींचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्र मास विशेष अतिथी म्हणून माजी आमदार विकास कुंभारे, गणेश गायकवाड, प्रकाश निमजे, चंद्रभान पराते उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती मॅरेज ब्युरोचे भास्कर सदाशिवराव केदारे यांनी एका पत्रकान्वये दिली आहे. त्यांनी सांगितले की, हलबा जमात व्यतिरिक्त इतर जातीतील विवाहयोग्य वधू-वस्रोठ्या सं'येने या परिचय परिषदेला उपस्थित राहणार आहेत किंवा परिचय संमेलन विनामूल्य आहे.

# वाडीत २४ कुंडीय गायत्री महायज्ञ शाळा मंडपाचे भूमिपूजन

## पाच दिवशीय धार्मिक कार्यक्र माचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी,**

**वाडी, दि. १ :** १ जानेवारी दत्तवाडीतील संत गजानन महाराज मंदिर प्रांगणात बुधवार ८ जानेवारी ते रविवार १२ जानेवारी दरम्यान गायत्री प्रज्ञा महिला मंडळ वाडी यांनी आयोजित केलेल्या २४ कुंडीय गायत्री महायज्ञ व प्रज्ञा पुराण कथेच्या महा मंडपाचे बुधवार १ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता विधिवत भूमिपूजन करण्यात आले.यावेळी गायत्री शक्ती पिठाचे माजी अध्यक्ष दिपक बिडवाईक,व्यवस्थापक प्रेमसिंग बैस, आशिष श्रीवास्तव, बंडुभाऊ मेश्राम, वाडी मंडळाच्या अध्यक्षा निर्मला राऊत, कार्यकारी अध्यक्ष गणेश सालोडे, गजानन महाराज मंदिर कमेटीचे ॲन्ड. श्रीराम बाटवे, समाजसेवक हर्षल काकडे, नरेश चरडे, मधू माणके पाटील, भास्करराव रिनके व गायत्री



परिवारातील अनेक महिला व पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते. अखिल विश्व गायत्री परिवारचे प्रतिनिधी आंतरराष्ट-ीय कथा वाचक योगीराज बल्की हे पाच दिवस चालणाऱ्या पावन प्रज्ञा पुराण कथेचे वाचन करणार आहेत.

बुधवार ८ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता दत्तवाडी परिसरात भव्य कलश यात्रा काढून या महायज्ञाची स्थापना करण्यात येईल. गुरुवार ९ जानेवारी पासून शनिवार ११ जानेवारी पर्यंत सकाळी ६ वाजता ते संध्याकाळी ७ वाजता पर्यंत दररोज ध्यान साधना, देव पूजन, यज्ञ पुराण कथा वाचन, करण्यात येईल व ११ जानेवारी रोजी आकर्षक दीप यज्ञ, रविवार १२ जानेवारी रोजी महाप्रसादाने टोली विदाई होईल. परिसरातील सर्व भविकांनी या कार्यक्र माचा लाभ घ्यावा असे आवाहन गायत्री प्रज्ञा महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ७७ प्रकरणांची नोंद

## उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई

**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १ :** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. बुधवार (१) रोजी शोध पथकाने ७७ प्रकरणांची नोंद करून ३५,८००/- रुपयाचा दंड वसूल केला. सार्वजनिक ठिकाणी रस्ता फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी थुंकणे (रु. २००/- दंड) या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून २०० रुपयांची वसुली करण्यात आली. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ३२ प्रकरणांची नोंद करून १२,८००/-रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत ३ प्रकरणांची नोंद करून ३०० रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/-दंड) या अंतर्गत १३ प्रकरणांची नोंद करून ५,२००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ७ प्रकरणांची नोंद करून ३,५००/-रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १,०००/ रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी बांधकामाचा मलबा / टाकवू कचरा टाकणे साठवणे या अंतर्गत ३ प्रकरणांची नोंद करून ३,०००/ रुपयांची वसुली करण्यात आली.उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास ९ प्रकरणांची नोंद करून १,८००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे.

उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ८ प्रकरणांची नोंद करून ८,०००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

# आरपीएफ नागपूरने ऑपरेशन 'नन्हे फरिश्ते' अंतर्गत संकटग्रस्त बालकाला वाचवले

**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १ :** रेल्वे संरक्षण बल (आरपीएफ), नागपूरने आपली दक्षता आणि सहानुभूती दाखवत ऑपरेशन 'नन्हे फरिश्ते' अंतर्गत नागपूर रेल्वे स्थानकावर सापडलेल्या संकटग्रस्त बालकाला वाचवले.ही घटना रात्री १:०० वाजताच्या सुमारास घडली, जेव्हा उप-निरीक्षक अनुराधा मेश्राम यांनी प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर गस्त घालताना एकट्या व चिंताग्रस्त स्थितीत फिरणाऱ्या बालकाला पाहिले. आरपीएफ पथकाने त्वरित हस्तक्षेप करत बालकाला सुरक्षिततेत आणले आणि नागपूर आरपीएफ पोस्ट येथे नेले.

नागपूर चाइल्डलाइनच्या प्रतिनिधींनी बालकाला समुपदेशन केले आणि आवश्यक चौकशी संवेदनशील पद्धतीने केली. कुटुंबाशी संपर्क साधण्यासाठी तत्काळ प्रयत्न करण्यात आले, आणि बालकाला चाइल्डलाइनच्या देखरेखीखाली सोपवण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर, स्थानिक बालकल्याण गृहात तात्पुरत्या निवासाची व्यवस्था करण्यात आली.

आरपीएफ नागपूरच्या या वेगवान व संवेदनशील कृतीतून रेल्वे परिसरातील असुरक्षित व्यक्तींच्या सुरक्षेसाठीची त्यांची वचनबद्धता दिसून येते. ऑपरेशन 'नन्हे फरिश्ते'सारख्या उपक्रमांतून गरजू बालकांच्या सुरक्षेसाठी आरपीएफचा सक्रिय दृष्टिकोन अधोरेखित होतो.

मध्य रेल्वे उप-निरीक्षक अनुराधा मेश्राम व आरपीएफ पथकाच्या सार्वजनिक सुरक्षेप्रती व कल्याणासाठीच्या योगदानाची प्रशंसा करते.

# वसंत देसाई क्रीडा संकुलात आज शालेय क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ

**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १ :** अकोला तालुका पंचायत समितीतर्फे शालेय खेळ व क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ वसंत देसाई क्रीडा संकुलात उद्या (दि. २ जानेवारी) सकाळी ११ वा. होईल.



जि. प. अध्यक्ष संगीताताई अढाऊ यांच्या हस्ते उद्घाटन व पं. स. सभापती सुलभाताई सोळंके अध्यक्षस्थानी असतील. तालुक्यातील शाळांतील विद्यार्थी विविध खेळांत सहभागी होणार आहेत. स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक खेळ होतील. स्पर्धेचे बक्षीस वितरण दि. ३ जानेवारीला होईल, असे पं. स. गटविकास अधिकारी जयश्री वाघमारे यांनी सांगितले.

# १६ ते २० जानेवारीला होणार ग्रामायणचे भव्य उद्यम प्रदर्शन

**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १ :** नरसेवा हीच नारायण सेवा हे ब्रीद घेऊन कार्यरत असलेल्या ग्रामायण प्रतिष्ठानतर्फे १६ ते २० जानेवारी २०२५ दरम्यान ग्रामायण उद्यम प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे भव्य प्रदर्शन अमृत भवन, आंध्र असोसिएशन, सीताबर्डी, नागपूर येथे सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत होणार असून, ग्राहकांसाठी प्रवेश नि:शुल्क राहणार आहे.

**ग्रामायण प्रतिष्ठानचा प्रवास आणि उद्दिष्टे:**

ग्रामायण प्रतिष्ठानने २०१२ पासून ग्रामीण भागातील उपक्रम, पर्यावरण पूरक प्रकल्प, वर्कशॉप्स आणि सामाजिक सेवा या क्षेत्रात महत्त्वाचे कार्य केले आहे. विविध उपक्रमांद्वारे संस्थांनी शेतकरी, महिला, उद्योजक, दिव्यांग, कलाकार, आणि स्थानिक उत्पादक यांना व्यासपीठ मिळवून दिले आहे.

**प्रदर्शनाची वैशिष्ट्ये:**

विविध श्रेणीतील स्टॉल्स: ग्रामीण तसेच स्थानिक उत्पादने, सेंद्रिय शेतीच्या वस्तू, पारंपरिक व पर्यावरण पूरक वस्तू, बचत गटांचे उपक्रम, स्वनिर्मित वस्तू यांचे प्रदर्शन.

विशेष उपक्रम: कौशल्य विकास कार्यक्रम, नावीन्यपूर्ण स्पर्धा, आणि दाते यांच्यासोबत जोडणारे उपक्रम.

कला दालने: बांबू आर्ट, गोंडी आर्ट, माती काम, कचऱ्यातून तयार केलेल्या कलाकृती यांचे आकर्षण.

ई-वेस्ककलेक्शन: जुने कपडे व साड्या गोळा करून त्यापासून पिशव्या तयार केल्या जातात.

सरकारी योजनांची माहिती: सरकारी उपक्रमांविषयी जागरूकता निर्माण करणारे स्टॉल्स.

**:उद्योजकांसाठी सुवर्णसंधी:**

हे प्रदर्शन नोकरीच्या अपेक्षेने न राहता स्वत:च्या पायावर उभे राहणाऱ्या उद्योजकांसाठी प्रेरणादायी आहे. छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि व्यवसाय वाढवण्यासाठी हे व्यासपीठ उपयोगी ठरेल.

**स्टॉल बुकिंग सुरू:**

ग्रामायण प्रतिष्ठानने उद्योजकांना प्रदर्शनात स्टॉल बुक करून सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले आहे.

**संपर्क:**

९८२२९४२२०३

९४२२४४३८७०

९६६५०५४५०८

# नवीन वर्षात थकीत मालमत्ता करावरील शास्ती / दंड ८० टक्के माफ होणार

## मनपाद्वारे नागपूरकरांना नवीन वर्षाची भेट

**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १ :** नागपूरकर जनतेला नागपूर महानगरपालिकेद्वारे नवीन वर्षाची अनोखी भेट देण्यात येत आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कर थकबाकीदाराकडून थकीत मालमत्ता कर रक्कमेवर लागणारी शास्ती / दंड ८० टक्के माफ करण्याची महत्वाकांक्षी मालमत्ता कर अभय योजना २०२४-२०२५नागपूर मनपाद्वारे सुरू करण्यात आली आहे. ०१ जानेवारी २०२५ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे.

नागपूर शहरातील ज्या मालमत्ताधारकांद्वारे विहित कालावधीत मालमत्ता कराचा भरणा केले जात नसल्याने संबंधीत मालमत्तेच्या थकीत मालमत्ताकरावर २ टक्के प्रति माह प्रमाणे शास्ती / दंड लागत असून दि. ३१.१२.२०२४ पर्यंत अशा २८६३९९ मालमत्ताधारकांवर रु.८५०,१०,७३,०००/- मालमत्ता कर बकाया असून यावर रु.७७०,४५,२८,०००/- व्याज/शास्ती लागलेली आहे. यामध्ये शासकीय/निमशासकीय मालमत्ता करीता सुद्धा मालमत्ता कर रक्कम रु.३०.७३ कोटी थकीत आहे व विवादीत प्रकरणामुळे सुद्धा रक्कम रु.२२७.०० कोटी थकीत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ट 'ड' प्रकरण-८चे कराधान नियम ४२ अन्वये मालमत्ता कर भरण्यास पात्र व्यक्तीने या अधिनियमाच्या तरतूदीन्वये आवश्यक असल्याप्रमाणे शास्ती किंवा व्याज अथवा दोन्ही यासह मालमत्ता कर भरला नसेल तर कसूरदाराची जंगम मालमत्ता / स्थावर मालमत्ता अटकावणी किंवा जप्ती करण्यात येवून याकरीता नियम ५० अन्वये लागू केलेली फी किंवा वसुलीचा खर्च म्हणून संबंधीत मालमत्ताधारकांकडून वसुल करण्यात येते. शास्तीची रक्कम माफ करण्याबाबत वेळोवेळी प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने तसेच बकाया रक्कमेची वसुली अधिक प्रमाणात करता येईल यादृष्टीने




मालमत्ताधारकांच्या थकीत मालमत्ताकरावरील लागत असलेली शास्ती/व्याज तसेच जप्ती / वारंट फी वा वसुलीचा खर्च या रक्कमेवर ८० टक्के माफी देणारी महत्वाकांक्षी मालमत्ता कर अभय योजना २०२४-२०२५ नागपूर महानगरपालिकेद्वारे सुरू करण्यात आली आहे.

०१ जानेवारी २०२५ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे. ही योजना राबविल्यास दिनांक ३१ मार्च २०२४ पर्यंत थकबाकीची रक्कम यावरील २० टक्के शास्ती/दंड रक्कमेसह चालू आर्थिक वर्ष २०२४-२०२५च्या मालमत्ता कर नागपूर महानगरपालिका निधीत जमा करणे आवश्यकआहे. मुळ बकाया आणि २० टक्के शास्ती/दंड रंक्कम यासह जवळपास २०० कोटी ची वसुली मनपाला अपेक्षित आहे. ज्या मालमत्ताधारकांनी या योजनेचा दिलेल्या कालावधीत लाभ घेतला नाही किंवा सामील होण्यास तयार नसतील त्यांचे विरूध्द या कालावधीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कराधान नियम अंतर्गत असलेल्या तरतुदीच्या अधिन राहून कार्यवाही करण्यात येईल. सदर योजना ही वर नमूद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रकमांनाच लागू राहील. या योजनेच्या प्रारंभापूर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या रकमांना लागू राहणार नाही. योजना सुरु होण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत मागणी/दावा करता येणार नाही, असेही मनपाद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे.

**नागपूरकर जनतेला नागपूर महानगरपालिकेद्वारे नवीन वर्षाची अनोखी भेट देण्यात येत आहे.**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्वेंशन सेंटर येथे लोककला महोत्सव थाटात संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक , दि. १ : डिसेंबर ला रोज रविवारला डॉ. बाबासाहेब कन्वेंशन सेंटर येथे लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी ते वाजेपर्यंत कार्यक्रमाचे सादरीकरण झाले. प्रारंभी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाहीर अलंकार टेंभुर्णे यांनी महापुरुषांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले.



लोककलेचे जतन व संवर्धन व्हावे हाच एकमेव उद्देश ठेवून लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते .लोककला हीच आपली खरी संस्कृती आहे व यातूनच सुसंस्कृत समाज घडवायचा आहे. लोककला म्हणजे लोकांनी लोकांकरता लोकांकडून निर्माण केलेली कला म्हणजे लोककला होय. आपल्या संत व महापुरुषांनी सुद्धा ह्याच लोककलेच्या माध्यमातून समाज प्रबोधन करून अनिष्ट रूढी परंपरा यावर जोरदार हल्ला चढविला आहे व समाजाला एक चांगला व मार्ग दाखविला आहे. कार्यक्रमादरम्यान शाहीर टेंभुर्णे गुरुजी सार्वजनिक वाचनालय तर्फे व मॉयल इंडिया लिमिटेड काटोल रोड द्वारा ढोलकीच्या तालावर व घुंगराच्या बोलावर या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले .जय भीम डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती रामटेक तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवास आपल्या कार्यक्रमाच्या माध्यमातून मानवंदना देण्यात आली.

दि लॉर्ड अशोका बॅकवर्ड मल्टीपर्पस सोसायटी तर्फे लोककलेचा दरबार भरवला. तसेच चैताली भजन दंडार मंडळ यांनी दंडार सादर केली तर शारदा बहुउद्देशीय महिला मंडळ यांनी लोकनृत्य सादर केले त्याचप्रमाणे झाडीपट्टी कलाकार संस्था यांनी लोककलेचा जलसा यावर कार्यक्रम सादर केला तर शेवटी संत गाडगे बाबा ग्रामस्थ संस्था नरखेड यांनी लोककलेला मुजरा करून कार्यक्रमाची सांगता केली कार्यक्रम रसिकांकरता निशुल्क होता शेवटी संस्थेचे अध्यक्ष अलंकार टेंभुर्णे यांनी सर्व संस्थांचे व कलाकारांचे आभार व्यक्त केले .जय भीम डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती रामटेक शाहीर टेंभुर्णे सार्वजनिक वाचनालय रामटेक अशोका बॅकवर्ड मल्टीपर्पस सोसायटी रामटेक यांनी आयोजनाची मुख्य भूमिका बजावली.

तसेच उपद्रव शोध पथकाने धंतोलि झोन अंतर्गत मे. स्पृहा पार्क व्यू यांच्या बांधकामाचे साहित्य रस्त्याच्याकडेला टाकल्याबद्दल रू. १०,०००/–हजार रुपयांचा दंड वसूल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. कुसरे किराणा शॉप यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल ५,०००/– हजार रुपयांचा दंड वसुल केला. उपद्रव शोध पथकाने २ प्रकरणांची नोंद करून रू. १५,०००/–दंड वसूल केला.

# डिफेन्स धरमपेठ इंग्लीश मीडियमचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न






■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १ : डिफेन्स ऑर्डनन्स फॅक्टरी मधील धरमपेठ इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन धरमपेठ शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष अधिवक्ता उल्हास औरंगाबादकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. प्रमुख पाहूणे म्हणून ऑर्डनन्स फॅक्टरी अंबाझरीचे महाव्यवस्थापक रोहित देब बर्मा , अधिवक्ता सचिन वसंत नरळे,शालेय समितीचे अध्यक्ष दीपक दुधाणे, मुख्याध्यापक विजय मुनघाटे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदना व देवी सरस्वतीच्या पूजनाने झाली. सर्व विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते, ज्यात नृत्य, संगीत आणि नाटक यांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. मुख्याध्यापक विजय मुंगाटे यांनी शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला. रोहित देब बर्मा यांनी सांगितले की, हा वार्षिक महोत्सव विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी आहे. अध्यक्षस्थानावरून बोलतांना अधिवक्ता उल्हास औरंगाबादकर यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला सर्व सुविधा देण्याचा शाळेचा सदैव प्रयत्न राहील, अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे आयोजन श्वेता श्रीवास आणि उज्वला आहेर यांनी केले. संचालन शिल्पा भिसेन, वसंत निकम यांच्या मार्गदर्शनाखाली अल्फिया अन्सारी, कादंबरी अवतारे, उन्नती तेलमोरे, शिताशु बोरकर या विद्यार्थिनींनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शिक्षक चैताली दंडारे आणि निक्की सिंग यांनी केले होते. आभार प्रदर्शन संगीत शिक्षिका पूजा मसीद व काही विद्यार्थ्यांनी केले. यावेळी प्रभारी प्रमुख राखी सरोदे, आराधना सिंग, विद्या कोलते, मनीषा सिंगाडे, मनीषा सातपुते, विद्या लोखंडे, सोनल मिश्रा, मयुरी दंडारे, निधी सकलानी, मंगला गजभिये, काजल शंभरकर, मनाली भोयर, रश्मी नेमा पाटील, शिल्पा भिसेन, नीलू रामराय, नलिनी पाटील, दीपाली चौधरी, लता सिंग अभिषेक गजभिये, वैभव सरोदे, वैशाली हरदास, गरिमा शिंगाडे, अश्विनी खाडे, अर्चना फाटे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ७७ प्रकरणांची नोंद

## उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ : नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. बुधवार (१) रोजी शोध पथकाने ७७ प्रकरणांची नोंद करून ३५,८००/–रुपयाचा दंड वसूल केला. सार्वजनिक ठिकाणी रस्ता फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी थुंकणे (रु. २००/–दंड) या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून २०० रुपयांची वसुली करण्यात आली. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/–दंड) या अंतर्गत ३२ प्रकरणांची नोंद करून १२,८००/– रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत ३ प्रकरणांची नोंद करून ३०० रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/–दंड) या अंतर्गत १३ प्रकरणांची नोंद करून ५,२००/–रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ७ प्रकरणांची नोंद करून ३,५००/–रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १,०००/ रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी बांधकामाचा मलबा / टाकवू कचरा टाकणे साठवणे या अंतर्गत ३ प्रकरणांची नोंद करून ३,०००/ रुपयांची वसुली करण्यात आली.उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास ९ प्रकरणांची नोंद करून १,८००/–दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ८ प्रकरणांची नोंद करून ८,०००/–दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोधपथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तसेच उपद्रव शोध पथकाने धंतोलि झोन अंतर्गत मे. स्पृहा पार्क व्यू यांच्या बांधकामाचे साहित्य रस्त्याच्याकडेला टाकल्याबद्दल रू. १०,०००/–हजार रुपयांचा दंड वसूल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. कुसरे किराणा शॉप यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल ५,०००/– हजार रुपयांचा दंड वसुल केला. उपद्रव शोध पथकाने २ प्रकरणांची नोंद करून रू. १५,०००/–दंड वसूल केला.





# नागपूर विभागाने डिसेंबर २०२४ मध्ये मालवाहतूक आणि प्रवाशांच्या कमाईत लक्षणीय वाढ साधली

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ : मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने डिसेंबर २०२४ या महिन्यातील मालवाहतूक आणि प्रवासी कमाईमध्ये उत्कृष्ट कामगिरी नोंदवली असून, त्याचा प्रभावी वाढीचा मार्ग सुरू ठेवला आहे. एकूण मालवाहतूक कमाई रु. ४५४.९६ कोटी , विभागाने ११८४ रेक लोड केले , मागील वर्षाच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली.

**मालवाहतूक संचलनातील प्रमुख उपलब्धी:**

कोळसा वाहतूक :* विभागामध्ये कोळशाचे ८६२ रेक लोड केले गेले , ज्यामुळे रु. ३३९.७६ कोटी कमाई.

लोह खनिज वाहतूक : लोहखनिजाचे ३२ रेक* लोड केले गेले, ज्यामुळे रु. २४.२३ कोटी

सिमेंट वाहतूक* : कमाई % ने वाढली , एकूण रु. ७८ रेकमधून २७.०२ कोटी रु . गेल्या वर्षी याच कालावधीतील ५६ रेकमधून १५.०९ कोटी .

अन्नधान्याची वाहतूक :* कमाई % ने वाढून रु . ३७ रेकमधून १६.८७ कोटी रु.च्या तुलनेत डिसेंबर २०२३ मध्ये १५.६० कोटी

आयर्न स्लॅग ट्रॅफिक* : कमाई १४१% ने वाढली , रु. वर पोहोचली. ७ रेकमधून २.३० कोटी , रु. वरून गेल्या वर्षी ०.९६ कोटी

कंटेनर ट्रॅफिक : कंटेनरचे रेक लोड केले गेले, ज्यातून रु. २०.४२ कोटी , रु. वरून ४५% वाढ. डिसेंबर २०२३ मध्ये १४.१० कोटी

साखरेची वाहतूक : विभागाने साखरेचा १ रेक लोड केला , ज्यामुळे रु. ०.५१ कोटी , १००% ची लक्षणीय वाढ , कारण मागील वर्षी याच महिन्यात एकही रेक नव्हता.

प्रवासी आणि इतर कमाई:*

**प्रवाशांची कमाई :** डिसेंबर २०२४ मध्ये, प्रवाशांची कमाई रु. वर पोहोचली. ५८.४६ कोटी , एकत्रित कमाई रु. एप्रिल ते डिसेंबर पर्यंत ५४३.५१ कोटी .

**पार्सल कमाई :** पार्सलमधून मिळणारी कमाई रु. १.६७ कोटी , एकत्रित एकूण रु. १३.६९ कोटी

**तिकीट तपासणी कमाई :** रु. डिसेंबर २०२४ साठी तिकीट तपासणीमध्ये १.८३ कोटी कमावले होते, ज्यामुळे एकत्रित कमाई रु. २१.९४ कोटी .

**भाडे नसलेले महसूल आणि इतर ठळक मुद्दे:**

नॉन–फेअरमहसूल : डिसेंबर २०२४मध्ये, विभागाने रु. ७५.०१ लाख आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी एकत्रित कमाई रु. ६०७.९१ लाख , लक्ष्य ४२.१५% ने ओलांडले .

**लोडिंग :** विभागाने ते पर्यंत ३ रेक लोड केले, ज्यामुळे रु. ५४ लाख महसूल.

स्टेशन डेव्हलपमेंट* : अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत बल्लारशाह स्थानकावरील कव्हर–ओव्हर शेडचे (८ बे) काम पूर्ण झाले आहे .

**उद्घाटन :** ३० डिसेंबर २०२४ रोजी कमलेश्वर रेल्वे साईडिंग येथे ऑफिस बिल्डिंग आणि कमर्शियल रूमचे उद्घाटन करण्यात आले.

**ओएसओपी (स्टेशन वन उत्पादनांवर):**

विभागात सध्या विविध स्थानकांवर १४ युनिट्स आहेत. डिसेंबर २०२४ मध्ये, १४ युनिट्सचे नूतनीकरण करण्यात आले, ज्यात रु. १८,०००/–कमाई.

बांबूपासून बनवलेल्या स्थानिक हस्तकलेची उत्पादने बल्लारशाह, बैतुल आणि नागपूर स्टॉलवर विकली जातात, तर आचर, पापड आणि फरशाण यांसारखी घरगुती खाद्य उत्पादने आवळा, अजनी, चंद्रपूर, धामणगाव, हिंगणघाट, मुलताई, पांढुर्णा, सेवाग्राम, पुलगाव येथे उपलब्ध आहेत .

आणि वर्धा स्टॉल्स.

ही उल्लेखनीय कामगिरी नागपूर विभागाची सतत वाढ आणि लवचिकता अधोरेखित करते, आर्थिक प्रगती आणि स्थानिक समुदायांच्या कल्याणासाठी योगदान देते.

हे टप्पे गाठण्यात रेल्वे कर्मचाऱ्यांचे समर्पित प्रयत्न आणि विविध एजन्सींच्या सहकार्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

# कुपुत्राकडून जन्मदात्यांचीच हत्या

**आईचा आवळला गळा, तर वडिलांवर चाकूने वार, कपिलनगर ठाण्यांतर्गत थरार, आरोपी अटकेत**

## दुहेरी हत्याकांडाने पुन्हा हादरले शहर

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ : क्राईम रिपोर्टर. अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या एका कुपुत्राने आपल्या जन्मदात्यांचीच हत्या केली. आईचा गळा आवळला, तर वडिलांवर चाकूने वार केले. दोघांचेही मृतदेह घरातच ठेवून तो बहिणीसह काकाच्या घरी रहायला गेला. दरम्यान परिसरात दुर्गंध पसरल्याने या हत्याकांडाचा उलगडा झाला. अंगाचा थरकाप उडविणारी ही घटना नववर्षाच्या पहिल्याच दिवशी कपिलनगर पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. या घटनेवरून परिसरातील नागरिकांमध्ये आरोपी मुलाबाबत तीव्र संताप आहे. लीलाधर डाखोळे (५०) आणि अरुणा लीलाधर डाखोळे (४३) अशी मृतांची नावे आहेत. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी मुलगा उत्कर्ष लीलाधर डाखोळे याला अटक केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लीलाधर हे कोराडी औष्णिक विज केंद्रात तांत्रिक कर्मचारी होते तर त्यांची पत्नी अरुणा ही एका शाळेत शिक्षिका होती. डाखोळे दाम्पत्याला मुलगा उत्कर्ष आणि मुलगी सेजल अशी दोन अपत्ये आहेत. उत्कर्ष हा अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे, तर सेजल बीएएमएसला आहे. उत्कर्ष गत ६ वर्षांपासून अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे, मात्र त्याला यश मिळत नसल्याने तो अजूनही दुसऱ्या वर्षालाच आहे. याच कारणातून तो तणावात रहात होता. सुत्रांवर विश्वास ठेवला तर त्याला एमडीचे व्यसनही जडले होते. वडिल त्याच्यावर अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम झेपत नसल्याने दुसऱ्या कोर्सला प्रवेश घेण्यासाठी दबाव टाकत होते. यावरून बापलेकांमध्ये अनेकदा शाब्दिक वादही होत होते. गत २५ डिसेंबरच्या रात्री दोघांमध्ये पुन्हा यावरून वाद झाला होता. तणावात येऊन उत्कर्षने आत्महत्या करण्याचाही प्रयत्न केला, मात्र त्याची हिंमत झाली नाही. शेवटी त्याने आई–वडिलांनाच संपविण्याचे ठरविले.

### चाकूने चिरला वडिलांचा गळा

२६ डिसेंबरच्या दुपारी आई अरुणा स्वयंपाक खोलीत काम करीत होती. वडील एका नातेवाईकाच्या अंत्ययात्रेसाठी गेले होते, तर बहीण महाविद्यालयात गेली होती. या दरम्यान उत्कर्षने स्वयंपाकखोलीत जाऊन आईचा गळा आवळला. काही वेळातच ती निपचित होऊन खाली कोसळली. त्यानंतर उत्कर्षने आईचा मृत्यू झाल्याची खात्री पटवली आणि निवांत हॉलमध्ये जाऊन टीव्ही पहात बसला. सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास वडील घरी परतले. हातपाय धुण्यासाठी बाथरूमला जात असतानाच उत्कर्षने मागून त्यांच्यावर हल्ला केला. चाकूने गळा चिरून त्यांना रक्ताच्या थारोळ्यात लोळवले. त्यानंतर त्याने शांतपणे फरशीवरील रक्ताचे डाग स्वच्छ केले. बहीण सेजल महाविद्यालयातून घरी येण्याची वेळ झाली होती. ती घरी आली तर या हत्याकांडाचा उलगडा होईल या भीतीने तो कारने बहिणीला घेण्यासाठी गेला. ऑटोमोटिव्ह चौकातून त्याने तिला कारमध्ये बसवले आणि थेट बैलवाडा येथे काकाच्या घरी पोहोचला.

### ध्यान साधनेसाठी बंगळुरूला गेल्याची बतावणी

हत्या केल्यानंतर त्याने वडिलांचा मोबाईल स्वत:कडे ठेवून घेतला होता. आई वडिलांसदर्भात सेजलने विचारपूस केली असता ते ध्यान साधनेसाठी बेंगळुरूला गेले, असे सांगून बहिणीची दिशाभूल केली. दरम्यान सेजलने आईच्या मोबाईलवर कॉल केला. मात्र, कुठलाच प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे सेजल चिंतेत होती, वारंवार भावाला विचारत होती. त्यामुळे त्याने वडिलांच्या मोबाईलवरून सेजलच्या मोबाईलवर मॅसेज केला. त्यात ५ जानेवारीला परत येत असल्याचा संदेश होता. संदेश वाचून सेजल निश्चिंत झाली होती. मात्र, उत्कर्ष अस्वस्थ होता. त्याला चैन पडत नव्हती. दरम्यान त्याच्या घरातून परिसरात दुर्गंधी पसरली असल्याची माहिती वस्तीतील एका मित्राने त्याला फोन द्वारे दिली. उत्कर्ष घाबरला, आता काय करायचे असा प्रश्न त्याच्या समोर उभा झाला.

### चुलत भावाजवळ ढसाढसा रडून केली दीशाभूल

३१ डिसेंबरच्या रात्री तो खसाळ्यात राहणाऱ्या काकाच्या घरी गेला. चुलत भावाची भेट घेतली. आई वडिलांची आठवण येत असल्याचे सांगितले. त्यांचे काही बरे वाईट झाल्याचा संशय व्यक्त करून ढसाढसा रडला. आत्ताच घरी जावून खात्री करून घेण्याची त्याने जिद्द केली. परंतू चुलत भावाने त्याची समजूत घातली. परंतू त्याचे मन काही लागत नव्हते. कारण त्याला दाराचे कुलूप उघडून आतून दार बंद कराचे होते आणि खिडकीद्वारे बाहेर पडायचे होते. बुधवार १ जानेवारीला सकाळी दोघेही भाऊ घरी गेले. खिडकीतून आत बघितल्यावर आई–वडिल निपचित पडल्याचे दिसले. लगेच पोलिस नियंत्रण कक्षाला फोन करून सूचना दिली. कपीलनगर ठाण्याचे पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. आरोपी उत्कर्षची सखोल चौकशी केली असता वरील घटनाक्रम पुढे आला. पोलिसांनी उत्कर्षला अटक करून डाखोळे दाम्पत्याचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात रवाना केले. या हत्याकांडावरून परिसरात व नातेवाईकांमध्ये उत्कर्षविरुद्ध तीव्रसंताप आहे. आई–वडिलांची निर्घृणपणे हत्या करणाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

# हवालाची ४१.६७ लाखांची रोकड जप्त!

## नाकाबंदीदरम्यान कोतवाली पोलिसांची कारवाई

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १ : क्राईम रिपोर्टर. कोतवाली पोलिसांनी नाकाबंदी दरम्यान ४१ लाख ६७ हजार ३०० रुपयांची रोकड जप्त केली. पोलिसांनी रोकड घेऊन जात असलेल्या दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता ते रकमेबाबत समाधानकारक उत्तर देऊ शकले नाही. त्यामुळे ही रक्कम हवालाची असल्याचा संशय आहे. रोहित गुलाबचंद कोरी (३०) आणि संगम रघुवरप्रसाद कोरी (२७) दोन्ही रा. जबलपूर अशी दुचाकीस्वार तरुणांची नावे आहेत. सध्या दोघांनाही सूचनापत्र देऊन सोडण्यात आले आहे.

सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण शहर सज्ज होते. जल्लोष साजरा करताना गालबोट लागू नये, अनूचित घटना घडू नये तसेच अपघातावर आळा बसावा या उद्देशाने पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी शहरात ठिकठिकाणी नाकाबंदीचे आदेश दिले होते. त्यानुसार कोतवाली पोलिसांचे पथक रात्री ८ वाजताच्या सुमारास गांधीगेट परिसरात नाकाबंदी लावून वाहन चालकांची तपासणी करीत होते. या दरम्यान रोहित आणि संगम एमएच–४९/बीव्ही–६९८३ क्रमांकाच्या दुचाकीने संशयितरित्या जाताना दिसले. दोघांनाही थांबवून चौकशी केली असता ते उडावा–उडवीची उत्तरे देऊ लागले. त्यांचे हावभावही संशयित होते. त्यामुळे पोलिसांनी दोघांचीही झडती घेतली असता त्यांच्याजवळ एक काळ्या रंगाची बॅग आढळली. बॅगमध्ये ४१ लाख ६७ हजारांची रोख रक्कम होती. इतकी मोठी रक्कम पाहून पोलिसही चक्रावले. पोलिसांनी रक्कम जप्त करून दोघांनाही ताब्यात घेतले.

### सूचनापत्र देऊन सोडले

ठाण्यात आणून सखोल चौकशी केली असता त्यांनी जबलपूरच्या एका व्यापाऱ्यासाठी काम करीत असून ही रक्कम त्याची असल्याची माहिती दिली. पोलिसांनी रकमेसंदर्भात ठोस पुरावा मागितला असता ते देऊ शकले नाही. पुरावा गोळा करण्यासाठी दोघांनाही सध्या सूचनापत्र देवून सोडण्यात आले. दरम्यान पोलिसांनी जबलपूरच्या व्यापाऱ्याशी संपर्क करून त्याला चौकशीसाठी नागपुरात बोलावले. त्यानुसार बुधवारी तो व्यापारी कोतवाली ठाण्यात उपस्थित झाला. पोलिस त्याची सखोल चौकशी करीत आहेत. उपरोक्त रकमेसंदर्भात पोलिसांनी ठोस पुरावा किंवा कागदपत्र मागितले आहेत. रात्री उशिरापर्यंत चौकशी सुरू होती. वृत्तलिहेपर्यंत उपरोक्त रकमेसंदर्भात माहिती स्पष्ट झाली नव्हती.

### जबलपूरच्या व्यापाऱ्यासाठी करतात काम

रोहित आणि संगम हे दोघेही नातेवाईक आहेत. महिनाभरापूर्वीच ते जबलपूरवरून नागपुरात आले. गणेशपेठ परिसरात भाड्याने खोली घेवून राहतात. त्यांना जबलपूरच्या एका व्यापाऱ्याने नागपुरात पाठविले आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे दोघेही त्याच्याकडे काम करतात. व्यापाऱ्याच्या सांगण्यावरूनच त्यांनी इतवारीतील काही लोकांकडून वरील रक्कम गोळा केली होती. घरी गेल्यावर ते रक्कम जबलपूरला पोहोचविणार होते.

# वहिनीचे प्रेम मिळविण्यासाठी युवकाने केला भावाचा खून

**नागपूर :** वहिनीसोबत दीराचे सूत जुळले. त्याची कुणकुण मोठ्या भावाला लागली. प्रेमसंबंधात मोठा भाऊ अडसर ठरत होता. त्यामुळे वहिनीचे प्रेम मिळविण्यासाठी लहान भावाने मोठ्या भावाचा पुतण्याच्या मदतीने दगडाने ठेचून खून केला. मृतदेह जंगलात फेकून पळ काढला. मात्र, बुटीबोरी पोलिसांनी मोठ्या शिताफीने हत्याकांडाचा छडा लावून दोघांनाही अटक केली. चंद्रकांत असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. पंकेश आणि बंटी अशी आरोपींची नावे आहेत. चंद्रकांत हा जामठ्यात शेतमजुरी करायचा. त्याला पत्नी व एक मुलगा बंटी आहे. त्याच्या घराशेजारी त्याचा चुलत भाऊ पंकेश राहतो. चंद्रकांतला दारुचे व्यसन होते. तो घरातही पत्नी व मुलाशी वाद घालत होता. पतीचे घरात दुर्लक्ष आणि दारुच्या व्यसनाला पत्नी माधुरी (बदललेले नाव) कंटाळली होती. पंकेश हा विवाहित असून त्याला दोन मुले आहेत.

त्याचे माधुरीशी चांगले संबंध होते. मोठा भाऊ चंद्रकांत हा पत्नीचा छळ करीत असल्याची त्याला जाणिव होती. अनेकदा पंकेश हा चंद्रकांत आणि माधुरीचे भांडण सुरु असल्यानंतर त्यांच्या घरी जाऊन भांडण सोडवत होता. माधुरी ही पंकेशसोबत किराणा आणायला, खरेदी करायला किंवा अन्य कामासाठी जात होती. यादरम्यान, दोघांची जवळीक वाढली.

प्रेमसंबंध जुळले. याबाबत माधुरीचा मुलगा बंटी यालाही माहिती होती. मात्र, वडिलाचा स्वभाव बघता त्यानेही आईच्या प्रेमसंबंधाला मूकसंमती दिली.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# नागपुरातील खेळाडू देशासाठी गौरव ठरतील




## नितीन गडकरी यांचे प्रतिपादन ■ पॅरिस पॅरा ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदक विजेते खेळाडू सन्मानित ■ २ फेब्रुवारी पर्यंत खासदार क्रीडा महोत्सव

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १:**
नागपूर शहरातील खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने खासदार क्रीडा महोत्सवाची सुरूवात करण्यात आलेली आहे. खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे व त्यांनी अधिक जोमाने आपल्या खेळात पारंगत होऊन यश संपादित करावे या हेतून त्यांच्या प्रोत्साहनासाठी विविध आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आमंत्रित करण्यात येतात. पॅरिस पॅरा ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूंनी आपल्या कामगिरीने देशाचा गौरव वाढविला आहे. खासदार क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून पुढील काळात नागपुरातील खेळाडू आपल्या कामगिरीमुळे देशाचा गौरव ठरतील, असा विश्वास खासदार क्रीडा महोत्सवाचे प्रेरक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

सातव्या खासदार क्रीडा महोत्सवाच्या तारखांची घोषणा बुधवारी १ जानेवारी २०२५ रोजी रेशीमबाग येथील कवीवर्य सुरेश भट सभागृहामध्ये महोत्सवाचे प्रेरक केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते झाली. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विशेष अतिथी म्हणून भारतीय पॅरा ऑलिम्पिक कमिटीचे अध्यक्ष पद्मश्री देवेंद्र झांझरिया, सत्कारमूर्ती भारतीय पॅरा ऑलिम्पिक संघाचे मुख्य प्रशिक्षक सत्यनारायण, पॅरिस पॅरा ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदक विजेते खेळाडू नितेश कुमार, सुमित अंतिल, हरविंदर सिंग, धरमबीर नैन, प्रवीण कुमार, नवदीप सिंग आणि अवनी लेखारा उपस्थित होते.

मंचावर आमदार प्रवीण दटके, मोहन मते, खासदार क्रीडा महोत्सवाचे संयोजक माजी महापौर श्री. संदीप जोशी, भारतीय जनता पार्टीचे नागपूर शहर अध्यक्ष श्री. जितेंद्र (बंटी) कुकडे, महोत्सवाचे सचिव डॉ. पीयूष आंबुलकर यांची विशेष उपस्थिती होती.

१२ जानेवारी ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये सातव्या खासदार क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केली.

आमदार कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, भारतीय जनता पार्टीचे नागपूर शहर अध्यक्ष जितेंद्र (बंटी) कुकडे, माजी आमदार नागो गाणार, मल्लिकार्जुन रेड्डी, जयप्रकाश गुप्ता, माजी नगरसेवक नरेंद्र (बाल्या) बोरकर, दीपक चौधरी, माजी नगरसेविका श्रीमती श्रद्धा पाठक यांच्या हस्ते खासदार क्रीडा महोत्सवामध्ये सहभागी विविध ६१ खेळांच्या क्रीडा संघटनांना महोत्सवाचे ध्वज प्रदान करण्यात आले.

खासदार क्रीडा महोत्सवाच्या सातव्या पर्वाच्या तारखांची घोषणा समारंभामध्ये देशाचा अभिमान असलेले पॅरिस पॅरा ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूंचा विशेष सन्मान केंद्रीय मंत्र नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आला.

भारतीय पॅरा ऑलिम्पिक संघाचे मुख्य प्रशिक्षक सत्यनारायण, बॅडमिंटन पुरुष एकेरीत सुवर्ण पदक विजेता नितेश कुमार, ॲथलेटिक्स भाला फेक मध्ये सुवर्ण पदक विजेता सुमित अंतिल, तिरंदाजी वैयक्तिक प्रकारात सुवर्ण पदक विजेता हरविंदर सिंग, ॲथलेटिक्स क्लब थ्रो मध्ये सुवर्ण पदक विजेता धरमबीर नैन, ॲथलेटिक्स उंच उडीमध्ये सुवर्ण पदक विजेता प्रवीण कुमार, ॲथलेटिक्स भाला फेक मध्ये सुवर्ण पदक विजेता नवदीप सिंग, महिला गटात १० मीटर एअर रायफल शुटिंगमध्ये सुवर्ण पदक विजेती अवनी लेखारा या खेळाडूंनी पॅरा ऑलिम्पिकमध्ये आपल्या कामगिरीने जगात संपूर्ण देशाचे नावलौकिक केले आहे. या सर्व खेळाडूंचा खासदार क्रीडा महोत्सव समितीद्वारे गौरव करून त्यांच्या कामगिरीप्रति सन्मान व्यक्त करण्यात आला.

शहरातील जास्तीत जास्त मुलांनी मैदानात येऊन खेळावे यासाठी मैदानांचा विकास करण्याची गरज त्यांनी बोलून दाखविली. यासाठी राज्य शासनाने शंभर कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याची मागणी देखील त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली.

नागपुरात आयोजित होणारा खासदार क्रीडा महोत्सव हे देशासाठी एक उदाहरण ठरले आहे. केंद्रीय मंत्री गडकरी यांनी देशाला क्रीडा महोत्सव कसे असावे हे दाखवून दिले आहे. सात वर्षापूर्वी छोट्या स्वरूपात असलेले महोत्सव आज विशाल रूपात आयोजित होत आहे. खासदार क्रीडा महोत्सव हे नागपूर आणि देशासाठी मोठी देण आहे, असे प्रतिपादन बावनकुळे यांनी केले.

खासदार क्रीडा महोत्सवामुळे खेळाडूंना उत्तम व्यासपीठ मिळाले आहे. देशात संत्र्यांसाठी प्रसिद्ध नागपूर पुढील काळात खेळाडूंसाठी प्रसिद्ध होईल, असा विश्वास यावेळी तीन पॅरा ऑलिम्पिकमध्ये पदक विजेते भारतीय पॅरा ऑलिम्पिक कमिटीचे अध्यक्ष पद्मश्री देवेंद्र झांझरिया यांनी व्यक्त केला. पॅरा ऑलिम्पिकमध्ये भारताने ६० वर्षात ३० पदके जिंकली पण एकट्या पॅरिस पॅरा ऑलिम्पिकमध्ये २९ पदके जिंकून पदकतालिकेत १८ वे स्थान प्राप्त केल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले.

स्थानिक स्तरावर अशा भव्य क्रीडा महोत्सवामुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळते. खेळाडूंना पुढे जाण्यासाठी असे महोत्सव आवश्यक आहेत. खेळाडूंनी जय पराजयाचा विचार न करता आपल्या कामगिरीकडे लक्ष देऊन खेळ 'एन्जॉय' करावा, असा मंत्र पॅरिस पॅरा ऑलिम्पिकमध्ये महिला गटात १० मीटर एअर रायफल शुटिंगमध्ये सुवर्ण पदक विजेती अवनी लेखारा यांनी खेळाडूंना दिला कामगिरीने इतर खेळाडूंना प्रेरणा मिळणे अभिमानास्पद असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# नागपूर महापालिकेद्वारे नवीन वर्षाची अनोखी भेट




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १:**
नागपूरकर जनतेला नागपूर महापालिकेद्वारे नवीन वषार्ची अनोखी भेट देण्यात येत आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात पाणी देयकामधील ८० टक्के विलंब शुल्क माफ करण्याची महत्वाकांक्षी योजना महापालिकेने सुरू केली आहे. ही योजना १ जानेवारी २०२५ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीमध्ये राबविण्यात येणार आहे.

नळाच्या पाण्याचे देयक नियमित न भरणाऱ्यांना आकारण्यात आलेले विलंब शुल्क ८० टक्के माफ केले जाणार आहे. त्यामुळे पाणीपट्टी थकीत ठेवणा ्यांना दिलासा मिळणार आहे. शहरातील ४ लाख २३ हजार ८०९ ग्राहकांपैकी ९६ हजार ३६८ ग्राहकांकडे पाण्याचे देयक थकीत आहे. त्यांच्याकडे रक्कम मूळ रक्कम व विलंब शुल्कासह एकूण २९९.४६ कोटी (२६ डिसेंबर २०२४ पर्यंत) थकबाकी आहे. यामध्ये मूळ रक्कम ११७.५७ कोटी व विलंब शुल्क १८१.८९ कोटी आहे. मूळ रकमेपेक्षा विलंब शुल्क जास्त असल्याने बहुतांश ग्राहक पाणी देयकाचा भरणा करण्यास टाळतात. हे लक्षात घेऊन महापालिकेने केवळ विलंब शुल्कात सवलत देण्याची योजना आणली आहे.

### १८ टक्के अधिभारामुळे झपाट्याने वाढ

थकीत रक्कमेवर वार्षिक १८ टक्के अधिभार लावण्यात येतो. त्यामुळे विलंब शुल्काची रक्कम दिवसेंदिवस वाढते. या बाबींमुळे ग्राहक पाणीदेयके भरण्यास टाळाटाळ करतात. यावर तोडगा काढण्याचा दृष्टीने व थकीत रक्कमेची वसुली करण्यासाठी ८० टक्के विलंब शुल्क माफ करण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. महापालिकेला या योजनेतून महापालिकेला मूळ थकीत आणि २० टक्के विलंब शुल्क यासह १५३.९४ कोटी वसुली अपेक्षित आहे.

८० टक्के विलंब शुल्क माफ पाणी पुरवठा न होणे, पाणी पुरवठा अनियमित असणे, दुषीत पाणी पुरवठा होणे, २००९ मध्ये पाणी दरात झालेली वाढ व त्यानंतर सन २०१० मध्ये कमी झालेले दर, नळ कनेक्शन बंद असणे, मात्र पाण्याचे देयके सुरू असणे, जुने नळ कनेक्शन असताना मोक्यावर इमारत किंवा अर्पाटमेंट तयार होऊन जुने पाण्याचे देयकाकरीता रक्कम भरण्यास नवीन रहिवाशांची तयारी नसणे, वरील कारणामुळे संबंधित ग्राहकांनी पाणी देयकाची रक्कम जमा करणे बंद केले व थकीत रक्कमेवर वार्षिक १८ टक्के सरचार्ज लावण्याची तरतूद असल्याने ही रक्कम दिवसेंदिवस वाढत गेली. या बाबींमुळे ग्राहक पाणीदेयके भरण्यास टाळाटाळ करतात.

या सर्व बाबी लक्षात घेता व यावर तोडगा काढण्याचा दृष्टीने व बकाया रक्कमेची वसुली अधिक प्रमाणात करता येईल याद्दष्टीने पाणी बकाया धारक उपभोक्त्यांच्या देयकातील ८० टक्के विलंब शुल्क माफ करणारी महत्वाकांक्षी योजना नागपूर महापालिकेद्वारे सुरू करण्यात आली आहे.

# ३३ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा कारभार अध्यक्षाविना

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १:**
राज्यातील ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांपैकी ३३ ठिकाणी समिती अध्यक्षच नाही. परिणामी ४० हजारांपेक्षा जास्त अर्ज किमान दोन वर्षांपासून रखडले प्रलंबित असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

३६ पैकी ३० अध्यक्ष महसूल विभागातून व ६ समाजकल्याण विभागातील अधिकारी भरावयाचे आहेत. आजच्या स्थितीत फक्त या दोन्ही विभागांतील एकही अधिकारी या पदावर कार्यरत नाही.

ग्रामविकास विभागातील एक अधिकारी व मंत्रालयीन केडरमधून २ अधिकारी आहेत. जात प्रमाणपत्राशी काहीही संबंध नसणारे अधिकारी समितीचे अध्यक्ष म्हणून काम करत आहेत, तर हक्क आहे व पात्र असूनही विभागाच्या अधिकाऱ्यांना वेगवेगळी कारणे सांगून पदोन्नतीपासून वंचित ठेवले जात आहे.

मंजूर पदांपैकी ६ पदे सामाजिक न्याय विभागाकडून भरायची आहेत. परंतु २०१४ पासून पद मंजूर असताना आतापर्यंत फक्त एका अधिकाऱ्याची अध्यक्षपदावर नेमणूक केली आहे.

जात पडताळणी समितीमध्ये अध्यक्षांची ३३, उपायुक्त तथा सदस्याची ७, पोलिस उपअधीक्षक २२, संशोधन अधिकारी १५, वरिष्ठ लिपिक १६, उच्चश्रेणी लघुलेखक २६, पोलिस निरीक्षक ५, पोलिस शिपाई ३, शिपाई १८, कनिष्ठ लिपिक ५ अशी एकूण ३६० मंजूर जागांपैकी २२८ जागा भरल्या असून १३२ रिक्त आहेत. सरकारचे मात्र याकडे दुर्लक्ष होत आहे.

# ऑपरेशन 'नन्हे फरिश्ते' : आरपीएफकडून बालकाचा बचाव

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १:**
रेल्वे संरक्षण बल (आरपीएफ), नागपूरने ऑपरेशन 'नन्हे फरिश्ते' अंतर्गत नागपूर रेल्वे स्थानकावर सापडलेल्या संकटग्रस्त बालकाला वाचवले.

उप-निरीक्षक अनुराधा मेश्राम यांनी प्लॅटफॉर्म क्रमांक 1 वर गस्त घालताना एकाकी व चिंताग्रस्त स्थितीत फिरणाऱ्या बालकाला पाहिले. आरपीएफ पथकाने त्वरित हस्तक्षेप करत बालकाला सुरक्षित स्थळी आणले आणि नागपूर आरपीएफ पोस्ट येथे नेले. नागपूर चाइल्डलाइनच्या प्रतिनिधींनी बालकाचे समुपदेशन करीत संवेदनशील पद्धतीने चौकशी केली. कुटुंबाशी संपर्क साधण्यासाठी तत्काळ प्रयत्न करून बालकाला चाइल्डलाइनच्या देखरेखीखाली सोपवण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर, स्थानिक बालकल्याण गृहात तात्पुरत्या निवासाची व्यवस्था करण्यात आली.

मध्य रेल्वे उप-निरीक्षक अनुराधा मेश्राम व आरपीएफ पथकाच्या सार्वजनिक सुरक्षेप्रती व कल्याणासाठीच्या योगदानाची प्रशंसा करण्यात येत आहे.

# २१ दिवसात तीन राज्यातून वाघिणीचा ३०० किलोमीटर प्रवास

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १:**
महाराष्ट्र ते ओडिशा असे कृत्रिम स्थलांतर आणि ओडिशा ते पश्चिम बंगाल व्हाया झारखंड असा नैसर्गिक प्रवास करणारी झीनत या वाघिणीला मंगळवारी मध्यरात्रीनंतर ओडिशाच्या सिमिलीपाल व्याघ्रप्रकल्पात परत आणण्यात आले. बुधवारी सकाळी तिला या व्याघ्रप्रकल्पातील गाभा क्षेत्रातल्या मोकळ्या पिंजऱ्यात सोडण्यात आले. सिमिलीपालमधून बाहेर पडल्यानंतर या वाघिणीनेतब्बल २१ दिवस, तीन राज्ये आणि ३०० किलोमीटरचा प्रवास केला.



सिमिलीपाल अभयारण्यातील वाघांच्या जनुकीयसंख्येचा पूल मजबूत करण्यासाठी ह्यझीनतह्न या वाघिणीला नोव्हेंबरमध्ये महाराष्ट्रातील ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पातून आणले होते. त्याआधी यमुना या वाघिणीला ताडोबातून सिमिलीपालमध्ये आणण्यात आले.

झीनत या वाघिणीने आठ डिसेंबरला पहाटे सिमिलीपाल व्याघ्रप्रकल्पाची सीमा ओलांडली. त्यानंतर ती पश्चिम बंगालमध्ये पोहोचली. २९ डिसेंबरला या वाघिणीला पश्चिम बंगालमधील बांकुरा जिल्ह्यातील जंगलातून जेरबंद करण्यात आले. त्यानंतर अलीपूर प्राणीसंग्रहालयात तिला नेण्यात आले.

याठिकाणी वैद्यकीय तपासणीनंतर तिला म्हशीचे मांस खाण्यासाठी देण्यात आले, पण तिने ते नाकारले. दरम्यान, तिचा वैद्यकीय तपासणी अहवाल चांगला आल्यानंतर देखील पश्चिम बंगालच्या वनखात्याने ही वाघीण ओडिशा वनखात्याच्या सुपूर्द केली नाही. त्यामुळे यावरुन वादही निर्माण झाला.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने हस्तक्षेप केल्यानंतर या वाघिणीला मंगळवारी मध्यरात्रीनंतर ओडिशात आणण्यात आले. पश्चिम बंगालच्या मुख्य वन्यजीव रक्षकांना लिहिलेल्या पत्रात प्राधिकरणाने मानक कार्यपद्धतीनुसार या वाघिणीला ओडिशात स्थलांतरित करण्याऐवजी अलीपूर प्राणीसंग्रहालयात का ठेवण्यात आले, असा प्रश्न केला व त्यावर उत्तर मागितले.

> झीनत पश्चिम बंगालमध्ये पोहोचली, पण तिला लावण्यात आलेल्या रेडिओ कॉलरमध्ये तांत्रिक बिघाड झाला. त्यामुळे तिचा मागोवा घेणे कठीण झाले. २१ दिवसांच्या अथक परिश्रमानंतर ती बांकुराच्या जंगलात दिसली. यानंतर तिला जेरबंद करण्यात यश आले.

वाघिणीला परत आणण्यासाठी ग्रीन कॉरिडॉर तयार करण्यात आला. जामशोला येथील आंतरराज्य सीमेवरुन तिला आणले गेले. यावेळी सिमिलीपाल व्याघ्रप्रकल्पाचे क्षेत्र संचालक यांच्या नेतृत्त्वाखाली ओडिशा वनविभागाचे दहा सदस्यीय पथक या वाघिणीच्या हालचालीवर लक्ष ठेवून होते.

या तीन वर्षीय वाघिणीला काही दिवस व्याघ्रप्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात तयार करण्यात आलेल्या मोकळ्या पिंजऱ्यात ठेवण्यात येणार आहे. तिच्या हालचालीनंतर आणि वैद्यकीय तपासणीनंतर तिला जंगलात सोडण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.



■ **नागपूर :** नूतन वर्षाच्या पूर्वसंध्येला शेकडो नागरिकांनी मंदिरात जावून पूजाअर्चा केली. नागपूर येथील प्रसिद्ध टेकडी गणेश मंदिरात भाविकांची मोठीच गर्दी उसळली होती. नूतन वर्षानिमित्त मंदिर समितीच्यावतिने मंदिरावर आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. मंदिराच्या आतील भागातही सुरेख सजावट करण्यात आल्याचे दिसून आले.

# अग्नीपीडितांना शासनाकडून मदत द्या

## माजी आमदार सुधाकर कोहळे यांचे निवेदन



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १:**
शहराच्या सदर भागातील एका घरात आग लागून नुकसान झालेल्या कुटुंबियांना शासनाकडून सर्वतोपरी मदत मिळवून देण्याची मागणी करीत पूर्व नागपूरचे माजी आमदार सुधाकर कोहळे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर यांना निवेदन सादर करण्यात आले.

27 डिसेंबर रोजी संध्याकाळी सदर गोलछा मार्गावरील एका इमारतीत भीषण आग लागली. शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत तळमजला व पहिल्या मजल्यावरील चार कुटुंबांचे सर्वस्व जळून खाक झाले. सुदैवाने जीवितहानी झाली नाही, परंतु गॅस सिलेंडरच्या स्फोटामुळे नुकसान अधिकच वाढले.

या घटनेची दखल घेत मरजी आमदार सुधाकर कोहळे यांनी घटनास्थळी भेट दिली. पिडीत कुटुंबांशी संवाद साधत नुकसानीचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेत पीडित कुटुंबांना मदत मिळवून देण्यासाठी निवेदन सादर करीत मुख्यमंत्री निधीमधून योग्य ती भरपाई मिळावी अशी मागणी केली. जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ या विषयाची गंभीर दखल घेत कार्यवाहीचे आदेश दिले.

यावेळी पीडित कुटुंबांतील सदस्य तसेच लक्ष्मीकांत दादुरिया, कमल नामपल्लीवार, श्रीकांत दुर्गेकर उपस्थित होते.

# चार लाखांच्या मालावर डल्ला

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १:**
एमआयडीसी ठाण्यांतर्गत अज्ञात आरोपीने एका वृद्ध दाम्पत्याचे घरफोडून रोकड व दागिन्यांसह एकूण 3 लाख 90 हजार रुपयांच्या मालावर डल्ला मारला.

या प्रकरणी पोलिसांनी मनोजकुमार मनमोहनप्रसाद सिन्हा (60) रा. कृष्णविहार, इसासनीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत 23 डिसेंबरच्या दुपारी सिन्हा दाम्पत्य घराला कुलूप लावून मुबंईला मुलीकडे रहायला गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने खिडकीचे ग्रील तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटात ठेवलेली 50 हजारांची रोकड व सोन्याचे दागिने असा एकूण 3.90 लाखांचा माल चोरी करून पसार झाला. मंगळवारी सकाळी 11 वाजताच्या सुमारास सिन्हा घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.